शनिवार । २९ मे १९८२ । किंमत दीड रुपया

# माणूस

## कृण्वन्तो विश्वम् आर्यम् म्हणजे काय?

एका विज्ञानशिक्षकाचे मुक्तचिंतन

पृष्ठ....२६



## राजस्थानातील दलितांची स्थिती

प्रा. जाटव

पृष्ठ....४

## इंदिरा गांधी या नावामागील जादू कमी होते आहे का?

अवतीभवती । पृष्ठ....११

# मी जिंकलो, मी हरलो

नुकत्याच पार पडलेल्या चार राज्यातील निवडणुका हा केवळ एक राजकीय खेळ ठरला. कोणीच पूर्ण हरले नाही वा जिंकले त्यांचे विजयही तसे अपुरे व अर्धवटच आहेत. प्रत्येकाने म्हणावे 'मी जिंकलो, मी हरलो.' त्यातल्या त्यात घवघवीत यश बंगालमध्ये डाव्या आघाडीला, विशेषत: मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला मिळाले. पण या पक्षाचे पाच मंत्री पराभूत व्हावेत हा धक्का मोठाच आहे. असे म्हणतात की, खुद्द ज्योती बसू यांनी जर कलकत्त्यातून निवडणूक लढवली असती तर त्यांनाही मतदारांनी धडा शिकवला असता. ग्रामीण भागात कम्युनिस्ट पक्षाची ताकद टिकून राहिली असली तरी कलकत्ता शहरावरची या पक्षाची पकड सैल झाली आहे. हे या निवडणुकीत दिसून आले आहे. याउलट हरयाना–हिमाचल प्रदेश ही राज्ये इंदिरापक्षाच्या हातून निसटता निसटता वाचली आहेत. केरळमधील या पक्षाचे यशही तसे काठावरचे आहे. पर्यायी पक्ष म्हणून निर्विवादपणे दखल घ्यावी असे यशाचे भरपूर माप मतदारांनी भाजपच्या पदरातही काही टाकलेले नाही. केरळमधील या पक्षाचा पराभव तर दारूण आहे. कोणीच समाधान पावू नये व कोणीच निराश होऊ नये असे राजकीय चित्र या निवडणुकांनी निर्माण केलेले आहे. त्यामुळे राजकीय अस्थिरता आणखीनच वाढणार. जोवर राजकीय पक्ष विशिष्ट तत्त्वप्रणालीच्या व कार्यक्रमाच्या आधारावर संघटित होत नाहीत, ही तत्त्वे व कार्यक्रम व्यवहारात उतरवू शकणारी कार्यकर्त्यांची भक्कम यंत्रणा जोवर पक्षाजवळ तयार नाही, तोवर अस्थिरता कमीही होणार नाही. स्थिरता मुळाशी हवी तर ती वरच्या टोकाला असू शकते. जे मुळात नाही ते शेंड्यात कुठून येणार? आज सगळ्यांचीच मुळे जमिनीपासून सुटलेली आहेत. ती पुन्हा रुजवायची तर फार मोठ्या तपश्चर्येचीच गरज आहे. ही तपश्चर्याही एकांगी असून भागणार नाही. तथागतांनी या तपश्चर्येचे स्वरूप कसे असायला हवे हे आपल्या प्रार्थनेत पूर्वीच सांगून ठेवलेले आहे. पण लक्षात घेतो कोण?

तथागतांची ही प्रार्थना अशी–

बुद्धम् सरणं गच्छामि
संघम् सरणं गच्छामि
धम्मम् सरणं गच्छामि

या प्रार्थनेचा बाळबोध अर्थ असा–

(१) नेतृत्व हवे
(२) संघटना हवी
(३) तत्त्वज्ञान हवे...

तुम्ही धर्मकारण वाढवा, राजकारण लढवा किंवा समाजकारण उभे करा. क्षेत्र कुठलेही असो. या तीन गोष्टी कुठल्याही उभारणीसाठी, नवनिर्माणासाठी हव्यातच. या तीन सूत्रांची गुंफण जेथे नाही तेथे इतिहास घडत नाही, सामाजिक-राजकीय प्रवाह बदलत नाहीत. फिरकोळ लाटा फार तर उसळतात, वरवरची थोडी खळबळ माजते; इतकेच.

अशी तीन पातळ्यांवरची तयारी, तीन सूत्रांची गुंफण आज राजकीय क्षेत्रात कोणीच करताना दिसत नाही. सर्वांना झटपट यश हवे, सत्ता हवी – मग ती २८ महिन्यांसाठी, औट घटकेसाठी असली तरी हरकत नसते. असा जोवर झटपटरंगारी मामला राजकारणात सुरू आहे तोवर निवडणुका हा प्रथमपासून अखेरपर्यंत एक खेळच राहणार हे उघड आहे. फार तर लाटांचा खेळ. सध्या कोणतीच लाट अस्तित्वात नसल्याने हा खेळही कंटाळवाणा झाला, हे वेगळेच. ठाण्यात फक्त ३५ टक्के मतदान व्हावे हे कशाचे लक्षण म्हणावयाचे?

त्यातल्या त्यात भाजप आणि मार्क्सवादी वरील तीन सूत्राची गुंफण करू शकतील अशी थोडी फार स्थिती आहे. कोण या स्पर्धेत पुढे जातो ते पाहायचे. बाकीचे स्पर्धेतून बादच झालेले आहेत. या निवडणुकांचा फायदा जर काही झाला असलाच तर सध्या तरी तो एवढाच दिसतो.

सामाजिक क्षेत्रात भटक्या आणि विमुक्त जमातीचे पुनर्वसन व्हायला हवे असे आपण म्हणतो. मग राजकारणातही असे व्हायला नको का?

**श्री. ग. मा.**


## साप्ताहिक माणूस

**वर्ष : एकविसावे**
**अंक : बावन्नावा**
**२९ मे १९८२**
**किंमत : दीड रुपया**

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

## पुणे वार्ता

# ‘वनस्थळी’चे व्यक्ति-विकास शिबिर

भारतातल्या बहुसंख्य खेड्यात शिक्षणाकडे अजूनही ‘हौस’ म्हणूनच बघितलं जातं. चांगल्या गुणवत्तापूर्ण जीवनाची शिक्षण ही मूलभूत आणि प्राथमिक पायरी आहे ही जाणीव खेड्यांत आता कुठे जराशी रुजायला लागली आहे. ही कल्पना रुजवण्याचं श्रेय शिक्षणाबद्दल खरोखरची आस्था बाळगणाऱ्या स्वयंसेवी संस्था, अशा संस्थातून काम करणारे समाजसेवक आणि खेड्यातल्या जागरूक माणसांकडे जातं. पुण्यासारख्या विद्येच्या माहेरघरात, जिथे विशिष्ट दर्जाची सांस्कृतिक, शैक्षणिक परंपरा योजनापूर्वक जोपासली जाते त्याच पुण्याच्या आसपासच्या खेडोपाड्यांत शिक्षणाबद्दल अजूनही अनास्थाच आहे. फक्त शिक्षणप्रसार हेच ज्यांचे उद्दिष्ट आहे अशा शिक्षणक्षेत्राला वाहून घेणाऱ्या श्रीमंत संस्थासुद्धा या परिस्थितीत काही परिणामकारक बदल करू शकत नाहीत हे खरेच आहे.

या प्रतिकूल पार्श्वभूमीवर दिलासा देणाऱ्या काही स्वयंसेवी संस्था बालशिक्षणासाठी काही महत्त्वाचे कार्यक्रम हाती घेतात, योजनाबद्ध रीतीने ते राबवतात आणि या परिवर्तनाच्या प्रवाहात आपली हक्काची जागा राखून ठेवतात हे खरोखरीच विशेष आहे.

पुण्याच्या ‘वनस्थळी ग्रामीण विकास’ केंद्रातर्फे बालवाडी शिक्षिकांसाठी व्यक्तिमत्त्व विकास शिबिरं गेली सहा वर्षे आयोजित करण्यात येत आहेत. सध्या पुण्याच्या विद्यार्थी सहाय्यक समितीच्या सभागृहात वनस्थळीचं (२७) सत्ताविसावं व्यक्तिमत्त्व विकास शिबिर चालू आहे. याबद्दल बोलताना वनस्थळीच्या संचालिका सौ. निर्मलाताई पुरंदरे म्हणाल्या, ‘व्यक्तिमत्त्व विकास शिबीर ही बालशिक्षणाची अधिक परिपक्व आणि पुढची पायरी आहे. कारण बालवाडीतच लहान मुलांचा पाया पक्का होतो आणि व्यक्तिविकासाला विशिष्ट दिशा देण्याचा प्रयत्न याच काळात केला जातो. २॥ ते ५॥ वर्षे वयोगटाच्या लहान लहान मुलांना शिकवण्यासाठी शिक्षिकेचा व्यक्तिविकास व्हायला पाहिजे ही जाणीव आता खेड्यांतही रुजायला लागली आहे. प्रशिक्षित शिक्षिका लहान मुलांच्या मनात आणि मुलांच्या पालकांच्या मनात शिक्षणविषयक आत्मविश्वास जास्त चांगल्या प्रकारानं निर्माण करू शकते असा कित्येक प्रशिक्षित शिक्षिकांचा अनुभव आहे.

पुण्यात १५ मेपासून सुरू झालेल्या या दहा दिवसाच्या व्यक्तिमत्त्व विकास शिबिरात प्रामुख्यानं बाल-शिक्षणासाठी शिक्षिकेने काय करायला हवं याचा विचार केला जातो. यासाठी विविध प्रकारचे खेळ, समूहगीत, बडबडगीतं आणि बालगीतं, लहान मुलासाठी गोष्टी, हस्तकला उदा. बाहुल्या, मातीच्या वस्तू, कागदी खेळणी, चित्रकला याची माहिती प्रात्यक्षिकातून दिली जाते. शिवाय बालअपंगत्व कसं ओळखावं ? बाल मानसशास्त्र म्हणजे काय ? त्याचा शास्त्रशुद्ध वापर बालवाडीशिक्षणक्रमात कसा करावा याचीही माहिती शिबिरार्थी महिलाना दिली जाते. विकास शिबिरातला तिसरा महत्त्वाचा टप्पा आहे, तो म्हणजे स्त्रियांना स्वतःची ओळख करून देण्याचा कार्यक्रम. ‘स्त्रीसाठी कायदा’ हा त्यातला सर्वात महत्त्वाचा कार्यक्रम. खेड्यातल्या स्त्रीयाचे काही प्रश्न अगदी सार्वत्रिक स्वरूपाचे आहेत. पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रीला दिलेला दुय्यम दर्जा, त्यामुळे शिक्षण नाही, शिक्षण नाही म्हणून स्वावलंबन नाही आणि त्यामुळे अन्यायाविरुद्ध आवाज देता येत नाही. हे दुष्टचक्र वर्षानुवर्षे बिनबोभाट चालू आहे. व्यक्तिविकास शिबिरात स्त्रियाना तज्ज्ञामार्फत आवश्यक त्या कायद्यांची ओळख करून दिली जाते. याशिवाय अन्यायाविरुद्ध दाद कोणाकडे मागायची ? स्त्रियांचे प्रश्न सोडवण्यासाठी तयार असणाऱ्या समाजसेवी संस्था, ग्रामविकास केंद्र गावाचा कारभार चालवणाऱ्या ग्रामपंचायती त्यानंतर तालुका पंचायत, जिल्हा परिषद यांच्या कामाची पद्धत शिबिरात समजावून सांगतात. पंचायत समितीत बायकांना उभं रहाता येतं हे बहुसंख्य बायकाना माहितही नव्हतं.

शिबिराच्या कार्यक्रमाच्या आखणीबद्दल निर्मलाताई म्हणाल्या, ‘त्याना आता तातडीची गरज काय आहे हे आम्ही बघितलं. बालवाडीत काम करणाऱ्या शिक्षिकांनी, मुलींनी सर्व्हे घेतला, खेड्यातल्या शिक्षणाचे प्रश्न समजावून घेतले. त्यासाठी लहान मुलांची पहिल्या पाच वर्षाच्या काळात जी वाढ व्हायला पाहिजे त्या दृष्टीने आम्ही शिबिरातले कार्यक्रम ठरवले.’

खास शिबिरासाठी म्हणून स्वखर्चानं आलेल्या बायकांशी गप्पा मारल्या तेव्हा सगळ्या बायका अगदी मोकळेपणानं बोलल्या आपण काही तरी चागलं शिकतो आहोत, ऐकतो आहोत याबद्दल त्यांना झालेला आनंद त्यांना शब्दात व्यक्त करायला लागलाच नाही. तो त्यांच्या चेहऱ्यांवरच दिसत होता. दुपारी गेले तेव्हा सगळ्याजणी शिवणकाम, आणि भरतकामात रंगल्या होत्या. गप्पा मारताना सुद्धा एका वेळी एकच बाई बोलत होती. त्या फक्त गप्पा नव्हत्या–‘अनुभव कथन’ होतं.

‘१०० रु. खर्च करून पुण्याला यायचं म्हणून घरी सासू–सासरे काही बोलले का?’ असं त्यांना विचारलं तेव्हा सगळ्यांच्या चेहऱ्यावर ‘आपण बरोबर पकडले गेलो’ अशी भावना होती. मग लगेच म्हणाल्या–‘आम्ही बालवाडीत शिकवून १०० रु. मिळवतो. आमच्या मुलांसाठी आम्हाला शिबिरात यायलाच पाहिजे. घरी कुरकुर करतात पण आता आम्ही मिळवतो म्हणून बोलू शकत नाहीत !’

शिक्षण–आर्थिक स्वावलंबन आणि व्यक्तिमत्त्वविकास असा हा बराच लांबचा पल्ला आहे हे खरं पण ‘वनस्थळी’सारख्या स्वयंसेवी संस्थानी त्याची सुरुवात केली आहे हे निर्विवाद.

शिबिरातल्या एका १७/१८ वर्षाच्या मुलीला विचारलं, ‘व्यक्तिमत्त्वविकास म्हणजे काय ?’ तेव्हा जरासं लाजूनच ती म्हणाली, ‘इथं चांगलं ऐकायला मिळतं, शिकायला मिळतं आणि आम्हाला बोलायला सांगतात.’

शिबिराला आलेल्या स्त्रियांना चांगलं ऐकायला मिळावं म्हणून डॉ. पुष्पा शिरोळे,

इंदुताई टिळक, लीलावती भागवत, डॉ. आपटे, डॉ. भाटे, उषा मोडक यासारखी माणसं आस्थेनं येतात.

वनस्थळीनं पुण्याच्या आसपासच्या खेड्यात आतापर्यंत शंभराहून अधिक बालवाड्या सुरू केल्या आहेत. या बालवाड्यांचं सध्याचं काम उत्साहवर्धकच आहे. या निमित्तानं ज्या खेड्यात अजून रोजचं वर्तमानपत्रसुद्धा पोचत नाही तिथं शिक्षणाबद्दल आपुलकी बाळगणारे लहान लहान गट तयार होत आहेत. बालवाड्यांचं काम अधिक योजनाबद्ध रीतीनं होण्यासाठी काही ठराविक रक्कम राखून ठेवावी असं ग्रामपंचायतीनासुद्धा वाटू लागलं आहे. हवेली तालुक्याचे सभापती शिवाजीराव कोंढे, शिरूर तालुक्यातले ॲ. देवराम गोरडे यासाठी जातीन लक्ष घालत आहेत. बालवाड्या फक्त शिक्षणकेंद्रंच न राहता समाजसेवी संस्था बनत आहेत.

पण एक उणीव खटकते. 'वनस्थळी' सारख्या स्वयंसेवी संस्था आणि शिक्षणविषयक काम करणाऱ्या मान्यताप्राप्त शासकीय वा निमशासकीय संस्थांमध्ये समन्वय नाही. मान्यताप्राप्त संस्था स्वयंसेवी संस्थाना 'हौशी' समजून त्यांचं मूल्य कमी लेखतात. उलट या मान्यताप्राप्त संस्थांच्या निर्जीव कारभारामुळे आणि लाल फितीच्या दिरंगाईमुळे स्वयंसेवी संस्था तिकडे फिरकत नाहीत. परंतु,'वनस्थळी' सारख्या स्वयंसेवी संस्थांच्या कार्यक्रमांना स्थिरता व कायमपणा यायचा असेल तर या दोन्ही पातळीवर काम करणाऱ्या संस्थांच्या कामात एकसूत्रीकरण हवं. विचाराची आणि अनुभवाची देवाण–घेवाण हवी आणि दैनंदिन सहकार्यही हवं, नाही तर हे सुटे सुटे छोटे प्रयोग कितीही महत्त्वपूर्ण वाटले तरी त्याचं एका व्यापक प्रवाहात रूपांतर होणार नाही.'

—मेधा देशपांडे

---

मुक्काम औरंगाबाद

# राजस्थानातील आंबेडकरी चळवळ

मुलाखत : भालचंद्र जोशी

मराठवाडा विद्यापीठातर्फे दरवर्षी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मृती व्याख्यानमाला होत असते. यंदा राजस्थानमधील गंगानगर इथले प्रा. डॉ. दयाराम जाटव याना या व्याख्यानमालेसाठी निमंत्रित करण्यात आलं होतं. डॉ. जाटव यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाचा फार आस्थेनं आणि बारकाईनं अभ्यास केला आहे. त्यांनी डॉ. आंबेडकरांची राजकीय आणि सामाजिक तत्त्वप्रणाली, बुद्ध आणि कार्ल मार्क्स, डॉ. आंबेडकरांचा नीतिविषयक विचार इत्यादि विषयांवर ६ पुस्तकं लिहिली आहेत. आता यापुढं ते आंबेडकरासंबंधी ८ ते १० ग्रंथांची एक मालिका लिहिण्याच्या विचारात आहेत. आंबेडकरांचा कायदेविषयक विचार अभ्यासता यावा यासाठी त्यांनी यावर्षी कायद्यातील पदवीपरीक्षाही दिली आहे. १९९१–९२ च्या सुमाराला, म्हणजे डॉ. आंबेडकराच्या जन्मशताब्दीच्या सुमाराला हे सर्व खंड प्रसिद्ध व्हावेत अशी त्यांची योजना आहे.

स्वतः डॉ. जाटव हे उत्तर प्रदेशातील जाटव या अनुसूचित जातीतले. १९३३साली अलिगड जिल्ह्यात हाथरस तालुक्यात नगलानाई इथं त्याचा जन्म झाला. वडील मजुरी करायचे. ११ व्या वर्षीच त्यांचे वडील गेले; परंतु आईनं काबाडअष्ट करून त्यांना वाढवलं, शिक्षण दिलं. रेल्वे, संरक्षणदल, सेवायोजनविभाग इत्यादि खात्यामध्ये कारकुनी करत करत त्यांनी ५५ साली बी. ए. आणि नंतर ५८ साली एम. ए. (तत्त्वज्ञान) या पदव्या मिळवल्या. १९६३ साली त्यांनी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा सामाजिक विचार' या विषयावर डॉक्टरेट मिळवली. १९७१ साली राज्यशास्त्रविषयात त्यानी एम. ए. केलं–७३ साली त्यांना डी. लिट. ही पदवी मिळाली! त्यांनी डॉक्टरेटच्या प्रबंधासाठी आंबेडकरांच्या सामाजिक विचाराचा अभ्यास करायचं ठरवलं तेव्हा अनेकांनी हा डॉक्टरेटचा विषय कसा होऊ शकतो असा आक्षेप घेतला होता! डॉ. आंबेडकर हे तत्त्वज्ञ कुठे होते असा या मंडळीचा प्रश्न होता; पण डॉ. जाटव यांचे मार्गदर्शक डॉ. बी. जी. तिवारी यांनी त्याची बाजू लढवली आणि आक्षेप दूर केले.

डॉ. जाटव हे मूळचे उत्तर प्रदेशातले असले तरी गेली १७।१८ वर्षे ते राजस्थानमध्येच आहेत आणि आता ते तिथंच स्थायिक झाले आहेत. राजस्थानातील आंबेडकरी चळवळीचा, दलितांच्या स्थितीचा त्यांनी जवळून अभ्यास केलेला आहे. याबाबत त्यांची भेट घेतली त्या वेळी झालेली प्रश्नोत्तरं–

**प्रश्न :** तुम्ही स्वतः इतक्या पदव्यामागून पदव्या घेत गेलात ते कोणाच्या प्रेरणेतून?

**डॉ. :** अर्थातच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासूनच मी प्रेरणा घेतली. १९५३ च्या सुमाराला आग्रा येथील पंडित मोतीलाल यांनी मला धनंजय कीर याचा आंबेडकरावरील ग्रंथ दिला. तो वाचून मी भारावून गेलो. समाजासाठी बाबसाहेबानी केलेला त्याग पाहून आपणही इथं काही करावं असं वाटू लागलं. त्याहून जास्त प्रभाव पडला तो बाबासाहेबाच्या विद्याप्रेमाचा! ते चरित्र वाचून आपणही जास्तीत जास्त वाचन करायचं, पदव्या मिळवायच्या अशी उत्कट प्रेरणा मिळाली.

**प्रश्न :** राजस्थानात दलितांची स्थिती कशी आहे?

**डॉ. :** इथं महाराष्ट्रात ज्याप्रमाणे महार जातीची संख्या आणि प्रभुत्व जास्त आहे त्याप्रमाणे तिथं मेघवाल ही दलितजात पुढारलेली आहे. त्याची स्थिती बरीच चांगली आहे. राजस्थानमध्ये मुख्यतः कमाल जमीन धारणा कायद्याखाली मिळालेल्या

जमिनीचं वाटप दलितांमध्ये मोठ्या प्रमाणावर करण्यात आलं. शिवाय बिकानेरचे महाराज गंगासिंह यानी स्वातंत्र्यपूर्वकाळात आपल्या संस्थानात दलितांना बरीच शेतजमीन दिली. शिवाय गंगानगर वगैरेसारख्या जिल्ह्यांमध्ये तर दलितांना त्यांनी घरांसाठीही जमीन दिली आणि अनेक दलितांना वसवलं. त्यामुळं गंगानगर, बिकानेर, चुरू यासारख्या जिल्ह्यांमध्ये दलितांचं प्रमाण ३५ ते ४५ टक्के इतकं आहे आणि अनेक वेळा त्यांची मतं निर्णायक स्वरूपाची ठरतात ! बांसवाडा, चितोडगड, भीलवाड यासारख्या जिल्ह्यांमध्ये आदिवासींचं प्रमाण बरंच आहे. भरतपूर, जयपूर वगैरे जिल्ह्यांमध्ये दलिताकडे जमिनी फारशा नाहीत; पण हा भाग शेती आणि उद्योगाच्या दृष्टीने पुढारलेला आहे. त्यामुळं तिथं रोज १५ रुपयांपर्यंत मजुरी मिळू शकते. या भागात दलितांना उपासमारीचा प्रश्न भेडसावत नाही.

प्रश्न : दलितांमध्ये शिक्षणाचं प्रमाण किती आहे ?

डॉ. : जवळजवळ वीस टक्के असावं. राजस्थानमध्ये जवळपास ८५ टक्के महाविद्यालयं सरकारी आहेत. तिथं अनेक सवलती मिळतात. शिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणुकीमुळेही दलितांमध्ये शिक्षण घेण्याची जिद्द दिसून येते. अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहंही आहेत. त्यांचाही फायदा होतो.

प्रश्न : आंबेडकरी-चळवळीची स्थिती तिथं कशी आहे ?

डॉ. : त्या भागात बाबासाहेबांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या मृत्यूनंतर बराच वाढला. उत्तर प्रदेश आणि अन्य भागातून अनेक शिक्षित दलित राजस्थानात गेले आणि त्यानी बाबासाहेबांचा विचारही नेला. प्रत्येक जिल्ह्यात बाबासाहेबांच्या नावानं १०।१५ संस्था तरी आहेत. मात्र त्या सर्वच अतिशय प्रभावी आहेत, असं म्हणता येणार नाही. मेघवाल जातीत बाबासाहेबांबद्दल जेवढी आदर-भावना आढळते तेवढी भंगी जमातीत दिसून येत नाही. मात्र आता हळूहळू त्यांनीही आंबेडकरी विचारांचा स्वीकार करायला सुरुवात केली आहे. काही जणानी बौद्ध धर्मातही प्रवेश केला आहे. अनेक ठिकाणी बाबासाहेबाचा जन्मदिन आणि महापरिनिर्वाणदिन मोठ्या उत्साहानं साजरा केला जातो.

प्रश्न : रिपब्लिकन पक्षाचा कितपत प्रभाव आहे ?

डॉ. : मुळीच नाही. तिथल्या जवळपास सर्व दलितवर्गांचा ओढा रिपब्लिकन पक्षाकडे फारसा कधीच राहिलेला नाही.

प्रश्न : पण बाबासाहेबांच्या विचाराचा प्रभाव वाढत असताना असं का व्हावं ?

डॉ. : याला कारण महाराष्ट्रातल्या रिपब्लिकन पक्षातल्या आपापसातल्या लाथाळ्या आणि गटबाजी. राजस्थान काय किंवा उत्तर भारतातील इतर प्रांत काय, सर्व ठिकाणी दलितांच्या मनात महाराष्ट्रातील दलित-नेते आणि संघटना यांच्याबद्दल निराशा आणि राग आहे. बाबासाहेबाच्या स्वतःच्या प्रांतातच त्यांच्या अनुयायांमधली दुफळी पाहून परप्रांतातील दलितांना या नेतृत्वाबद्दल विश्वास वाटेनासा झाला आहे.

प्रश्न : राजस्थानातला दलित समाज राजकीय दृष्टीनं किती जागरूक आहे ?

डॉ. : राजकीय जागृतीचं प्रमाण फारच चांगलं आहे. एक उदाहरण देतो. अलीकडेच पंचायत निवडणुका झाल्या, त्यात शेकडो दलित पंच म्हणून निवडून आले आणि बरेच दलित सरपंच झाले.

प्रश्न : तिथं दलित-सवर्ण संघर्षाचं स्वरूप कोणत्या प्रकारचं आहे ?

डॉ. : शहरांमधून अस्पृश्यता मुळीच आढळत नाही. अनेक खेड्यांमध्येसुद्धा ती समस्या नाही. काही दुर्गम खेड्यांमध्ये स्पृश्यास्पृश्यतेचा प्रश्न आहे; पण त्याचं प्रमाण कमी होत चाललं आहे.

प्रश्न : मग दलित-सवर्णांमध्ये तणाव राखीव जागांवरून निर्माण होतो का ? राखीव जागांच्या कायद्याची अंमलबजावणी कशी होत आहे ?

डॉ. : शैक्षणिक क्षेत्रात ही अंमलबजावणी जवळजवळ १०० टक्के आहे असं म्हणता येईल. सरकारी कचेऱ्यामध्येही तक्रारीला फारसा वाव आहे असं वाटत नाही. उच्चस्तरीय जागा दलितामधून भरल्या जाव्यात म्हणून त्यांच्यासाठी खास परीक्षा घेण्याबाबत तिथं विचार चालू आहे.

प्रश्न : दलितामधल्या विविध जातीचे आपापसातील संबंध कसे आहेत ?

डॉ. : दुर्दैवानं याबाबत अजून खूपच निराशाजनक परिस्थिती आहे. खेडोपाडी अजून शेतीव्यवहार खुलेपणानं होत नाहीत- बेटीव्यवहाराची तर बातच नको !

प्रश्न : दलित स्त्रियांची परिस्थिती कशी आहे ?

डॉ. : दलित स्त्री अजूनही घरात कोंडलेली आहे. शिक्षणाचं प्रमाणही अगदीच नगण्य आहे.

प्रश्न : अंत्योदय योजनेबद्दल बराच प्रचार झाला ? वस्तुस्थिती काय आहे ?

डॉ. : अंत्योदय योजना ही आर्थिक निकषावर राबवण्यात आली. दलितांसाठी सरकारच्या वेगळ्या योजना होत्या. त्यामुळे या अंत्योदय योजनेत प्रामुख्यान व्हावी वगैरे अन्य मागासवर्गीयांचा जास्त फायदा झाला. काही दलितानाही त्याचा लाभ मिळाला; पण प्रामुख्यानं इतर मागासवर्गीयानाच अंत्योदय योजना फायदेशीर ठरली.

प्रश्न : राजस्थानात दलिताचे प्रश्न मांडणारी काही नियतकालिकं आहेत का ?

डॉ. : बरीच आहेत. अजमेरहून प्रबुद्ध भारत, गंगानगरहून प्रियदर्शिका, जयपूरहून मंडी एक्स्प्रेस, मीरतहून भीमसनिक, मुझफ्फरनगरहून आंबेडकर पत्रिका इत्यादी साप्ताहिकं निघतात. चुरू नावाच्या जिल्ह्याच्या ठिकाणाहून 'दलित चेतना' नावाचं पाक्षिक निघतं. ही सर्व नियतकालिकं आंबेडकरी विचारसरणीची आहेत गंगानगरहून येत्या १४ एप्रिलपासून (आंबेडकर-जयती) 'समाज-रक्षक' नावाच एक साप्ताहिक सुरू होत आहे.

प्रश्न : देशात विविध ठिकाणी आंबेडकरी-विचारसरणीच्या प्रेरणेतून ज्या चळवळी चालल्या आहेत त्याची परस्परांना माहिती होण्याच्या दृष्टीनं काही प्रयत्न करणं आवश्यक आहे असं वाटतं का ?

डॉ. : फार उत्कटतेनं वाटतं अशा प्रकारची देश-पातळीवरली एखादी संस्था असणं अतिशय आवश्यक आहे

प्रश्न : तुम्ही याबाबत काही पुढाकार घेऊ इच्छिता का ?

डॉ. : मी माझ्या परीनं डॉ. आंबेडकरांसंबंधी ग्रंथ लिहीत आलो आहे; पण तुम्ही म्हणता तसं काही काम मी करू शकेन असं वाटत नाही. कारण माझ्यापाशी तेवढा वेळ

नाही. रोज सकाळी किमान ३ तास मी वाचन–लेखनात घालवतो. त्या वेळी कोणी भेटायला आलेलंही मला आवडत नाही; परंतु विविध राज्यातल्या आंबेडकरी चळ. वळींचा परस्पर-संपर्क वाढला पाहिजे हे मात्र खरं. मी स्वतः पुढल्या वर्षी मुदतपूर्व निवृत्ती घेऊन जयपूरमध्ये एक प्रकाशन-संस्था सुरू करणार आहे. डॉ. आंबेडकरांविषयी स्वस्त दरातली पुस्तकं प्रकाशित करायचा माझा विचार आहे. ☐

---

मुंबई वार्ता

# आश्रम. . .एक तटस्थ, काव्यात्म अनुभव

मुंबईच्या प्रत्येक उपनगराचं साधारण एक वैशिष्ट्य आहे. पुण्यातल्या माणसाला जसा गल्लीचा अभिमान तसा मुंबईकरही आपापल्या उपनगराचा आणि पूर्व–पश्चिम अशा जाती–पोटजातीचा अभिमान बाळगून असतो. आता खरी मुंबई संपते कुठे हा आणि उपनगरं सुरू होतात कुठे हा चांगला खडाजंगी मतभेदाचा मुद्दा होईल. दादरपलीकडे रहाणाऱ्या माणसांना अलीकडची माणसं उपनगरवासी म्हणतात; पण मुख्य भाग पाडायचे झाले, तर मध्यरेल्वेची उपनगरं आणि पश्चिम रेल्वेची उपनगरं असं म्हणता येईल. पश्चिम उपनगरं ही अधिक स्वच्छ आणि नीटनेटकी भासतात. अर्थात या सगळ्यांमध्ये वर्गविग्रहाची चढती भाजणी असते. तुम्ही मुंबईच्या जितके जवळ, तितकी तुमची पायरी वरची. तरीही खरं पाहिलं तर खारसारखं मॉडेल टाउन नाही! खारच्या एका भागात सुबक नीटनेटकी अपार्टमेन्ट घरं आणि त्याच्या शेजारीच धुरंधुर, गुप्ते, प्रधान अशा नावांच्या कुटुंबांचे जुन्या डौलाचे बंगले. वनश्री दाट आणि सुन्दर. आडवे-उभे रेखीव रस्ते.

पण खारच वैशिष्ट्य कोणतं तर रामकृष्ण मिशन. बारा ते चौदा रस्त्यांवर वसवलेला हा आश्रम. मुंबईतल्या खूप लोकांना अजून देखील त्याची फारशी माहिती नाही, मग बाहेरच्यांची तर गोष्टच सोडा! अर्थात गर्दी नाही हेच मुळी या आश्रमाचं सुखद वैशिष्ट्य आहे. रामकृष्ण मिशनच्या कार्याविषयी माहिती द्यावी असा काही इथे उद्देश नाही. त्या उद्देशानं मी स्वतः देखील तिथे गेले नव्हते. शनिवार–रविवारी तिथल्या हॉलमध्ये रामकृष्ण–विवेकानंदांवरती तास–दीड तासाची व्याख्यानं होतात. तिथे ग्रंथालय-वाचनालयही चागलं आहे. छोटं रुग्णालयही आहे. विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह आहे. असे विविध समाजोपयोगी उपक्रम तिथे चालतात. दसऱ्याला दुर्गापूजेचा देखणा महोत्सव असतो. गणपतीत गणपतीउत्सव असतो, तर नाताळात येशू खिस्ताचा जन्मोत्सव साजरा होतो. एवढंच काय, तर सगळ्या धार्मिक, पारमार्थिक आणि इहलौकिक गोष्टींची बूज इथे बऱ्यापैकी राखली जाते; पण या सगळ्यामध्ये, सगळ्या उत्सवांमध्ये या आश्रमाचा प्रसन्न गंभीर मूड मात्र कायम असतो. तिथली वसतिगृहाची, रुग्णालयाची काळपट करड्या रंगाची इमारत घनगंभीर वाटते एखाद्या योग्याप्रमाणे ध्यानस्थ वाटते. तिथं उभ राहिलं–विशेषतः संध्याकाळी, की भगव्या वेषातले स्वामी इकडे तिकडे फिरताना दिसतात, तर कधी पाढरा वेष केलेले ब्रह्मचारी एखाद्या स्वामीबरोबर हलक्या आवाजात बोलत असताना दिसतात. दुपारच्या प्रखर उन्हात खूपसा निर्मनुष्य वाटणारा हा परिसर आपलं गांभीर्य सोडत नाही, तर संध्याकाळच्या प्रकाशात इथले दिवेही काहीसे मंद वाटतात. तिथेच एक विवेकानंदांचा अर्धपुतळा आहे; पण त्याचं अस्तित्व या साऱ्यात एवढं बेमालूम मिसळून गेलं आहे की, निरखून पाहिलं तरच दिसेल!

त्याच्या शेजारीच मिशननं प्रकाशित केलेली पुस्तकं मिळतात. विवेकानंदाची व्याख्यानं, त्याचे आणि रामकृष्णांचे संवाद, चरित्रं हे सारं कसलंही प्रदर्शन न करता आदबशीर मांडलेलं असतं चकचकता पेपरबॅक नाही, आकर्षक अमुक रंगी मुखपृष्ठ नाही, भुरळ पाडणारी झिलई नाही, कापडी बाधणीचा तोरा नाही, तरीही इथलं पुस्तक सहज उचलावंसं वाटतं. काउंटरवरचे स्वामी तुम्ही उचललेलं पुस्तक पाहून त्याच्याशी जुळणारी इतर पुस्तकं अगदी तुमच्या नकळत समोर ठेवतील. बाकी व्यापारी–सेल्समनशिप अर्थातच शून्य. तुम्हाला बसून वाचायचं असेल तर पलीकडे वाचनालय आहेच. तिथंही असाच सुबक स्वच्छपणा आणि करडी शिस्तशीर प्रसन्नता. तशाच करड्या प्रसन्नतेनं जोपासलेली नेटकी बाग. चार–दोन झावळीदार नारळाची झाडं आणि भरगच्च रंगीबेरंगी गुलाबांचे ताटवे; पण तेही आपल्या भडकपणानं वातावरणाच्या शिस्तीला बाधा न येईल याची काळजी घेणारे!

तेराव्या रस्त्याच्या पलीकडे आहे रामकृष्ण आणि शारदादेवींचं मंदिर. छायाचित्र घेणं अशक्य व्हावं अशा घनदाट वृक्षानी वेढलेलं. त्याची छाया आणि तुरळक वाहनं यामुळं या रस्त्याचाही खाजगी रस्ताच बनला आहे. फाटकातनं आत गेलात आणि मंदिराचा दरवाजा उघडा असला तर थेट रामकृष्णांची मूर्ती दिसते; पण त्याआधी लक्ष वेधून घेते ती तुमच्या पायाखालची चिरेदार फरसबंदी आणि मऊ हिरवळ. समोरून पाहिलं तर मंदिराची दर्शनी भिंत दिसते, मागचा घुमटही दिमत नाही. मंदिर पिवळ्या ग्रॅनाइट स्टोन्सचं बनवलं आहे. आत शिरल्यावर लागतो तो मोठा हॉल. दोन्ही बाजूंना

पसरलेली लांबलचक गालिचासारखी जाजमं आणि भिंतीवरची देखणी पेंटिंग्ज वर्षानुवर्षे ती पेंटिंग्ज तशीच दिसतात. धुळीचा कण देखील इथे हात–पाय स्वच्छ धुऊनच येत असावा. शिसवी दरवाजांवरचं कोरीव काम आणि पसरट वाटणारं कमलपुष्प. अशीही कल्पना केली जाते की, कमलपुष्पात विवेकानंदांचं प्रतीक आहे.

गाभारा म्हटला की, संकुचित आणि निराकार असा आकार आणि काळोख आणि उग्र वास बंद करण्याची खोली, हे निराळं सांगायची गरज नाही. पण हे मंदिर म्हणजे एक सरळ आयताकृती हॉल आणि त्याचा केंद्रबिंदु असा एखादा व्याख्याता किंवा प्रवचनकार बसावा तशी वाटणारी पांढरी, शुभ्र संगमरवरी मूर्ती. अगदी साधी, अनलंकृत प्रदक्षिणा घालणाऱ्या ओवऱ्या आहेत. मूर्तीच्या अगदी मागच्या बाजूला भिंतीवर डोकं टेकून माणसं आपलं पापक्षालन करतात, पण भिंतीला पात्र काळिमा आणतात ! त्यासाठी इथं तेवढाच तुकडा वेगळा रंगवला आहे. सुरेखपैकी भरतकाम केलेले लांबसडक पडदे आणि त्या पडद्यांमागच्या भव्य खिडक्या या साऱ्यातून या संपूर्ण वास्तूला एक खुलेपणाचा, मोकळेपणाचा मूड आला आहे.


संध्याकाळी सातच्या सुमाराला इथे वाद्यांची जुळवाजुळव ऐकू येईल आणि मग सुरू होईल सुरेल आवाजातलं रवीन्द्र-संगीत! मुळातच आरती आणि भजनं ही सार्वजनिक वस्तु. तशात लोकसंगीत असं त्याचं भारदस्त नामाभिधान झाल्यापासून तर त्याच्या गोंधळ-गोंगाटात जी कायदेशीर भर पडली आहे, ती लोकलपासून ते सत्यनारायणाच्या महापूजेपर्यंत सर्वत्र पीडत असते. अर्थात त्याचेही चाहते आहेतच ! पण आश्रमात जाताना मात्र आरतीची वेळ साधूनच जावं असं वाटतं. झुळझुळतं सुरेल संगीत मनाला आल्हादकारक वाटतं. त्या संगीतामधला आर्तपणा आणि त्यातली तल्लीनता त्या संध्याकाळच्या गूढरम्य वातावरणात अधिकच गहिराई आणतो. एक क्षणभर तिथं बसावं. तुमचा ईश्वर, परलोक, परमार्थ इत्यादींवर विश्वास असो वा नसो, विवेकानंदांचं तत्त्वज्ञान तुम्ही माना अगर मानू नका, तुम्ही भाविक असा किंवा नसा, तुमच्याकडे पुरेशी संवेदनाक्षमता असली, तर या वातावरणाचं गांभीर्य आणि नितळ शांतता तुम्हाला अपील झाल्याशिवाय राहणार नाही.

सभागाराचा उजवीकडचा दरवाजा छोट्याशा बागेत उतरतो. मोजक्याच झाडावेलींच्या या बागेत लक्ष वेधून घेतो तो समोरचा लतामंडप. त्याखालचं एवढंसं तळं. तळ्यातली कमळं, रंगीत मासे, तळ्याच्या आरपार जाणारा छोटासा कमानदार आणि लुटुपुटीचा पूल. कुंपणाच्या भिंती उंच आणि त्यावर सोडलेल्या वेली. साऱ्याचा नेटका बंदिस्तपणा.

मंदिराच्या दुसऱ्या बाजूला शारदादेवींचं मंदिर. पहिल्या मजल्यावरचं. मूळ मंदिराच्या मानानं अगदी साधं. त्याची अनलंकृत दगडी भव्यता आणि संगमरवरी डौल इथं नाही. इथं आहे तो गेरूच्या रंगातला विरक्तपणा. मूळ मंदिर सोडलं, तर भोवतालच्या ओवरीचा अनाच्छादित भाग. मागच्या ओवरीत उभं राहिलं की, समोरचं दिसणारं दृश्य, हे पहाडी शैलीतलं चित्र द्विमिती सोडून त्रिमितीच्या वास्तवात आल्यासारखं वाटतं. खालची चकचकीत फरशी. मूळ इमारतीपासून थोडे पुढे येणारे सौध. त्यावर झुकणारी झाडं. त्यांचा काळपट हिरवा रंग, पानांची सळसळ, पक्ष्यांचा मंदावणारा किलबिलाट, खालची हिरवळ, बाजूच्या झाडीतून उमटणारा रामकृष्णमंदिराचा कळस आणि झाडांच्या पार्श्वभूमीला असणारं काळवंडतं आकाश.

जिना उतरून तुम्ही खाली येता. रस्त्यावर येता. डावीकडे उजवीकडे वळून मुख्य रस्त्याला लागता वाहनाची वाट बघायला लागता. गजबजल्या मुंबईत, झगमगत्या प्रकाशात तुमचं अस्तित्व हरवूनही जातं; पण या सगळ्यापासून दूर आश्रम असतोच. वर्ड्स्वर्थच्या डॅफोडिलससारखा. त्याची ट्रँक्विलिटी आणि पिक्चरस्कनेसही असतोच. ही ट्रँक्विलिटी धर्माची नसते,तत्त्वज्ञानाची नसते. ती असते त्या वास्तूची, भारावून टाकणाऱ्या वातावरणाची आणि सांद्र संगीताची. हा आश्रम म्हणजे एक तटस्थ, काव्यात्म अनुभव निखळ निधार्मिक !

—ललिता बर्वे

**लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी**

**लेखक : पु. ल. इनामदार**

**मूल्य : २० रुपये**

**राजहंस प्रकाशन, पुणे ४११ ०३०**

# विजयामुळे जबाबदारी वाढली

**मोहन शंकर कुलकर्णी, घाटकोपर**

साऱ्या महाराष्ट्राचे किंबहुना हिंदुस्थानचे ज्या निवडणुकीकडे लक्ष लागून राहिले होते त्या ठाणे लोकसभा मतदार संघात विजयश्रीने पुन्हा एकदा भारतीय जनता पार्टीच्या गळयात माळ घातली आणि श्री. जगन्नाथ पाटील यांना प्रचंड बहुमतांनी विजयी केले.

साऱ्या महाराष्ट्राचे या निवडणुकीकडे लक्ष राहाण्यास काही कारणे होती. मुंबईतील ६४ सूतगिरण्यातील २॥ लाख कामगार १८ जानेवारीपासून बेमुदत संपावर आहेत. या संपाबाबत सरकारने योग्य ती भूमिका पार न पाडल्यामुळे कामगार नेते डॉ. दत्ता सामंत यांनी येथे उमेदवारी अर्ज भरला होता. त्यामुळे साहाजिकच २॥ लाख गिरणी-कामगारांबरोबर सरकारचेही डॉ. सामंतांच्या भवितव्याकडे लक्ष लागून राहिले होते. निवडणुकीत डॉ. सामंत विजयी होणार की नाही ? झाले. तर काय होणार ? आणि नाही झाले तर काय होणार याच गोष्टीकडे साऱ्यांचे लक्ष लागून राहिले होते.

डॉ. सामंतांप्रमाणे भारतीय जनता पक्षाचेही काय होणार याकडेही सर्वांचे लक्ष होते. १९७७ साली कै. रामभाऊ म्हाळगींनी या मतदारसंघात नव्यानेच आगमन केले. त्या वेळच्या जनतालाटेत ते ७०,००० मतांनी विजयी झालेले असले तरी स्वकर्तृत्वावर १९८० साली त्यानी इंदिरालाटेला जोरदार प्रतिकार केला होता. आणि १०,००० चे मताधिक्य राखून त्यांनी ही जागा स्वत:कडे राखली होती! रामभाऊ म्हाळगींचे अकाली निधन झाल्याने ही जागा रिकामी झाली रामभाऊ म्हाळगींचे अनेक संकल्प अपुरे होते. काही पुरे झाल्याने लोकांच्या मनात रामभाऊंविषयी एक आदर होता. अवघ्या चार-पाच वर्षांत रामभाऊंनी आपली संघटना खेडापाडयात पोहचवली होती. असे असल्याने ही जागा कोणत्याही परिस्थितीत आपल्याकडेच ठेवावयाचा भाजपने संकल्प सोडला होता.

संकल्प सोडलेला असला तरी भाजपसमोर काही आव्हाने होती. एक म्हणजे नव्यानेच डॉ. सामंत या मतदारसंघात उतरल्याने त्याचा भाजपवर काही विपरीत परिणाम तर होणार नाही ना, अशी शंका नकळत मनात डोकावत होती. त्यातच सर्व विरोधकांचे ऐक्य न झाल्याने थोडी अडचण नाही म्हटले तरी जाणवत होती. म्हणूनच या निवडणुकीत रामभाऊंच्या जागेचे काय होणार याकडे दिल्लीकराचेही लक्ष लागून राहिले होते.

डॉ. सामंत आणि भाजप याबरोबरच इंदिरा कॉंग्रेसलाही ही निवडणूक एक आव्हानच होती अंतुल्यांच्या भ्रष्ट कारभाराने, महाराष्ट्रातील मंत्र्यांच्या आपापसातील गदारोळामुळे आणि ठाणे जिल्ह्यातील इंदिरा कॉंग्रेसमधील अंतर्गत कलहामुळे लोक आपणाला कोणता कौल देतील ही भीती इंदिरा कॉंग्रेसला होती; पण याहीपेक्षा अधिक भीती त्याना डॉ. सामंतांची होती ! तरीही इंदिरा गांधीकडे बघून लोक आपणाला मते देतील; पण मध्येच डॉ. सामंत आल्याने आता ही मते मिळणे अशक्य आहे याची जाणीव येथील इं. कॉं. नेत्यांना झाली होती. म्हणूनच खुद्द इंदिरा गांधीनी इं. कॉं. च्या नेत्या श्रीमती रामदुलारी सिन्हा यांना या मतदारसंघात खास प्रतिनिधी म्हणून पाठविले होते. इं कॉं. चे अनेक रथी–महारथी या मतदारसंघात ठाण माडूनच होते. मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यानी तर शेवटी-शेवटी आपल्या टीकेचा रोख भाजपवरून डॉ. सामंताकडे वळवला होता. म्हणूनच येथे इं. कॉं. चे भवितव्य काय, याकडे दिल्लीकराचेही लक्ष लागले होते.

ठाण्याच्या निकालाकडे महाराष्ट्राप्रमाणे साऱ्या हिंदुस्थानचेही लक्ष का लागून राहिले होते याची कारणे ही होत. ही जरी कारणे असली तरी यात अधिक भर मतदानाच्या टक्केवारीने पडली होती. डॉ. सामंत निवडणुकीस उभे राहिल्याने कामगारांत एक फार मोठा उत्साह आहे असे चित्र रंगविण्यात आले होते. म्हणूनच या वेळी येथे मतदान सुमारे ७० ते ७५ टक्के होणार असे डॉ. सामंतांचे कार्यकर्ते जाहीरपणे सांगत होते. भाजपला मात्र मतदान ५० टक्क्यांपर्यंत होईल असे वाटले होते. पण प्रत्यक्षात घडले विचित्र ! या एवढया मोठया मतदारसंघात एवढा प्रचार करूनही शेवटी ३८ टक्के मतदान झाले. मतदानाच्या दिवशी लांबलचक अशी एकही रांग नव्हती. लोक मतदानासाठी घरातून बाहेर पडण्याच्या मन:स्थितीत नव्हते. प्रत्येक मतकेंद्रावर लोकांची उपस्थिती विरळ भासत होती. निवडणुकीची व्यवस्था चोख राखण्यासाठी आलेले पोलीस कमालीचे कंटाळले होते. काही झाडाखाली आडवे होऊन नकळत डुलकीही काढत होते. हे चित्र बघून प्रत्येक पक्षाचे कार्यकर्ते कमालीचे निराश झाले. काय होणार, मतदान किती होणार याची एकच चिंता कार्यकर्त्यांना लागून राहिली होती. मात्र डॉ. सामंतांच्या गाडयातून लोकाना मतकेंद्रावर आणण्याचे काम सकाळपासून सातत्याने जोरात सुरू होते. हे चित्र पाहून इं. कॉं. च्या गोटात मात्र कमालीचा संताप व्यक्त केला जात होता.

मतदानाची ही टक्केवारी रात्री जेव्हा समजली तेव्हा निकालाचा अंदाज बांधणे सर्वांनाच कठीण झाले. मग प्रत्येक पक्षाच्या कार्यालयात कारणे शोधण सुरू झाले. उन्हाळा कडक असल्याने, सुट्टीसाठी लोक बाहेरगावी गेल्याने मतदान कमी झाले अशी कारणे मग पुढे येऊ लागली. कारणे कोण-

तीही असली तरी आता उद्या काय होणार याचीच सर्वांना चिंता लागली होती

इं. कॉं. च्या गोटात ही चिंता व्यक्त केली जात असली तरी 'कमी मतदान' हे भाजपच्या हिताचेच आहे, याचे गणित भाजप कार्यालयात मांडले जात होते.

आणि भारतीय जनता पक्षाचे हे गणित अक्षरशः खरे ठरले ! भाजपलाही वाटले नव्हते इतक्या प्रचंड मताधिक्याने भाजप उमेदवार श्री. जगन्नाथ पाटील हे येथे विजयी झाले. भाजप उमेदवार श्री. जगन्नाथ पाटील यांना १,४४,४५८ मते पडली तर त्यांचे नजिकचे इं. कॉं. चे उमेदवार अॅड. प्रभाकर हेगडे यांना ९९,६५१ मते पडली आणि पाटील ४४,८०७ मतानी विजयी झाले. या दोघांबरोबरच नव्यानेच मैदानात उतरलेले डॉ. सामंत यानी ७१८८५ मते मिळवली. हे तीन उमेदवार सोडता राहिलेल्या १२ उमेदवाराच्या अनामत रकमा जप्त झाल्या यात जनता पक्षाच्या श्री. दत्ता ताम्हणे यांचाही समावेश आहे. त्यांना १२,१६४ मते पडली.

### प्रत्येक फेरीत आघाडी

म्हणूनच ठाणे लोकसभा मतदारसंघात लढत होणार असे मी माझ्या 'माणूस'मधील खास वार्तापत्रात पूर्वीच म्हटले होते. ( १५ मे अंक) २० मे ला सकाळी जेव्हा मतमोजणी सुरू झाली तेव्हा प्रारंभीच्या काळात भाजपचे जगन्नाथ पाटील आणि डॉ. सामंत यांच्यातच खरी चुरस होती. पहिल्या तासात तर डॉ. सामंतानी पाटील यांच्यावर काही मतानी मात केल्याने ही लढत डॉ. सामंत आणि भाजप यांच्यातच होणार काय असे अनेकाना वाटू लागले. पण पाटील यांनी ही पोकळी काही मिनिटातच भरून काढली.

मतमोजणीच्या एकूण दहा फेऱ्या झाल्या. या दहाही फेऱ्यांचे वैशिष्ट्य असे की, पहिल्यापासून शेवटपर्यंत भाजपचे जगन्नाथ पाटील हे सदैव आघाडीवर होते.

१ ल्या फेरीत जनताचे दत्ता ताम्हणे यांना १,२४२, सामंत यांना १२, ६२६ भाजपचे पाटील यांना १५,२५४ व इं. कॉं.चे हेगडे यांना ९,७५९ मते पडली.

२ न्या फेरीत ताम्हाणे याना १,७३० सामंत ५,९६२, पाटील १५,९६० व हेगडे यांना १३,७४२ मते पडली.

३ ऱ्या फेरीत ताम्हाणे यांना १७,०५, सामंत १०,१९२, पाटील १६,८४८ तर हेगडे यांना १३,२६६ मते पडली.

४ थ्या फेरीत ताम्हाणे यांना १,५२७, सामंत १०,७७४, पाटील १४,१४१ तर हेगडे याना १४,५०१ मते पडली.

५ व्या फेरीत ताम्हाणे यांना १,२५४, सामंत १०,५७९, पाटील १४,०१२ तर हेगडे यांना १३,२५३ कते पडली.

६ व्या फेरीत ताम्हाणे यांना १,१९१, सामंत ८,४६९, पाटील १९,३३६ तर हेगडे यांना १०,९३२ मते पडली.

७ व्या फेरीत ताम्हाणे याना १,५६२, सामंत ५,२३०, पाटील २३,३१८ तर हेगडे याना १२,०९१ मते पडली.

८ व्या फेरीत ताम्हाणे याना १,१५५, सामत ४,३७३, पाटील १६,२८५ तर हेगडे याना ७,५९८ मते पडली.

९ व्या फेरीत ताम्हाणे यांना ७,६०, सामंत ३ ३२४, पाटील ८,४१७ तर हेगडे यांना ३,८४७ मते पडली आणि शेवटच्या १० व्य फेरीत ताम्हाणे यांना ४८, सामंत ३५३, पाटील यांना ९६६ तर हेगडे यांना २६२ मते पडली.

विधानसभावार जर आकडेवारी पाहिली तर बेलापूरपट्टीत डॉ. सामंतानी कमालीची आघाडी मारली तर मूरबाड या ग्रामीण भागात इं. कॉं. ने आपली इतर भागातील पोकळी भरून काढली व ते दोन नंबर वर आले.

ठाणे विधानसभा मतदार संघात जनता पक्षाला ३,९२७, डॉ. सामंत याना १८,६५४ भाजपला २३,५९८ तर इं कॉं. १५०१८ मते पडली.

बेलापूर विधातसभा मतदारसंघात जनताला २,४३५, सामंत यांना १९,४०१, भाजपला १३,७६० व इं कॉं. ला १५६०९ मते पडली. उल्हासनगर विधानसभा मतदार संघात भाजपने जोरदार आघाडी मारली. येथे जनताला ८०२, सामंतांना ५,८८८, भाजपला १६,४४३ व इं कॉं १२,७३७ मते पडली. अंबरनाथ विधानसभा मतदारसंघातही भाजपने आघाडी मारली. येथे जनताला १,२७५, सामंतांना १५,४६०, भाजपला २८,२७३ व इं. कॉं. १३८२८ मते पडली, कल्याण विधानसभा मतदारसंघात उल्हासनगरप्रमाणे येथे भाजपचे प्रा. राम कापसे हे आमदार असल्याने व भाजपचा बालेकिल्ला समजले जाणारे डोंबिवली हे गाव या मतदारसंघात येत असल्याने भाजपने येथे उल्हासनगरसारखीच आघाडी मारली. येथे जनताला २,५८२, सामंताना ९,३३७, भाजपला ३५,८२८ व इं. कॉं. ला १६,०४० मते पडली. शेवटच्या मुरबाड या मतदारसंघात मात्र इं कॉं. ने जोर मारला येथे इं. कॉं. च्या शांताराम घोलप या आमदाराचे मतदारसंघावर चांगलेच वर्चस्व असल्याने इं. कॉं. ला येथे सर्वात अधिक मते मिळाली. येथे जनताला १,१४३, सामंतांना ३,१४३, भाजपला १६,५३९ व इं. कॉं. ला २६,४२० मते पडली. मात्र वाखाणण्यासारखी गोष्ट अशी की, मुरबाडसारख्या खेडेगावातही भाजपची पायमुळे रुतत असल्यानेच येथे भाजपला १,५९९ मते मिळाली.

वरील सर्व आकडेवारीवरून एक गोष्ट सहज लक्षात येते की, या लोकसभा मतदारसंघातून जनता पक्षाचे पार उच्चाटन झाले आहे ! १९८० च्या विधानसभा निवडणुकीत जनताला किमान १५००० तरी मते मिळाली होती; पण या निवडणुकीत दोन कम्युनिस्टांनी आणि शे का. प. ने पाठिंबा देऊनही जनताला १५००० वरून १२००० वर घसरावे लागले. मग या बारा हजारात दोन्ही कम्युनिस्टांची मते किती ? शे. का. प. ची मते किती ? आणि एकट्या जनता पक्षाची मते किती ? जनता पक्षाप्रमाणे दोन्ही कम्युनिस्टांचे आणि शे. का. प. चेही या भागातून पार उच्चाटन झाले काय ?—खरं पाहिलं तर पडलेली ही बारा हजार मते दोन्ही कम्युनिस्टाची नाहीत, शे. का. प. ची नाहीत आणि जनता पक्षाचीही नाहीत. ती आहेत फक्त दत्ता ताम्हाणेंची ! गेल्या अनेक वर्षात ताम्हाण्यांनी आपले चारित्र्य धुतलेल्या तांदळाप्रमाणे राखून येथील लोकासाठी जे कार्य केले त्याची 'फुल नाही फुलाची पाकळी' म्हणून १२००० लोकानी त्यांना दिलेली ही १२००० मताची भेट आहे !

या मतदारसंघात रामभाऊंच्या वारसाचा अधिकार असतानाही जनता पक्षाने येथे आपला उमेदवार उभा केला. मोरारजी देसाईंपासून डॉ. सुब्रम्हण्यम स्वामीपर्यंत जनता

पक्षाच्या ज्या ज्या रथी-महारथींनी येथे भाषणे केली त्या सर्व भाषणात त्यानी इंदिरा कॉंग्रेस सोडून भाजपवरच अधिक टीका केली. एस. एम. जोशींनी तर भारतीय जनता पक्षाला जनता पार्टीतच यावे लागेल असे सांगून टाकले. एस. एम. नी कोणत्या आधारावर हे विधान केले हे त्यांचे त्यांनाच ठाऊक; पण त्याचा एक फायदा असा झाला की, भाजपचे सर्व तरुण जिद्दीने कामास लागले. काहीही होवो पण ही जागा मोठ्या मताधिक्याने जिंकायची अशी प्रतिज्ञा करून !

मतदानाच्या आधी दोन दिवस ज्या दोन घटना घडल्या त्याने मात्र इंदिरा कॉंग्रेसचा मृत्यू जवळ आणून टेकवला. इं. कॉं चे उमेदवार ॲड प्रभाकर हेगडे यांच्या प्रचारार्थ ठाणे येथे एक जाहीर सभा आयोजित केली होती. गाडीतून उतरून हेगडे स्टेजकडे जात असतानाच त्यांच्या पाठीमागून येणाऱ्या एका कार्यकर्त्यास एका पोलीस हेडकॉन्स्टेबलने अडविल्याने हेगडे त्या कॉन्स्टेबलवर भयंकर संतापले म्हणे ! संतापाच्या भरात त्यांनी कॉन्स्टेबलच्या गळ्याला हात घालून त्याला काही अपशब्दही बोलले म्हणे !

हेगड्यांच्या या वागणुकीने ठाण्यातील पोलीस कमालीचे संतापले; आणि सुमारे ५०० पोलीसानी ठाणे पोलीस कमिशनराच्या कचेरीवर याच्या निषेधार्थ एक मोठा मोर्चा काढला. हेगडेंनी भास्कर लक्ष्मण जगदाळे या हेड कॉन्स्टेबलला मारहाण केली व अपशब्द वापरले या संशयावरून हा मोर्चा काढला होता. मोर्चात हेगडेंना अटक करण्याचीही मागणी करण्यात आली !

निवडणुकीस उभ्या असलेल्या एका जबाबदार उमेदवाराने एका पोलीस कॉन्स्टेबलशी अशाप्रकारे वर्तन केल्याची बातमी येथील मतदारांनी जेव्हा वृत्तपत्रात वाचली तेव्हा साहजिकच त्याचे मत इंदिरा कॉंग्रेस विरुद्ध गेले.

### ठाकरेंचे भाषण

याच्याच जोडीला आणखी एका गोष्टीची भर पडली. निवडणुकीत इंदिरा कॉंग्रेसला शिवसेनेने पाठिंबा दिल्याने बाळासाहेब ठाकरेंची एक सभा येथे आयोजित केली होती. या जाहीर सभेत ठाकरेंनी काढलेले उद्गार लोकांना जेव्हा येथील वृत्तपत्रात वाचावयास मिळाले तेव्हा या भागातली सर्वच जनता कमालीची संतापली! ठाकरे आपल्या भाषणात म्हणाले की, 'आगरी जगन्नाथ पाटलाचे लोकसभेत काय काम ? त्यानी प्राथमिक शाळेत शेवटच्या बाकावर बसावे !'

मुख्यमंत्री बाबासाहेब भोसलेंच्या समवेत झालेल्या या जाहीर सभेत ठाकरेंनी असे उद्गार काढणे खरोखरच दुर्दैवाचे होय ! पण परिणाम उलटाच झाला. या मतदारसंघात ९०,००० आगरी समाज आहे. ठाकरेंच्या या विधानाने तो जर संतापला तर त्यात नवल काय ? आपल्या जातीचा ग्रामीण भागातील एक माणूस दिल्लीत जात असताना त्याची लायकी 'भट्टया' आणि 'शेवटच्या बाकावर' असल्या शब्दांनी काढली जाते हे आगरी सहन करू शकणार नव्हते. त्यांनी मतदानाच्या दिवशी या वाक्याचा पुरेपूर बदला घेतला आणि अखेर आगरी जगन्नाथ पाटलाला दिल्लीत पाठवलेच ! जगन्नाथ पाटलांच्या विजयानंतर डोंबिवलीत रात्री १२ वा. जी भव्य मिरवणूक काढण्यात आली. त्यात एका संतापलेल्या आगरी माणसाने गगनभेदी गर्जना केली की,

'अरे जा, जाउन सांग त्या बाळघाला आगरी गेला रं ऽ दिल्लीला !'

असं वारंवार होऊनही महाराष्ट्राचे राज्यकर्ते शिवसेनाप्रमुखाना धरून असतात ठाकरे आपल्याबरोबर असतील तर आपला विजय निश्चित हे जसं महाराष्ट्राच्या राज्यकर्त्यांना वारंवार वाटतं, तसं ते असतील तर पराभव निश्चित हे येथील आमजनतेला वाटतं. गेल्या काही वर्षांत जनतेने हा अनुभव पुन्हा पुन्हा घेतल्याने 'ठाकरे ज्यांच्यासमवेत ते नेहमीच पराभवासमवेत' असे त्यानी समीकरणच करून टाकलं आहे.

इंदिरा कॉंग्रेसच्या पराभवात भर टाकण्यास ह्या गोष्टी कारणीभूत झालेल्या असल्या तरी भाजपच्या विजयाचे श्रेय कै. रामभाऊ म्हाळगीच्या पुण्याईकडेच अधिक जाते. रामभाऊंनी या मतदारसंघावर जिवापाड प्रेम केलं. त्यानी कधी आपल्या बायकोची काळजी केली नाही की मुलाची ! शेवटच्या क्षणी अंथरुणावर असतानादेखील त्यांना एकच ध्यास होता. आपल्या मतदारसंघाचा ! त्यासाठी ते अखेरपर्यंत झटले. आपलं संपूर्ण जीवन त्यासाठी त्यांनी समर्पित केलं !

असं करत असतानाच अकाली निधन झाल्याने त्यांचे जे अधुरे संकल्प होते ते हाती घेऊनच जगन्नाथ पाटील निवडणुकीच्या शर्यतीत विजयासाठी उतरले. या शर्यतीत त्यांना शरद पवारांनी, रिपब्लिकन कांबळे-खोब्रागडे गटांनी, महाराष्ट्र मुस्लिम लीगने, लोकदलाने आणि नामदेव ढसाळ गटाने जो सक्रीय पाठिंबा दिला त्यामुळेच जगन्नाथ पाटील इतक्या मोठ्या मतानी या शर्यतीत विजयी झाले !

या विजयाने त्यांच्यावर अधिकच जबाबदारी येऊन ठेपली आहे. रामभाऊ म्हाळगीच्या अनेक योजना अधुऱ्या आहेत. या कामाच्या फायली असलेली चार मोठी खोकी नुकतीच दिल्लीहून ठाण्यात आणली आहेत ह्या सर्वांचा अभ्यास जगन्नाथ पाटलांना करावयास हवा. त्या अधुऱ्या योजना कार्यान्वित करावयास हव्यात.

याचबरोबर या मतदारसंघात औद्योगिक अशांतता वाढत आहे. मफतलाल इंजिनिअरिंग आणि मर्फी रेडिओमध्ये काम करणारे सुमारे पाच हजार कामगार कोणत्याही मागण्याविना गेल्या पाच महिन्यापासून घरी बसून आहेत. सेन्चुरी रेयॉनमध्ये अन्यायकारक टाळेबंदी लादली आहे, तर नॅशनल रेयॉनमध्ये ही भीती व्यक्त केली जात आहे. कामगारात नैराश्य पसरलेले आहे. मालक हवा तसा धिंगाणा घालत आहेत. जगन्नाथ पाटलांना या समस्या जबाबदारीने व सावधानतेने सोडवाव्या लागतील. त्यांच्या विजयाने कामगाराच्या आशा उंचावल्या आहेत. रामभाऊंप्रमाणेच पाटीलही आमच्या प्रश्नाचा आवाज उठवतील अशी आशा कामगारांना वाटत आहे. पाटील यांना या समस्या सोडवाव्या लागतील, आवाज उठवावा लागेल आणि खराखुरा इं. कॉं. ला भाजप हाच पर्याय आहे हे त्याना करून दाखवावे लागेल आपल्या कर्तृत्वाने ! आपल्या कृतीने !

□

अवतीभवती । शरद कृष्णन्

# धक्कादायक निवडणूक निकालांनी इंदिरा काँग्रेसला तडाखा !

चार राज्यांमधील विधानसभा-निवडणुका तसेच इतर राज्यांमधील विधानसभेच्या पंधरा जागासाठी व लोकसभेच्या सात जागासाठी झालेल्या पोटनिवडणुकांचे निकाल सत्ताधारी पक्षाला मोठा तडाखा देऊन गेले आहेत ! केरळमधील इंदिरा काँग्रेसच्या नेतृत्वाखालील आघाडीला मिळालेले स्पष्ट बहुमत, पं. बंगाल विधानसभेमधील वाढलेली सभासदसंख्या आणि उदयपूर मतदारसंघामध्ये भाजपचे उपाध्यक्ष सुंदरसिंग भंडारी यांचा केलेला पराभव ही सोनेरी किनार सोडली तर इंदिराजींच्या मते खेचून आणण्याच्या सामर्थ्यावर विसावलेल्या इंदिरा काँग्रेस पक्षाला या निवडणुकीमध्ये खचितच मोठा तडाखा बसला आहे. भंडारीच्या पराभवाचे कौतुक बहुगुणा (गढवाल) जगन्नाथ पाटील (ठाणे) आणि बाबुराव परांजपे (जबलपूर) यांच्या नेत्रदीपक विजयामुळे एकदम पातळ होऊन गेले आहे. केरळमधील सरशीचे अप्रूप वाटू नये असे अपयश हरियाना आणि हिमाचलप्रदेशात या पक्षाच्या वाट्याला आले आहे. सत्ताधारी पक्षाने अंतर्मुख होऊन या पराभवाचे विश्लेषण करणे जरूर आहे. आठ-दहा महिन्यात कर्नाटक व आंध्रप्रदेश या बालेकिल्ल्यात विधानसभा-निवडणुका अपेक्षित आहेत. विद्यमान लोकसभेची मुदतही अर्ध्याहून अधिक सरून गेली आहे आणि म्हणूनच या निवडणुकाकडे मतदाराचा कल कोणत्या बाजूने आहे हे समजावून घेण्याच्या दृष्टीनेच पाहिले जात होते आणि सुस्तावलेल्या सत्ताधारी पक्षाला चटका बसावा एवढा झटका मतदारांनी जरूर दिला आहे !

## हरियाना व हिमाचलप्रदेश

हरियाना आणि हिमाचलप्रदेशामधील मतदारानी केवळ फाटाफुटीच्या तत्त्वशून्य ताकदीवर राज्य करणाऱ्या इंदिरा शासनाला मोठा तडाखा दिला आहे. भजनलाल मंत्रिमंडळामधील १४ पैकी १२ मंत्री पराभूत झाले आहेत. या मंत्रिमंडळाला असलेला आपला प्रखर विरोध मतदारानी पुरेशा तीव्रतेने नोंदवला आहे. ९० सदस्यसंख्या असलेल्या या राज्यामधील चार जागाचे निकाल निवडणूक आयोगाने राखून ठेवले आहेत. त्याचा कौल काहीही लागला तरी हरियानाच्या मतदारानी अस्थिरतेला आमंत्रण दिले आहे, यात शंका नाही. आयाराम-गयाराम राजकारणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या या राज्यामध्ये सत्तासंपादनासाठी लोकदल, भाजप आघाडी आणि इंदिरा काँग्रेस यांच्यामध्ये चुरस आहे. अपक्ष आमदाराची संख्या डझनभर असली तरी कोणी राज्य करावे हे ठरवणे त्याच्या हाती असल्याने सत्ता व संपत्तीची आमिषे दाखवून या आमदाराना आपल्याकडे खेचण्याचा जोरदार प्रयत्न चालू आहे. हरियानामध्ये राज्यपाल कोण आहेत हे काल-परवापर्यंत फारसे कोणाच्या गावीही नव्हते; परंतु मतदारानी असे समसमान मतदान केल्याने राजभवनामधील सुखासीन आयुष्यामध्ये निरास असणाऱ्या गणपतराव तपासे यांची झोप उडाली आहे. तपासे राज्यपाल झाले ते जनता राजवटीमध्ये. त्यांची निवड झाली ती प्रामुख्याने मोरारजीभाईंची मेहेरनजर झाल्याने. ते प्रथम उ. प्रदेशात होते; परतु इंदिरा सरकारने जसे सादिकअलीना मुंबईहून मद्रासला हलवले त्याप्रमाणे तपासे याची रवानगी लखनौहून चंडिगढला केली, तर आता या राज्यापालाकडे लोकदल-भाजप आघाडीचे नेते देवीलाल यानी आपण मंत्रिमंडळ बनवू शकत असल्याचा दावा केला असून राज्यपालानी त्यांना पुरेशा आमदाराचा पाठिंबा आहे याची खातरजमा करून त्याना मंत्रिमंडळ बनवण्याचा आदेश दिला असेल. देवीलाल याच्यामागे नाममात्र बहुमत असल्याने त्यांचे शासन किती दिवस सत्तेवर राहील याबाबत आजच भाकित करता येणार नाही; परतु मंत्रिमडळ स्थापन करण्याची संधी मिळाल्याने, सत्तेची उदड खैरात करून जास्तीत जास्त आमदाराना आपल्या शासनाकडे खेचण्याची क्षमता देवीलाल याना प्राप्त झाल्याने, सत्ता राबवणे अवघड असले तरी अशक्य नाही. इंदिरा काँग्रेस पक्षाने भजनलाल या तत्त्वशून्य नेत्याची पुन्हा पक्षनेतेपदी निवड केली आहे. देवीलाल सत्तेवर आले तर भजनलाल स्वस्थ बसणार नाहीत. काय वाटेल त्या कारवाया करून देवीलाल याना सत्ताभ्रष्ट करण्याचे झटून प्रयत्न होतील.

हिमाचल प्रदेशामध्ये भाजपला निर्विवाद बहुमत मिळेल असे प्रारंभी वाटले होते; परंतु प्रारंभी घेतलेली ही दिशा आपला पहिला आवेश टिकवू शकली नाही. इंदिरा काँग्रेसने भाजपच्या बरोबरीने वाटचाल केली. अगदी काटेकोरपणे बोलायचे झाले तर इंदिरा काँग्रेसला ६८ सदस्यसंख्या असलेल्या या राज्यात विधानसभेमध्ये २९ जागा मिळाल्या आहेत, तर भाजपला २८ जागा मिळाल्या आहेत. जनता पक्षाचे २ आमदार इंदिरा विरोधात उभे राहिले आणि अपक्ष उमेदवाराचे सहाय्य मिळाले तर भाजपला हिमाचल प्रदेशा-


मध्ये सत्ता राबवता येईल. हा मजकूर लिहीत असताना ६८ पैकी ६५ जागांचे निकाल घोषित झाले आहेत. प्रत्येक आमदाराचे डोके मोजणे भाग पडणार असल्याने उरलेल्या जागांच्या निकालांना महत्त्व आहेच. दरम्यान याही जागांचे निकाल घोषित होऊन हिमाचल प्रदेशात नवे शासन सत्तेवर आलेले असेल. अर्थात नाममात्र बहुमत लाभलेले हे शासन किती काळ सत्तेवर राहू शकेल हे सांगता येणार नाही. हरियाना व हिमाचल प्रदेश या दोन्ही राज्यांमध्ये मतदारांनी अशा पद्धतीने मतदान केले आहे की, राजकीय नीतिमत्तेबद्दल फारसे नाव नसलेल्या या राज्यांमध्ये आमदारांच्या खरेदी–विक्रीची बाजारपेठ चांगल्यापैकी तेजीत राहील.

## प. बंगालवर मार्क्सवाद्यांची घट्ट पकड

प. बंगालमध्ये मार्क्सवादी उत्तम यश मिळवतील अशी अपेक्षा होती. मार्क्सवादी व त्यांचे मित्रपक्ष यांच्या जागांमध्ये घट झाली असली आणि खुद्द कलकत्त्यामध्येच मार्क्सवाद्यांना इंदिरा काँग्रेसकडून मोठा पराभव पत्करावा लागला असला तरी ५ वर्षे निर्वेध राज्य करता यावे एवढी मार्क्सवाद्यांची पकड कायम घट्ट आहे. मोठा विजय मिळाला असला तरी ज्योती बसू समाधानी नाहीत. कलकत्त्यामधील मोठ्या पराभवाबरोबरच त्यांच्या सहा सहकारी मंत्र्यांना मोठा पराभव पत्करावा लागला आहे. त्यामध्ये अर्थमंत्री डॉ. अशोक मित्रा यांचा पराभव मार्क्सवाद्यांना विशेष तीव्रतेने झोंबणारा आहे. अन्य पराभूत मंत्र्यांमध्ये चित्तव्रत मुजुमदार, बुधादेव भट्टाचार्य, महमंद अमीन यांसारख्या मंत्र्यांचा समावेश आहे. मार्क्सवादी मंत्री पराभूत झाले असले तरी मित्रपक्षाचे मंत्री निवडून आले आहेत. या पराभवाची बोच आणि कलकत्त्याच्या २२ पैकी ११ जागा गमावल्याची तीव्र खंत ज्योती बसूंना वाटत असली तरी सत्तेवर अद्यापही त्यांची घट्ट पकड कायम आहे. २९४ सदस्यसंख्या असलेल्या गृहामध्ये मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाला १७४ जागा मिळाल्या आहेत. याचाच अर्थ असा की, केवळ एकट्याच्या ताकदीवर सरकार टिकवण्याचे सामर्थ्य मार्क्सवादी याही वेळी टिकवून आहेत. त्यांच्या मित्रपक्षांपैकी क्रांतिकारी समाजवादी व फॉरवर्ड ब्लॉक सामर्थ्यशाली मित्रपक्ष असून या पक्षांचे अनुक्रमे १९ व २८ आमदार आहेत. भारतीय कम्युनिस्ट पक्षाला ७ जागा मिळाल्या असून सत्ताधारी आघाडीच्या पाठिंब्यावर अन्य ८ आमदार निवडून आले आहेत. २९४ सदस्यांच्या गृहामध्ये आघाडीला २३८ जागा मिळाल्याने सत्ता राबवण्यात तशी कोणतीही अडचण नाही. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे सहा मंत्री पराभूत झाल्याने नवीन चेहरे दिसणे स्वाभाविक आहे. या नवीन मंडळींमध्ये मुख्यमंत्र्यांचे राजकीय सचिव–शंकर गुप्ता यांचा समावेश अपेक्षित आहे. नवीन विधानसभेमध्ये इंदिरा काँग्रेसची परिस्थिती पुष्कळच सुधारली आहे इंदिरा काँग्रेसची सदस्यसंख्या २० वरून ४९ वर गेली असून या पक्षाचा मित्रपक्ष असलेल्या शरद पवार यांच्या समाजवादी काँग्रेसला ४ जागा मिळाल्या आहेत. खेरीज इंदिरा काँग्रेसच्या पाठिंब्यावर एक अपक्ष सदस्य निवडून आला असल्याने २९४ सदस्यांच्या गृहात सत्ताधारी पक्षाचे २३८ तर विरोधी पक्षांचे ५४ आमदार असतील. मार्क्सवाद्यांच्या नावाने बोटे मोडत पाच वर्षांचा कालावधी काढण्यापलीकडे हे आमदार फारसे काही करू शकणार नाहीत.

डाव्या कम्युनिस्ट पक्षाचा विशेष जोर असलेले आणखी एक राज्य म्हणजे केरळ. सत्ता संपादन करण्याचा झटून प्रयत्न केला असला तरीही केरळमध्ये डावे कम्युनिस्ट आणि त्यांचे मित्रपक्ष यांची डाळ शिजू शकलेली नाही. इंदिरा कांग्रेसच्या नेतृत्वाखालील आघाडीने तिथे स्पष्ट बहुमत मिळविले असल्याने करुणाकरन यांच्या नेतृत्वाखालील आघाडी सरकार हा मजकूर प्रसिद्ध होईपर्यंत तिथे सत्तेवर आलेले असेल. १४० सदस्यसंख्या असलेल्या गृहामध्ये केवळ सभापती श्री. जोस यांनी दिलेल्या निर्णायक मतावर ३–४ महिने

तिसरी आवृत्ती
संपत आली



सांगत्ये ऐका
रसिकांची, समीक्षकांची,
सर्वसामान्य वाचकांची
मान्यता लाभलेले
हंसा वाडकर यांचे
अनोखे आत्मचरित्र
किंमत : बारा रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

सत्ता राबवणाऱ्या श्री. करुणाकरन यांना स्पष्ट बहुमत संख्येच्या दृष्टीने फार मोठे नसले तरी सुखावह वाटेल. अर्थात आघाडी सरकारचा तसा भरवसा देता येत नाही. ६ सदस्य असलेला मणी याचा केरळ काग्रेसचा गट जरी फुटला तरी करुणाकरन याचे शासन धोक्यात येऊ शकेल. डाव्या कम्युनिस्टाच्या नेतृत्वाखालील विरोधी आघाडीची सदस्यसंख्या ६३ असल्याने सत्ताधारी आघाडीवर चांगलाच दबाव राहू शकेल. शरद पवार याचे नेतृत्व झुगारून अँथनी इंदिरा काँग्रेसच्या वळचणीला जाऊन उभे राहिले पण त्याच्या गटाचा प्रभाव चांगला टिकून असून ते इंदिरा काँग्रेसबरोबर जवळजवळ बरोबरीच्या नात्याने सत्ता राबवतील. आघाडीमध्ये इंदिरा काँग्रेसला २० तर अँथनी गटाला १५ जागा मिळाल्या आहेत. शरद पवारांशी निष्ठा कायम ठेवणाऱ्या गटाने डाव्या आघाडीशी हातमिळवणी केली होती. त्यांच्या या दोस्तीला बऱ्यापैकी फळ मिळाले असले तरी अँथनी याची डाव्या कम्युनिस्टापासून फारकत घेण्याची भूमिका मतदारानी उचलून धरली आहे. समाजवादी काँग्रेसच्या ७ सदस्यांना आता विरोधी पक्ष म्हणून आपल्या सहकारी पक्षाबरोबर काम करावे लागेल. केरळमधील परिस्थिती हरियाना व हिमाचल प्रदेश यापेक्षा बरी असली तरी हे नवीन आघाडी सरकार पाच वर्षे सत्ता राबवू शकेल असे कोणालाच वाटत नाही. म्हणजेच ज्या चार राज्यामध्ये निवडणुका झाल्या त्यापैकी एक प. बंगालचा अपवाद वगळता आज सर्व राज्यांमध्ये दोलायमान खुर्चीत विसावलेले शासन सतत पहावे लागेल. सत्ताबदल, राष्ट्रपती राजवट, नवे शासन आणि अगदी नाइलाज झाल्यावर फेरनिवडणुका या साऱ्या पर्वातून या तिन्ही राज्यांना, विशेषतः हरियाना व हिमाचल प्रदेश याना जावे लागेल. केरळमध्ये तिसरी शक्ती उभी करण्याच्या इरादाने भाजपने ६९ जागा लढवल्या. राष्ट्रीय स्वयंसेवक सघाचे काम, हिन्दू सघटनेला मिळालेला प्रतिसाद याचा लाभ मिळून आपल्याला केरळ विधानसभेमध्ये २५ जागा तरी मिळतील असा या पक्षाचा अंदाज होता. पण या पक्षाला दारुण पराभव पत्करावा लागला. लढवलेल्या ६९ जागापैकी ६८ जागी इतका जबर मार खावा लागला की, या पक्षाच्या उमेदवारांची गंभीर दखलही घेतली गेली नाही. केरळमधील पराभव खचून जावे असा असला तरी हरियानामध्ये सत्तेमधील दुय्यम भागीदारी, हिमाचलप्रदेशामध्ये शक्तीशाली पक्ष म्हणून भाजपने आपले सामर्थ्य दाखवून दिले आहे. लोकसभा पोटनिवडणुकीमध्ये पक्षाचे उपाध्यक्ष सुन्दरसिंग भंडारी याचा पराभव बोचरा असला तरी बाबूराव परांजपे यांनी जबलपूर सर करून या पराभवाची बोच बोथट केली आहे. खेरीज ठाणे यशस्वीपणे झुंजवल्याचे समाधान आहेच.

विधानसभेसाठी ज्या अन्य निवडणुका झाल्या त्यांपैकी कर्नाटक व गुजराथमधील विजय इंदिरा काँग्रेसला सुखावह वाटणारे आहेत. मतांचे प्रमाण घटले असले तरी या जागा कायम राखण्यात इंदिरा काँग्रेसने यश मिळवले आहे.

### हेमवतीनंदन बहुगुणा लोकसभेत दाखल

लोकसभेच्या सात पोटनिवडणुकींपैकी सर्वांत महत्त्वपूर्ण निवडणूक उ. प्रदेशमधील गढवाल येथे लढवली गेली. लोकशाही समाजवादी पक्षाचे संस्थापक अध्यक्ष हे भाजपसह अनेक मित्रपक्षाच्या खांद्यावर बसून लोकसभेमध्ये दाखल झाले. त्यांनी उ. प्रदेशचे एक मंत्री श्री. सी. एम्. एस्. मंत्री याचा चागला अठ्ठावीस हजार सहाशे मतांनी पराभव केला. लोकसभा पोटनिवडणुकीमध्ये काँग्रेसला अनेक दणके बसले. पैकी जबलपूरला भाजपने दिलेला दणका विशेष तीव्र मानला पाहिजे. विद्याचरण शुक्ला यांनी आपले सारे कौशल्य येथे पणाला लावले. मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री या निवडणुकीमध्ये जातीने लक्ष घालत होते; पण मतदारांनी भाजपच्या पदरी यश घालून इंदिरा काँग्रेसला मध्यप्रदेशात लागोपाठ दुसरा दणका दिला. चारच महिन्यांपूर्वी सागरची लोकसभेची जागा या पक्षाने जिंकली होती. ठाणे लोकसभा मतदार संघातही भाजपने मोठे यश संपादन केले. उदेपूर मधून सुदरसिंग भंडारी पराभूत झाले खरे; परंतु भाजपमधील अंतर्गत संघर्ष हेही त्याचे एक कारण होते. माजी मुख्यमंत्री व भाजपचे प्रमुख आधारस्तंभ शेखावत यानी या निवडणुकीमध्ये म्हणावे तसे लक्ष घातले नाहीच. उलट राज्यशासनाकडून ४ लाखाची मदत घेऊन ते हृदयावरील शस्त्रक्रिया करवून घेण्यासाठी अमेरिकेत निघून गेले. तथापी सात जागाच्या पोटनिवडणुकीचा विचार करता इंदिरा काँग्रेसला फार मोठा तडाखा बसला यात शंका नाही. ज्याचे अपूर्व वाटावे अशी उदेपूरची एकमेव जागा या पक्षाने जिंकली. बिहारमधील दोन जागा जिंकल्याचे समाधान, जबलपूर, मध्यप्रदेश, ठाणे (महाराष्ट्र) डायमंड हार्बर (प. बंगाल) आणि सर्वांत प्रतिष्ठेच्या समजल्या गेलेल्या गढवाल (उ. प्र.) मधील पराभवाने साफ निघून गेले. डायमंड हार्बर येथे तर डाव्या कम्युनिस्टाकडून इंदिरा काँग्रेसला एक लाख पंधरा हजार मतानी पराभव पत्करावा लागला.

या निवडणूक-निकालांनी इंदिरा गांधी या नावामधील जादू झपाट्याने कमी होऊ लागल्याचे दाखवून दिले आहे.

□

सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही.
—डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

उत्तरमीमांसा : ५२

स. शि. भावे

# आशय की अभिव्यक्ती

माझा मित्र रागावला होता. रागावला होता म्हणजे खरे तर रुसला होता. रुसण्याचे कारण कुणाला पटू नये इतके साधे अन् गमतीदार होते.

सहा महिन्यानी तो घरी आला होता. एकुलत्या बहिणीने आल्या आल्या, 'काय रे गधड्या', असे त्याचे स्वागत केले होते. त्याचा हा रुसवा होता.

तो आल्याचे कळून मी त्याच्याकडे गेलो. रुसवा कमी झाला होता; पण पुरता संपला नव्हता. त्याची बहीण खिदखिदत होती. तो खदखदत होता. त्यांचे आईवडील त्या भाऊ-बहिणींकडे गमतीने बघत होते.

'ही माझ्यापेक्षा तेरा वर्षांनी लहान. हिनं मला गधड्या म्हणून हाक मारावी?' मी गेल्या गेल्या मित्राने विचारले

'मग तू नाही का मला बंड्या म्हणतोस? अगदी मैत्रिणींच्या देखत.' मी काही म्हणायच्या आतच मिनी फिसकारली.

'जाऊ दे रे दादा' आई म्हणाल्या, 'लाडानं म्हणाली ती. तू येणार म्हणून दोन दिवस नाचत होती. बघितल्याबरोबर खुशालली आणि म्हणाली गधड्या. शब्दावर काय चिडतोस? तिच मन बघ.'

'म्हणे मन बघ. मनात खवचटपणा होता म्हणूनच 'गधड्या' आलं. नाही तर लाडात असली की ती नेहमी मला 'दादा' किंवा 'दादिटल्या' म्हणते दादाने—माझ्या मित्राने स्पष्टीकरण केले.

मला वाटले, आपला मुद्दा रेटायला इथे चांगली संधी आहे. 'आशय व अभिव्यक्ति' यावर कॉलेजच्या दिवसापासून आमचा वाद होता. 'कलेत काय, साहित्यात काय, आशय व अभिव्यक्ति ह्या वेगवेगळ्या गोष्टी आहेत अन् त्यातही आशयाला महत्त्व असते, असे याचे मत. तर, 'आशय व अभिव्यक्ति यात अभेद्य एकात्मता असते, अन् अभिव्यक्ति हाच खरा आशय असतो,' असे माझे मत.

आता मला सुन्दर संधी मिळाली होती म्हणालो,

'दादा, मिनीच्या मनातला आशय तू समजून घे. तो महत्त्वाचा. अभिव्यक्ति दुय्यम. मिनी तुला गधड्या म्हणते की आणखी काही, हे महत्त्वाचं नाही. तुझ्या तत्त्वाप्रमाणे खरं म्हणजे तुला हे लवकर पटायला हवं.'

'उगीच आपला वाद इथं आणू नको!' दादाचा आवाज चिरकलेला होता. अर्थात त्याचा राग अजून कमी झाला नव्हता. 'मिनीचे शब्द कसे नेमके, निवडलेले असतात, तुला ठाऊक नाही. तिला प्रेमानं म्हणायचं असतं तर तिनं दाद्या म्हटलं असतं. मलाही ते आवडलं असतं. खर तर मला ते आवडतं, हे तिला बरोबर ठाऊक आहे. म्हणूनच तिनं दाद्या म्हटलं नाही. गधड्या म्हटलं की मी चिडतो हे तिला माहीत आहे. मला चिडवण्यासाठीच गधड्या म्हटलं' दादाने विश्लेषण पूर्ण केले.

'काय ग मिने, दादाला चिडवण्यासाठी तू गधड्या म्हणालीस का?' मी मिनीची साक्ष काढली. त्यावर काही न बोलता ती नुसती हुप्प होऊन बसली.

'तू तरी एकेका शब्दावर काय अडून बसतोस? दाद्या जर तुला चालतो, तर गधड्या का चालू नये? दोन्हीत सारखाच अनौपचारिकपणा, सारखीच आपुलकी नाही का?'—मी मध्यस्थी पुढे चालू ठेवली.

'तुला नाही ते कळायचं. त्यातली गंमत मिनीला नि मला, दोघानाच माहीत आहे. ह्या गधडीला ती बरोबर माहीत आहे.' बोलता बोलताच तो हसू लागला होता. गधडीला ही खूण पटली असावी. हुप्पपणा सोडून ती पुन्हा खिदखिदायला लागली. दोघांचे खुणेचे हसणे सुरू झाले. आईबाबाही मोकळे झाले. एकत्र हसणाऱ्या मुलाकडे कौतुकाने बघत राहिले.

¤

दादाला वादात ओढायची माझी प्रेरणा मात्र कायम होती.

'अभिव्यक्ति हाच खरा आशय असतो, हे आता स्वानुभवावरून तरी तुला पटायला पाहिजे,' मी त्याच्या हसण्यातून त्याला बाहेर काढला.

'ते कसं?' हसण्यातून तो अजून पुरता बाहेर पडला नव्हता. म्हणून त्याने प्रांजळपणाने विचारले,

'असं पहा. दाद्या काय, गधड्या काय, साधे दोन शब्द; पण मिनीनं वापरल्याबरोबर ते साधे राहत नाहीत दाद्याचा आशय वेगळा ठरतो. गधड्याचा आशय वेगळा होतो. मिनीच्या मनात काय आहे याला — म्हणजे आशयाला — तू महत्त्व दिलं नाहीस. उलट अभिव्यक्तीत आशय शोधलास.' — मी माझा युक्तिवाद मांडला.

'मग त्यात माझं काय चुकलं? मिनीच्या मनात ते शब्द वापरताना वेगळ्या वेगळ्या गोष्टी असतात. तिच्या वहिनीचा रेफरन्स द्यायचा झाला की ती गधड्या म्हणते. मला माहीत आहे. ती बघ अजून हसतेय खाली मान घालून.'— मित्र अजूनही प्रांजळपणाच्या रंगात होता.

'तेच तर मी म्हणतोय. तुझं अगदी बरोबर आहे. दाद्या म्हटलं की आशय वेगळा. गधड्या म्हटलं की आशय वेगळा. आता आपलंच बघ. मी जर तुला गंगाधर किंवा गंगाधरपंत म्हटलं तर तुला काय वाटेल?' — मी.

'तू काही तरी खवचटपणा करतोयस असंच मी म्हणेन.' — मित्र, ऊर्फ दादा, ऊर्फ गंगाधर म्हणाला.

'आणि गंग्या म्हटलं तर?' — मी.

'तर तू खरा मुडात आहेस असं मला कळेल.' — मित्र म्हणाला. लगेच त्याला कसली तरी शंका आली असावी. चटकन् उसळून तो म्हणाला, 'पण ही आपली गोष्ट तू इथं का आणतोयस?'

'अशासाठी की त्यानं तरी तुला सत्य काय ते ध्यानात येईल.' — मी.

'सत्य? कसलं सत्य?' — तो.

'आपल्या वादातलं सत्य. आशय आणि अभिव्यक्ती या वादातलं सत्य. यात सरशी अभिव्यक्तीची हे तूच आत्ता तुझ्या नि आपल्या अनुभवावरून सिद्ध केलस. फॉर्म हा प्रकट. तो सिद्ध. 'कण्टेण्ट' हा 'फॉर्म' वरून अनुमानायचा. तेव्हा आता यानंतर तरी 'कण्टेण्ट'चा धोशा धरून राहू नका. 'फॉर्म'चे आणि 'कण्टेण्ट'चे अद्वैत कबूल करा, जाणवून घ्या म्हणजे तुमची विचारात गफलत होणार नाही.' — मी परिसवादाचा समारोप केला.

मित्र गप्पच होता. माझ्या म्हणण्यावर त्याला काही तरी म्हणावयाचे होते हे जाणवत होते; पण तो काही बोलला नाही. कदाचित् प्रवासाने दमला असेल किंवा घरी परतल्याने खुशालला असेल; पण हसून तो खाजगी विषयात शिरला.

¤

आज सकाळपासून परवाचा तो प्रसंग आठवतो आहे. कारण आज अनुभव तसाच येतो आहे.

ठरल्याप्रमाणे सात वाजता बाळकडे पोचलो. कारंजकरने नुकतीच गाडी आणून उभी केली होती. सरिता, सोनिया, पंकज ही बाळची मुले बॅगा डिकीत ठेवत होती. तेवढ्यात सौ. कारंजकर बाहेर आल्या. काऱ्याने ओळख करून दिली, 'हा माझा मित्र. प्राध्यापक भावे.'

वैनींनी नमस्कार केला; पण चेहऱ्यावर तशी ओळख उमटली नाही. तेवढ्यात बाळ्या बाहेर आला. त्याने वैनींना विचारले, 'काय वैनी सद्याची ओळख झाली की नाही?'

सद्या हा शब्द कानावर पडताच वैनींच्या डोळ्यात ओळख चमकली. 'कालपासून यांच्याच गोष्टी चालल्या आहेत. आता पटलं. 'पण तुम्ही मग प्राध्यापक भावे काय म्हणालात?' शेवटचा प्रश्न काऱ्याला उद्देशून होता.

'म्हटलं प्रथमच ओळख करून द्यायचीय. तर सभ्यपणा वगैरे राखावा.' कारंजकर मिस्किलपणे हसत म्हणाला.

'तुमच्या मित्रात कधी तरी तुम्ही सभ्यपणा ठेवता का? मुलंदेखील सच्च्याकाका, विठ्याआका, सद्याकाका असं बोलत असतात.' हा वेळपर्यंत मागे उभं राहून गप्प असलेल्या बाळवैनी म्हणाल्या.

मनात आलं, आम्ही आपापसात या वैन्यांचा कसा उल्लेख करतो ते सांगावे का? आमची अभिव्यक्ती सरळ, थेट आणि साध्यातली साधी आहे. सच्चितचा आमच्यात सच्च्या होतो, तर त्याची बायको होते सच्ची शऱ्याची शरी, श्याम्याची श्यामी, बाळ्याची बाळी आणि आता काऱ्या म्हटलं तर त्यांची कारी. त्याला आम्ही दाद्याही म्हणतो. तर मग ही दादी होईल.

इतकं सगळं मनात येऊन गेलं; पण मी गप्प बसलो. आम्हा मित्रांतला 'या'कार पाचवीपासून आहे; पण वैन्याच्या नावांचा हा 'ई'कार आमच्या–आमच्यात झकास जमला असला, तरी तो वैन्याना लगेच पचला नसता. शिवाय, सगळ्यांच्या मुलांनी आपापल्या आयांना त्याच नावाने हाका मारणे सुरू केले असते म्हणून मी गप्प बसलो. आशय 'तिरोभूत' करायचा तर अभिव्यक्ती रोखली पाहिजे. आशय काय व कोणता, हे अभिव्यक्तीवर अवलंबून असते ते असे.

पण बाळीच्या, म्हणजे बाळवैनीच्या, म्हणजे आशाच्या (अ) सभ्यपणाच्या आक्षेपाला मात्र उत्तर देणं भाग होतं. म्हणालो,

'वैनी, आमचा बारा जणांचा घुमळाच असा आहे. औपचारिकपणा, सभ्यता अशा प्रवृत्तींना या घुमळ्यात मज्जाव आहे. कोणी असं काही बोलायला लागलं की, याची प्रकृती ठीक आहे ना, अशी काळजी बाकीच्यांना वाटते. आम्ही सातारचे. त्या ग्रामीण विभागात आमची मैत्री बाल्यातून तारुण्यात लहानाची मोठी झाली. अर्थातच, ग्रामीण मनमोकळा, शब्दमोकळा ठसठशीतपणा हा आमच्या मैत्रीचा पिंड होऊन राहिला आहे. तुमच्या शुद्ध तुपातल्या मराठीत आमचा झुणक्याचा झणझणीतपणा जसाच्या तसा सामावला जाणार नाही!'

सामाजिक पार्श्वभूमी, पिंडधर्म, सामावणे असे समाजशास्त्रीय अभ्यासकाला आवडणारे शब्द मी हेतुपुरस्सर पेरले होते. बाळवैनी थोडाचाशा समाजशास्त्रज्ञ, थोड्याशा लेखक होत्या. आकाशवाणी–दूरदर्शनवर त्या नेहमी सामाजिक–कौटुंबिक चर्चेत–परिसंवादात भाग घेत. मात्र त्यांचा शेरा अगदीच अनपेक्षित होता.

'तुम्ही अगदी त्या विजय तेंडुलकरासारख बोललात, सच्चाशिवभावजी, आय मीन, सद्याभावजी.'

मी चमकलो. दिल्लीला राहून इकडच्या सांस्कृतिक तपशिलाविषयी त्या इतक्या सजग असतील असे वाटले नव्हते; मी पण परिसंवादातला ठरीव, स्टॉक, प्रश्न विचारला, 'म्हणजे कसं?'

तेंडुलकर नाही का म्हणाले होते? 'घिधाडां'संबधी बोलताना? की ज्या प्रवेशात, ज्या पात्राला, शिव्या अपरिहार्य आहेत, तिथे शिव्या न वापरणं, ही अश्लीलता आहे.' बाळवैनींनी तेंडुलकराचे वाक्य जसेच्या तसे सांगितले.

त्यांनी ते वाक्य उच्चारले मात्र, आमच्या मित्रमंडळाच्या पौराणिक प्रथेप्रमाणे त्याची नक्कल लगेच सुरू झाली. (जिथे श्रोत्यांनी वक्त्याला धपाटा घालणं अपरिहार्य आहे,


**दलित-दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारे**

**गोष्टीरूप आंबेडकर चरित्र**

सर्व मराठी मुलांच्या हाती हा 'कथा-संग्रह' देणे योग्य ठरेल! दलित–दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारा हा स्फूर्तिदायक कथा-संग्रह संस्कारक्षम मुलांना अत्यंत उद्बोधक वाटेल. इतिहासाचे सर्जनशील साहित्यात कथारूपाने जे रूपांतर होते ते सिद्धहस्त लेखक कसे सोन्यासारखे करून दाखवितो त्याचा पुरावा बागुलांच्या या गोष्टीरूप चरित्रातून मिळतो.

–रा. ग. जाधव

(केसरी, रविवार, ६-१२-८१)

# आं बे ड क र भा र त

**लेखक बाबुराव बागुल**

**राजहंस प्रकाशन, पुणे. मूल्य : वीस रुपये**

तिथे तो न घालणं ही अनैतिकता आहे.' 'जिथे नाटक, ते कंटाळवाणं किंवा बोअर, असल्यानं न जाणं अपरिहार्य आहे तिथे सांस्कृतिक प्रथेचा गुलाम बनून जाणं ही खरी असंस्कृतता आहे.'

वाद तसाच बारगळला. टारगटपणा करीत, सामूहिक गाणी म्हणत, आमची गाडी साताऱ्याच्या रस्त्याला लागली, 'ही अपरिहार्यता कोणी, कशी ठरवायची?' हा प्रश्न मी मधून-मधून विचारत होतो; पण कोणीही माझ्या प्रश्नाकडे गंभीरपणाने लक्ष दिले नाही. एकूण चाललेल्या टारगटपणाचाच तो एक भाग आहे, असे मानून एकदा काऱ्या त्यावर भयंकर खो खो हसलासुद्धा! त्याच्या अभिव्यक्तीतून त्याच्या मनातील आशयाची अपरिहार्यता माझ्या ध्यानात आली. माझ्या प्रश्नाचा नाद मी सोडून दिला. वाद सोडून शहाणपणाने गप्प बसणे हीही अभिव्यक्तीच. आतला समजूतदारपणाचा आशय समव्याप्तीने व्यक्त करणारी.

■

आम्ही आता लिंबला होतो. गाडी, एसटी तळावरच ठेवली होती. अर्धा गाव आणि अर्धे शिवार तुडवून कृष्णेच्या काठावर उभे होतो. कालच पाऊस झाला होता. वाटेत फुफाटा तर नव्हताच. ती चांगली दमट; मऊ झाली होती. सूर्य वर आला होता तरी प्रकाश ढगाळ होता.

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य दहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

प्रवाहात मधोमध मोठा खडक. दोन्ही बाजूंनी कृष्णेने कवेत घेऊन सुरक्षित केलेला. प्रवाहाच्या दोन्ही तीरांवर कंगोरलेले खडकच खडक. ठिकठिकाणी मुरडलेले, खळखळते पाणी. हिरवे-निळे मोरपंखी. जांभळे देखील. मधल्या मोठ्या खडकावर मध्यम आकाराचे देऊळ. पूर्वेकडे मुख. देवळासमोर मोठा नंदी. पलीकडे नगारखाना. त्यापलीकडे पायऱ्या. थेट कृष्णेच्या पूर्वप्रवाहात जाणाऱ्या. देवळाच्या भोवताली अष्टकोनी जोते. घडीव, जड दगडांनी बांधलेले. नदीच्या अल्याड-पल्याड वाटा. एक लिंबाहून आलेली. दुसरी गोव्याला जाणारी. वाटाच्या दुतर्फा विटकरी रंगाची जमीन. चवदार फळाची. दुतर्फा पेरूंच्या लगडलेल्या बागा. बागाच्या पलीकडे हिरवीगर्द राई. राईभोवतालून निळ्या डोंगरांच्या रांगा. पूर्वेला समोर चंदन-नदन आणि जरंडा. पाठीमागे धावडशी. दक्षिणेला दूरवर अजिंक्यतारा. वायव्येला पाचगणीचे पठार. सगळीकडून नजर फिरून पुन्हा पायाशी आली की समोर देऊळ, कोटेश्वराचे.

दृश्य इतके बेहोष करणारे, स्थळ इतके नाजूक, कोवळे. मनात आले, किती थोड्या लोकांना ही जागा माहीत आहे! पुन्हा मनात आले, थोड्यांना माहीत आहे, हेच बरे आहे. पुण्यापासून अवघ्या शंभर किलोमीटर अंतरावर, मोटारीने अर्ध्या दिवसात जाऊन येण्याजोगी ही जागा आहे असे जर जास्त लोकांना कळले, तर लिंबगोव्याच्या कोटेश्वरचे बकाल महाबळेश्वर होण्यास वेळ लागणार नाही!

'संकल्प सोडायला येणार ना?' गुरुजी विचारीत होते. कोटेश्वर हे बाळचे कुलदैवत. गोवे हे त्याचे गाव. देव, गाव, गावातला पडायला आलेला वाडा, संन्यास घेतलेल्या पणजोबांची समाधी, सारे सारे त्याला मुलांना दाखवायचे होते.

वाटेत नीरा नदी ओलांडून सातारा जिल्ह्यात शिरता शिरता मी त्याला विचारले होते, 'तू एवढा त्यांना घेऊन आला आहेस, त्यांच्या लक्षात तरी राहणार आहे का नंतर? तू दिल्लीला. मुलं देशात तरी राहतील का, खात्री नाही. पुन्हा तू सुद्धा कोटेश्वरला येशील की नाही कोण जाणे! मुलं तर नाहीच येणार!'

'बघू या!' बाळ नेहमीच्या धीमेपणाने म्हणाला, 'स्पष्ट नाही, तरी पुसट पुसट त्यांच्या लक्षात राहील असं वाटतं.'

गुरुजीच्या बोलावण्याने मी भानावर आलो. मला हा वाटेतला संवाद आठवला. मी वळून पाहिले.

बाळने बुडी मारून ओले झालेले धोतर अंगावर ठेवले होते. गुरुजी सांगतील तसे तसे तो करीत होता. छोटा पंकज देखील बापाप्रमाणे सारे करीत होता. वाकत होता, दंडवत घालत होता. डोळे मिटून क्षणभर बसत होते. संकल्प-संपल्यावर तो वडिलाच्या पणजोबांच्या समाधीपाशी गेला. बाळला विचारून विचारून म्हणू लागला : पंकज माधव, माधव गोविंद, गोविंद यशवंत, यशवंत दाजी, दाजी परशुराम......मग त्याने खाली वाकून समाधीसमोरच्या मातीवर डोके टेकले. त्याने तोंड वर केले. त्याच्या मुखावरील कळा बदलली होती. तो थोडा गंभीर झाला होता. थोडा मोठा झाला होता...पलीकडे गोव्यात त्यांच्या वाड्यात जाताना, सीताआजींच्या पायावर शांतपणाने संपूर्ण मस्तक टेकताना तो गंभीरच होता. नव्या अभिव्यक्तीत ती पुरता रमला होता.

मी बघत होतो. आणि बघता बघता मला एक रहस्य उलगडले आहे असे वाटत होते. संस्कृतीमध्ये आशय आणि अभिव्यक्ती झालेली असते. त्यातील आशय हा अरूप, मनातला असतो. प्रकट असते ती 'कृती', म्हणजेच अभिव्यक्ती. अभिव्यक्तीच्या अनुकरणाने, पुनरुक्तीने अन् 'अंग-वळणी' पडल्याने संस्कृतीचे चलन होत असते. परंपरा अभिव्यक्तीची असते. धर्म काय, संस्कृती काय, दोन्हीत कलेप्रमाणे अभिव्यक्ती हाच आशय असतो.

आता तर पंकज केवळ अभिव्यक्ती करीत होता. अभिव्यक्तीतून आशय त्याच्या अंगामनात तयार होत होता. आणखी पंचवीस वर्षांनी तो समाधीपुढे उभा राहील तेव्हा ही पहिली अभिव्यक्ती त्याला नक्कीच आठवेल. अभिव्यक्ती म्हणून आशयही! □

गेल्या अंकात ' मधुस्मृती ' या साम्यवादी राजवटीवरील एका रूपककथेचा पूर्वार्ध प्रसिद्ध झाला. या रूपक कथेचे मूळ इंग्रजी नाव ' Bee and the Rose ' असून मराठी रूपांतर पुण्याच्या सेंट व्हिन्सेंट शाळेतील शिक्षक फादर द्रागो यांनी केले आहे.

# मधुस्मृती

आजपर्यंत त्याला नाव नव्हते. तो होता फक्त एक आकडा—४१९९९ ! केव्हाही आणि कसाही कमी करता येणारा. इतकेच नाही, क्षणात खोडूनही टाकता येणारा !

आकड्यांच्या चिखलातून उचलून सोनालीने त्याला नामरूप दिले. स्वत्त्वाची जाणीवही करून दिली. साजेलसे नाव देऊन स्वाभिमानही जागा केला आणि...

उमलत्या सूर्याच्या सोनेरी किरणात न्हाऊन सोनाली थरथरत मधुकरची वाट पहात होती. एकेक क्षण युगासारखा लांब वाटत होता. सकाळच्या प्रहरी किडे वेचणारे चिमुकले पाखरू तिच्या फांदीवर येऊन शेपूट वरखाली हालवीत, चुक चुक चुक असा आवाज करीत सोनाला विचारू लागले.

' अग, आज बोलत का नाहीस ? कोणाची वाट पाहात आहेस ? तुला त्रास देणारा किडा आहे का ? ...'

सोनाली बोलली नाही. मोहोळाकडे नजर लावून ती शांत बसली होती. तिच्या आसपासच्या पानांवर किड्यासाठी शोधशोधून अपयशी झालेले ते चिमुकले पाखरू दुसऱ्या झाडावर उडाले.

' वाटेत काही अपघात नाही ना घडला ?'

सोनालीने स्वतःला भेडसावले. अधीर होऊन तिने जांभळी दिली आणि मधपरागाचे पंचपक्वान्न तयार करण्यात तल्लीन झाली.

शेवटी तो आला. खरे पाहिले तर तो वेळेवरच आला होता. मोहोळातील पोलिसानी बाहेर पडण्यास शिटी वाजवली आणि शोधकांनी मधपरागाची स्थाने सुचविली. ते लक्षात येताच मधुकर मोठ्या उत्साहाने उडत सरळ सोनालीकडे आला. सोनाप्रमाणेच त्यालाही ' कधी एकदा भेटतो, जणू हजार वर्षांच्या विरहानंतरच त्यांची भेट होणार आहे ' असे झाले होते. प्रेमयुगलांना मीलनाचे सुख विरहवेदनेची नदी ओलांडण्यानेच प्राप्त होत असते का ?

गंधभरीत मंदमारूत खेळणाऱ्या, सोनालीच्या परिसरात येताच त्या प्रेमयुगलाचे सर्वांग सुखसंवेदनांनी शहारले. पाकळ्यांचे हात विस्तारून तिने आपल्या हृदयातळात त्याचे स्वागत केले, मधुकरने प्रसन्न हासत विचारले,

' आत येऊ का ?'

' विचारतोस काय ? सरळ आत ये '

पाकळ्यांच्या पड्याआत खोल खोल शिरून मधुकर शांतपणे थोडा वेळ पडून राहिला.

कोणीच बोलले नाही पण दोन्ही हृदयातील भावना मात्र झिम्मा फुगडी खेळू लागल्या. त्यांना शब्दरूप देण्याचा प्रयत्न केला असता तर त्या भावनांच्या उत्कटतेने शब्दाचे साचे फडाफड फोडून टाकले असते.

भावनावेग ओसरल्यावर कोमल स्वराने गोंजारत सोनालीने काही तरी विचारावे म्हणून विचारले.

' मधुप, तुला कधी सुट्टी असते का ?'

' सुट्टी ?'

' हां, आठवड्यात एखादा दिवस, दरदिवसाच्या कामातून सुटका, विश्रांती घेण्यासाठी किंवा प्रियजनांना भेटण्यासाठी एक दिवसाची मुभा ?'

' हे कसे शक्य आहे ? दररोजचे काम कोण करणार ? ' मधुस्मृती 'च्या जगात कामगारांना विश्रांती मिळते तो मरणानंतरच !'

' म्हणूनच तुझ्या चेहऱ्यावर गुलामीची काळसर छाया सतत पसरलेली असते.

' मला वाटते मी मधुसंग्रहाला निघावे. उशीर होईल,'

' का ? वाईट वाटले की सत्य ऐकण्याची सवय नाही ?'

सोनालीच्या स्वरात उपहास मुळीच नव्हता. तरी पण मधुकरचा चेहरा पडला. तो काहीच बोलला नाही. तिने पुन्हा विचारले.

' बरं ते सोड. शोधकानी दाखविलेल्या दिशेने सरळ रेषेतच का उडत येतोस ?'

' कारण तेच कमी अंतराचे असते. '

' हे काय मला समजत नाही ? अरे पण कधीकधी वरखाली

इकडे तिकडे गोल गोल फिरून का येत नाहीस ?'

'हा काय वेडेपणा ? वेळेचा आणि शक्तीचा अपव्यय !'

'कधी फुलपाखरे पाहिली आहेस ? ती कशी उडतात ? स्वैर उडण्यात, दाही दिशाना एकाच वेळी पागण्याचा अट्टहास करण्यात, एकमेकांशी शर्यत लावून लपंडाव खेळण्यात काय मजा असते ती अनुभवानेच कळेल. ऐकून समजणार नाही...'

'स्वैर, स्वच्छंद, मजा या शब्दाचा उच्चारच काय, कल्पनाही करण्याची कामगारांना बंदी आहे कारण ह्याचे उत्पादनाशी वैर आहे. कामगाराच्या जीवनाला अर्थ असतो फक्त इतरासाठी जगण्यात...'

'पण जीवनातला सहजसाध्य आनंद न लुटताच मरणे ?

इतका सारा मधपराग गोळा करण्याचा उद्देश तरी काय ?'

'ते जाणून घेण्याचे कारणच नाही आपले काम भले आपण भले. अनावश्यक प्रश्नांच्या भिंती उभारून डोके आपटून घ्या कशाला ? मधुस्मृतीत जे लिहिले आहे तेच आमच्या कपाळावर .'

'सपूर्ण मधुस्मृतीचे कधी वाचन केले आहे का ?'

'राजपुत्रानी फोडून सांगितल्यावर वाचणाची काय गरज ?'

राजपुत्रांनी स्वत साठी मधुस्मृती रचली आणि तिचा अर्थ सागितला नसेल हे कशावरून ?'

'मधुस्मृतीत स्वार्थ नक्कीच नसणार. समाजहितासाठी तिची रचना झाली आहे. हजारो वर्षे मधुस्मृतीच्या आधारावर आमची संस्कृती आणि समाजसस्था चालत आली आहे.'

'म्हणून का त्यात स्वार्थ नसेल ? सगळेच काही सत्य असेल ?'

'मधुस्मृतीवरील माझा विश्वास अचल आहे.'

'ओरडण्याची गरज नाही. ही श्रद्धेपेक्षा अधिक विचारांची तार्किकतेची बाब आहे तुझ्या सपूर्ण जीवनालाच अर्थ देणाऱ्या, तुझे जीवन घडवून कसे आणि कोठे राहावे, काय आणि कसे करावे हे स्पष्ट करणाऱ्या मधुस्मृतीची रचना केव्हा झाली, का झाली, रचनाकारांचे अंतिम ध्येय कोणते होते हे जाणून न घेता, स्वत.च्या जीवनाबद्दल स्वतत्रपणे विचार न करता, जगण्याचा आनद कसा लुटता येईल ?'

'मी तुला कित्येकदा सांगितले आहे की, स्वतंत्र विचार करणे, भावनाची दखल घेणे, मधुस्मृती विरुद्ध आहे. राजपुत्र कधीच अशा गोष्टी सहन करीत नाहीत. तत्क्षणी मोहोळाबाहेर घालवून देतात. बहिष्कार घालतात. मधुस्मृतीच्या पालनाने सर्व काही कसे सुरळीतपणे चालले आहे. एक-दोन दिवस नाही हजारो वर्षे !'

'सुधारणा किंवा प्रगती आळसातून किंवा दु खातून उगवत असतात, म्हणजे कोठेच सुधारणेला, प्रगतीला जागा उरली नाही असेच ना तुला म्हणायचे !'

'सुधारणा व प्रगती आळसातून किंवा दु खातून उगवत असतात. मधुस्मृतीच्या जगांत सर्वत्र सुख आहे, भरभराट आहे. कशाचीच कमी नाही.'

'मधुकर, मनापासून तू सुखी आहेस का ? खरे सुख हे दुःखाच्या अनुभवाविना कधी कळत असते का ? नव्याला जन्मी घालण्यास वेणाची गरज नसते का ?'

'आता का गप्प झालास ? प्रत्येकाच्या हृदयात भुका असतात. स्वाभिमानाच्या आणि प्रेमसुखाच्या; आणि नेमक्या त्याच दडपून टाकण्याचा पद्धतशीर प्रयत्न मधुस्मृती करत आहे. राजपुत्राना किंमत असते फक्त उत्पादनाची. मधुस्मृतीकारांच्या लाभासाठी इतराचे होत असते खतपाणी, सर्वच काही बनते साधन सामुग्री, निकामी ठरतात फेकून देण्यालायकीची.'

'मधुस्मृती समाजहितासाठी आहे हा विश्वास कोटयवधीचा आहे. शेकडो वर्षांचा सनातन धर्म आहे. हजारोचा विश्वास चुकीचा कसा असेल ? मधुस्मृतीवरील माझा विश्वास अटल आहे.'

सोनाली शांत राहिली. पुढे मधुकर नकारार्थी मान हालवीत ओरडला नाही, 'तू माझ्या विश्वासाची नाव बुडवू शकणार नाहीस!'

पण त्याचे हातपाय लटपटत होते. त्याच्या उच आणि जोराच्या ओरडण्यातील पोकळी सोनालीला केव्हाच जाणवली. मधुकर मोठमोठ्याने बोलत राहिला.

'सोना, मी मुळीच रागावलो नाही, भावविवश झालो नाही; पण एवढे मात्र मला पुन्हा ठासून सागू दे-मधुस्मृतीच्या पालनाने मी संपूर्णपणे सुखी आहे. मला कशाचीच कमी नाही. मधुस्मृतीचे सरकार माझी भरपूर काळजी घेते. मी येतो आता. उशीर होत आहे.'

सोनालीचा निरोप घेऊन मधपरागासाठी मधुकर एका फुलावरून दुसऱ्या फुलाकडे गेला. विचाराचे मोहोळ उठले होते ते शांत करण्यासाठी फुलांची सख्या लक्ष देऊन मोजू लागला. मधपरागाच्या चार खेपा केल्या. भावनाचे वादळ हातोटीत ठेवून; पण पाचव्या दौऱ्यावर मात्र मधुस्मृतीवरील श्रद्धेची नाव संशयाच्या वादळात सापडली, भयकर हेलकावे खाऊ लागली.

'अपघाताने किंवा मोहोळरक्षणात हातपाय तुटलेल्याना निकामी ठरवून मोहोळाबाहेर मरू देणे हा कोणता न्याय ? मधुस्मृतीला कामगाराची किंमत तरी काय ? उत्पादनाची साधने म्हणूनच ती आम्हाला वागवते आहे ना आजपर्यंत ? आमच्या आयुष्यभरच्या परिश्रमाचे फळ खाणारे कोण ?... मधुस्मृती अतिमरीत्या कोणाच्या फायद्याची ?... लहानपणी असले प्रश्न विचारल्यास चपराक खाऊन गप्प बसावे लागे. आत्ता मी हे प्रश्न विचारले तर राजपुत्र उत्तरे देतील.'

विचाराच्या घुमइचक्रीत मधुकरचे आकडे चुकू लागले. किती फुलाचा मधपराग साठवला हे तो पार विसरून गेला. गोंधळलेल्या मनस्थितीत तो मोहोळात आला. चौकीदाराने कोश तपासले. बराच मधपराग कमी होता त्याने मधुकरला आत नेऊन कोठारीसमोर उभे केले. त्याचे रेकॉर्डबुक तपासले. कोठारीने गंभीरतेने म्हटले, 'आजपर्यंतचे तुझे रेकॉर्ड चांगले आहे. जा, दरखेपेला ३०० मिलिग्रॅम मधपराग घेऊन येत जा !'

मधुकर जागचा हालला नाही. कोठारी रागाने ओरडला.

'४१९९९ नीघ म्हटलं ना येथून ? वीस मिनिटात ३०० मिलिग्रॅम मधपराग घेऊन ये... पायाला मुळे फुटली आहेत का ?'

'मला काही विचारायचे आहे.'

'काय ? मला प्रश्न विचारण्याचा उद्धटपणा करतोस ? मला वाटलेच होते, विचार करण्याच्या फंदात पडला असावास, मधुस्मृतीचे नियम स्मरणात आहेत ना ?'

'पण हा माझ्या जीवनमरणाचा प्रश्न आहे, माझ्या जीवनाच अर्थ जाणण्याची जिज्ञासा आहे.'

'४१९९९, स्वतःला समजून घेण्याचा, जीवनाचा मुळीच प्रयत्न

करू नकोस. मधुस्मृतीत लिहिलेच आहे. कामगाराचा जन्म फक्त मधपरागसंग्रहासाठी असतो. ह्या चिरतन सत्यावर विश्वास ठेव ! श्रद्धा तारते, संशय मारतो. संशयाला दिली ओसरी मनभर पाय पसरी.'

आपल्या बुद्धिचातुर्यावर खूष होऊन कोठारी हसला. ते पाहून चौकीदारही मोठ्याने हसला; पण मधुकर मात्र जागीच गंभीर मुद्रा करून उभा राहिला. त्याचे संशय अजून दूर न झालेले पाहून कोठारी समजावण्याच्या सुरात बोलू लागला.

'४१९९९, कर्तव्यपालनासारखे सुखसाधन नाही. तेच जीवनाचे ध्येय आहे. जीवनाविषयी गहन विचार करणे, मधुस्मृतीत नसलेला नवा अर्थ शोधण्याचा प्रयास करणे शुद्ध मूर्खपणाचे आहे. कारण जीवनार्थ कळण्यास मधुस्मृती हा एकच साधनग्रंथ आहे. मधुस्मृतीवर उभारलेली आमची संस्कृती हजारो वर्षे टिकून आहे व पुढेही राहील. आमची ही अत्युच्च संस्कृती अशीच टिकून राहावी असे तुला वाटत नाही का ?'

'............'

'मग जा. विचार करण्याच्या फंदात पडू नको. खरोखरच सर्वांच्या हितासाठी मधुस्मृती आहे. तिच्यावर श्रद्धा ठेव !'

मधुकरने स्वत:चे विचार मूर्खपणाचे ठरवून 'मधुस्मृतीवर विश्वास ठेवलाच पाहिजे, मी ठेवीत आहे' असे स्वत:लाच तो समजावू लागला. राजपुत्र कोठारीने मृदु आवाजात उपदेश चालू ठेवला.

'आणि हे बघ ४१९९९, जगात एकच गोष्ट शहाणपणाची ती म्हणजे कधीही प्रश्न न विचारणे प्रश्न उठतात संशयग्रस्त बुद्धीतून आणि ढकलून देतात सत्यासत्यतेच्या गुताड्यात. त्यामुळे मानसिक अस्वस्थता वाढू लागते. इतराच्या शातीलाही धक्का देते. प्रश्न विचारणारे मन आणि शेवटी सर्वांनाच ते नाशाच्या मार्गावर नेते. त्यावर उपाय मधुस्मृतीत दिलाच आहे– 'स्वतत्र विचार करणाऱ्यांचा विचार न करता निकाल लावावा...'

शेवटच्या वाक्याने मधुकरचे धाबे दणाणले. त्याने राजपुत्राला हात जोडून विनंती केली.

आपल्या उपदेशाने मला सन्मार्गावर आणले आपला मी अत्यंत ऋणी आहे. प्रश्न विचारण्याचा मूढपणा मी कधीच करणार नाही.

आणि लगेच राजपुत्राने कठोर स्वरात आज्ञा केली.

'नीघ आता वीस मिनिटात !...'

त्याचे वाक्य पुरे होण्याआधीच मधुकर गुदामात शिरला. आपले कोश रिते करून ३०० मिलिग्रॅम मधपराग आणण्यास धावला

वीस मिनिटात त्याने ३५० मि. ग्रॅम मधपराग आणला. चौकीदाराने त्याला पुन्हा कोठारीपुढे उभे केले. त्याच्या रेकॉर्डबुकमध्ये नोंद केली. कोठारी विचार करू लागला–वीस मिनिटात ३५० मि. ग्रॅ. मधपराग आणण्याचे ४१९९९ ला शक्य आहे. हे सर्वच कामगाराना शक्य असलेच पाहिजे. मधुस्मृतीत ३०० मि. ग्रॅ. ऐवजी ३५० मि. ग्रॅ. असे घुसडून दिले तर...राजपुत्र नक्कीच खूष होईल. राणीचीही कृपादृष्टी होईल...मधुस्मृतीसरकारचे उत्पन्न वाढेल. राज्याची भरभराट होईल. मलाही बढती मिळेल.

¤

नंतर मात्र सोनालीपासून मधुकर दूर दूर राहू लागला, कारण तिच्याशी सपर्क येताच मधुस्मृतीवरील विश्वासाला कीड लागली होती. मन बंड पुकारून उठले होते.

हल्ली सोनालीबद्दल विचार करणेही धोक्याचे ठरू लागले होते. तिने जागा केलेला स्वाभिमान आणि विशेषत: प्रेमभावना : गोड आवाजातील तिचे प्रेमळ बोलणे...आणि स्पर्श...

शोधकांनी सोनालीच्या आसपासच्या मळ्यात पाठवले तरी तो तिच्याजवळ जाण्याचे टाळू लागला. दिवसभर मधुस्मृतीच्या नियमांनी आणि फुलाचे आकडे मोजण्याने मनपाखरू घट्ट बाधून ठेवू लागला.

तरी पण स्वच्छदपणे उडणारी, बागडणारी फुलपाखरे त्याला हिणवू लागली. गाणारी पाखरे त्याच्या जीवनाची चेष्टा करू लागली. मोहोळात अव्याहत चाललेले मधुस्मृतीचे गुणगान सोनाली भेटण्यापूर्वीसारखी अफूची गोळी ठरण्यास असमर्थ ठरले. सोनालीने अनाहूत सगीताचे दालन खुले केले होते. मोहोळाच्या बंदीशाळेत निश्चितपणे झोपणे अशक्य करून सोडले होते.

राजपुत्राच्या उपदेशाने सशक्त झालेल्या ४१९९९ ने मधुकरची गळचेपी करण्यास सुरुवात केली. स्वतंत्र विचार, प्रश्न किंवा सोनालीचे स्मरण होताच विश्वासाची काडी फिरवून, तर कधी बहिष्काराची भीती दाखवून मधुस्मृतीविषयी निष्ठा जागृत केली.

अशा प्रकारचे दडपण किती दिवस सहन होणार ? सोनालीच्या आठवणी मोहोळातील सामाजिक जीवनातील एकटेपणात छळू लागल्या. आपल्या स्वत्वाची, स्वातत्र्याची होळी पेटवून संथपणे पाहात बसणे अशक्य होऊ लागले. चिरडल्या जाणाऱ्या भावना उजळून उठल्या, भांडू लागल्या–

'मधुकर, तुला काय हवे–जीवन की मरण ?'

'जीवन ! मरणाची अपेक्षा फक्त निराशिताना असते.'

'कशा प्रकारचे ? मधुस्मृतीच्या कर्तव्यपालनाने लाभणारे पारतत्र्यातील सर्व सुखसोयींचे दीर्घायुष्य की स्वातंत्र्याचे, उद्याची शाश्वती नसलेले अल्पायुष्य ?'

'तुला निवड करावीच लागणार !'

'बरं, स्वातंत्र्याचे आणि स्वाभिमानाच्या सुखाचे जीवन !'

'मरणाला आव्हान देत आहेस हे लक्षात ठेव !'

'प्रेम, स्वातत्र्यासारख्या महत्तर मूल्यासाठी मरण खुषीने कवटाळीन मी !'

'पोटाची खळगी भरून समाजात चार दिवस जगण्याची आशा प्रत्येकाच्या हृदयात असते. उदात्तमूल्याचा विचार ठेव, वृद्धापकाळासाठी...मरण शक्य तितके पुढे ढकलण्यावर जगण्याची मजा असते.'

'माझी निवड पक्की आहे. निश्चय दृढ आहे. सोना, मला सोनाली हवी आहे. ती स्वातंत्र्याचे, स्वाभिमानाचे प्रतीक आहे. तिच्याविना जगणे म्हणजे क्षणोक्षणी मरत राहाणे.'

सकाळ होताच सोनालीला भेटण्यास तो निघाला. प्रवेशद्वारात

**'स्वतंत्र विचार करणाऱ्यांचा विचार न करता निकाल लावावा...'**

शोधकांनी सूचना देण्यास प्रारंभ केला होता. हजारो कामगार मधपरागासाठी पद्धतशीरपणे पिटाळले जात होते. त्याच्याकडे दुर्लक्ष करून तो उत्साहाने उडाला.

'सोनाली, आत येऊ ?'

'अरे विचारतोस काय ? किती किती वाट पाहिली मी तुझी '...

आनंदाने नाचत तिने त्याला मिठी मारली. तिच्या प्रेमळ स्पर्शाने सुखावलेला मधुकर पाकळयाच्या मुलायम गादीवर स्वस्थ बसला मीलनासाठी आसुलेल्या दोन हृदयाची भेट झाली. मधुकरच्या मनोकामनांना जखडून टाकणारे मधुस्मृतीचे साखळदंड तटातट तुटून पडले. डोक्यावरचे मोठे ओझे गळून पडल्यासारखे त्याला हलके हलके वाटू लागले नवोत्साहाची वीज सर्वांगात सळसळू लागली.

तिच्या पाकळयावर हात फिरवीत त्याने म्हटले.

'किती मऊ ! किती आल्हाददायक !'

'किती वाळलास तू. डोळे पहा किती खोल गेले आहेत ते !'

शांत पडून रहा थोडा वेळ. तुझ्यासाठी भरपूर मधपराग साठवून ठेवला आहे. तो फक्त तूच खायचा कोणालाही द्यायचा नाही !'

'सोनाली, तुझा सुगंध कसा बहरून टाकणारा...तुझे रूप किती मनोहर...

मधुकर बोलत राहिला. 'मनापासून तुझी स्तुती करीत आहे. उभ्या आयुष्यात मी आज प्रथमच फुलाच्या सौंदर्याकडे लक्ष देत आहे. मधुस्मृतीने दर तीस मिनिटाला ३०० मि. ग्रॅम मधपराग आणावयास शिकवले आणि इतर सर्वच गोष्टी समयाचा आणि शक्तीचा अपव्यय ठरवल्या; पण आज माझे डोळे उघडले.

'कालपरवापर्यंत तू मधपराग बळकावून नेणारा दरोडेखोर होतास आणि आज सुखसौंदर्याचा भोग घेत आनंदविभोर होण्याच्या मार्गावरील वाटसरू बनला आहेस ! '

'तुझी भेट झाल्यामुळे '

'आज तुला सौंदर्याची एक दिशा मात्र दिसली आहे. तिकडे एकटयाने चालायचे असते. संपूर्ण आयुष्यभर केला तरी सौंदर्याचा शोध संपत नाही '

'............'

मधुस्मृतीच्या फूटपट्टीने सौदर्याचे आणि स्वातंत्र्याचे सुख मोजता यत नाही. विचारांच्याच काय, भावनाच्या प्रतिमा देखील फोडून, कल्पनाच्या व भावानुभवाच्या सतत दूर धावणाऱ्या क्षितिजापलीकडे धाव घेण्यास सौंदर्यसुख आव्हान देत असते. त्याची पावले अनताकडे वळलेली असतात...त्याची पाऊलवाट धुंद करणारी आणि तशीच जीवनसर्वस्वाची बळी मागणारीही असते...'

सोनाली बोलत होती. मधुकर शांत बसून, जिवाचे कान करून ऐकत होता. त्याच्या हृदयातरात सुखसंवेदनाची सितार छेडली जात होती. .

त्याने कळवळून स्वतःलाच विचारले,

'सुखाचा शोध घेण्यास मी इतका उशीर का लावला ?'

मधुस्मृतीच्या जगातील दु.ख सतत माझ्या डोळयासमोर असूनही मी ...'

त्याच्या मनपटलावर दोन चार दृश्ये उमटून गेली.

'जन्मभर निरलसतेने मधपरागसंग्रह करणारा ४१९९५ एका काटेरी झुडुपाने त्याचा पंख फाडला. उडण्यात थोडी अडचण होत असे; पण ३०० मि. ग्रॅम मधपराग तो आणीत होता. गुदामात भरोत होता. येथे कोठारीने त्याचे पंख तपासले. निर्विकार चेहऱ्याने म्हटले–पुन्हा मोहोळात शिरू नकोस!

'त्या अंधाऱ्या रात्री मधचोरानी पेटविलेल्या ज्वाळांनी कुणाचे पख करपले, हातपाय जळाले, शेकडोंनी मोहोळ वाचवण्यात प्राणाची आहुती दिली मधपरागाचे पोटभर भोजन करून सुरक्षित स्थळी गेलेल्या राणीने आपल्याच मोहोळातील ३०० मि. ग्रॅम मधपराग आणू न शकणाऱ्यांना हाकलून लावले. मोहोळाखाली गार गारठयात कुडकुडत मरू दिले.

'परवाचीच गोष्ट. मधुकर गुदामात कोश रिते करून बाहेर पडत होता. न्यायालयाच्या आत–बाहेर प्रचंड गर्दी पाहून तो तिकडे वळला. न्यायाधीश निर्णय वाचू लागले होते.

'मधुस्मृती हा परमपूजनीय ग्रथ आहे. हे सर्व मधुजगालाच माहीत आहे. कामगारांना मधुस्मृती वाचण्याचा हक्क कधीच दिला गेलेला नाही. फक्त राजपुत्रच ती वाचू शकतात. असे असताना कामगार ४१९९६ ने मधुस्मृतीमदिरातून तो चोरण्याचा भयंकर धाडसी गुन्हा केला आहे. इतकेच नाही मधुस्मृती पापी डोळयांनी वाचली आणि तिच्यावर टीका केली. तिच्याबद्दल घृणा व्यक्त करून ती कामगारासमोर जाळून टाकण्याचा घोर, अक्षम्य अपराध केला आहे! या सर्व अपराधाची शिक्षा एकच–त्याचे डोळे फोडून त्याला बहिष्कृत करण्यात येईल !'

सैनिकानी न्यायालयातच सर्वांसमोर ४१९९६ चे डोळे अणकुचीदार सुयानी फोडले. अतीव वेदनेने विव्हळत असताना त्याला अलगद उचलून मोहोळाबाहेर फेकून दिले ! ...'

□

मधुकरने सोनालीला म्हटले,

'माझ्या जीवनाला आजपर्यंत एकच अर्थ होता- मधुस्मृतीचे नियम पाळणे आणि इतराच्या उपयोगी पडणे. '

'जीवनात सुख मिळते स्वखुशीने इतराना सुखी केल्याने. सत्य, शिव, सुदर, स्वातंत्र्य आणि समता या मूल्याच्या दिशेने वाटचाल करताना जीवनाचा अर्थ अधिकाधिक स्पष्ट होत जातो आणि उदात्त मूल्याना वाहिलेले जीवनच इतराना संजीवनी प्रदान करीत असते...'

तिच्या म्हणण्यावर गंभीरपणे विचार करीत तो तेथेच पडून राहिला. बऱ्याच वेळाने मन सुखसमाधानाने भरून ओसंडत असता मधुकर उठला. मधसचयाला निघाला. आज त्याच्या उडण्यात फुलपाखराचा अल्लडपणा दिसत होता. अर्थातच तो मधुस्मृतीचा सरळ रेषेत उडण्याचा नियम जाणूनबुजून मोडत होता. फुलाच्या सौंदर्याकडे लक्ष द्यायचे नसते; पण ते डोळे भरून तो पहात होता स्वादिष्ट फुलांचा मधपराग फक्त राजपुत्रासाठी मोहोळात आणावयाचा असतो; पण मधुकराने अनेक फुलाचा मध मुद्दाम चाखून पहात पोटभर खाल्ला !

मधुस्मृतीचे नियम पायाखाली तुडवीत तो मोठ्या उत्साहाने जात होता. या फुलावरून त्या फुलावर उडत, गिरक्या घेत, विविध फुलाचे सौंदर्य न्याहाळीत, सुगंधाचा दीर्घश्वास घेत चविष्ट फुलाचा मकरद पीत नाचत–बागडत तो मधपराग गोळा करू लागला. नकळत

सोनालीने शिकविलेले हर्षोन्मादाचे गाणे गुणगुणू लागला.

मोहोळात येताच त्याच्या हालचालीतील गेयता कोठारीच्या लक्षात आली. त्याला भयंकर राग आला, तसा संशयही...' ४१९९९ आज विशेष खूष दिसतो. चारचौघांप्रमाणे निर्विकार चेहेऱ्याने कर्तव्य करण्याऐवजी तो आनंदी दिसतो. हसत–खेळत झटपट काम उरकीत आहे. कामगारांना गाणे, हसणे, आनंद व्यक्त करणे, इतकेच काय उत्साहित दिसणेही वर्ज आहे. ही स्वत्व सापडल्याची, स्वाभिमानाची म्हणजेच कर्तव्यच्युतीची चेतावणी देणारी लक्षणे आहेत. मधुस्मृतीच्या नियमाचे उल्लघन करणाराच असा वागू शकतो...'

मधुकरच्या डोळ्यात रोखून पाहात कोठारी कठोर आवाजात गरजला,

'४१९९९.किती फुलाना भेटलास ?'

'तीनशे, नाही २९९ '

मधुकर थोडा गडबडलो. सोनालीला इतर फुलाच्या आकड्यात मोजण्याचे त्याच्या जिवावर आले. सोनालीकडून त्याने मधपराग घेतला नव्हता. घेतले होते आकाशापेक्षा उंच आणि उदात्त विचाराचे, मूल्याचे लोण.

मधुकर चाचरलेला पाहून कोठारीचा संशय दृढ झाला... स्वविचार व भावनांना दडपून टाकण्याचा रामबाण उपायाचा अचूक आकडेमोजणीचा वापर ४१९९९ करीत नाही. म्हणूनच आकडे चुकत आहेत. विनाशाच्या मार्गावर पावले पडत आहेत. याचा परिणाम इतरांवर होण्याआधीच...'

कोठारीने टाळी वाजवली. ताबडतोब सैनिकानी घेरून मधुकरला न्यायाधिशांसमोर उभे केले. रेकॉर्डबुक हजर झाले. उग्र चेहेऱ्याचा न्यायाधीश राकट स्वरात म्हणाला,

'.४१९९९. हा तुझा दुसरा अपराध. दुसऱ्यादा मधुस्मृतीचे नियम मोडण्याचे धैर्य शत्रूशी सामील झालेल्यानाच असते.'

आपला मधपरागांचा अमोल ठेवा आम्हाला अर्पण करणारी फुले शत्रू कशी असू शकतील ?'

फुलाशी तू हितगुज करतोस हे कबूल केलेस.'

'पण फुलाशी आमचे कधीच वैर नव्हते.'

'मधुस्मृतीच्या जगाबाहेरच्या प्रत्येकाशी आमचे वैर आहे. मधुस्मृतीच्या विचाराशी सहमत नसतात, स्वतंत्रपणे विचार करतात, भावनांना किमत देतात ते सर्व आमचे कट्टर शत्रू आहेत."

'.........'

'त्याच्याशी बोलणे हा गुन्हा आहे हे माहीत असूनही तू नियम मोडला आहेस याचाच अर्थ मधुसरकारला उपयोगी पडण्याऐवजी स्वार्थी बनू लागला आहेस.'

'नुसत्या उपयोगितेपेक्षा, कर्तव्यपालनाच्या यांत्रिकतेपेक्षा मोठे आहे प्रेम !'

शेवटच्या शब्दाचा उच्चार ऐकताच न्यायालयात भयाण शांतता पसरली. न्यायालयाच्या चारी भिंतीना आदळून तो शब्द घुमू लागला 'प्रेम–प्रेम–प्रेम...'

सर्वांनी कानांत बोटे खुपसली. कारण हा शब्द उच्चारणे तर राहू दे, नुसते कानानी ऐकणेही महापाप होते. रागाने लालबुंद होत न्यायाधीश ओरडला,

'शरम नाही वाटत असले गलिच्छ शब्द उच्चारायला ? लवकरच तू सुखाची अपेक्षाही करशील !'

'हो मला सुख हवंय. मधुस्मृतीचा दगड गळघाला बांधून घेऊन कर्तव्यपालनाच्या नदीत मी बुडून मरत होतो. कालपर्यंत मधुस्मृतीने आमच्या वाटघाला कोणते सुख वाढून ठेवले आहे ? जन्मभर कर्तव्याच्या घाण्याला जुपून घेऊन आम्हाला मिळणार तरी काय ? मधुस्मृतीला किमत आहे आमच्या हातापायांची, मधपरागसंचयाच्या शक्तीची. आमच्या शरीरात हृदय आहे, मन आहे, भावना आहेत, विचार आहेत. प्रेमाचे सुख अनुभवण्याची भूक आहे, हे सर्व मधुस्मृती विसरते ..'

प्रेम या शब्दाच्या उच्चाराने पुन्हा स्मशानशांतता पसरली. कानात खुपसलेली बोटे बाहेर काढीत न्यायाधीश किंचाळला,

'खबरदार एक शब्द पुढे बोलशील तर !'

'नाही मी बोलणारच ! मला जाणवलेलं सत्य सर्वांसमोर सांगणार !'

न्यायाधिशापेक्षाही मोठघाने ओरडून मधुकर बोलू लागला. मधुस्मृतीच्या जगात आज प्रथमच असा आवाज चढवून न्यायाधिशाला प्रत्युत्तर देण्याचे धाडस केले जात होते. मधुकरचे धैर्य पाहून सर्वांनी तोंडात बोटे घातली. आपल्या मनातल्या श्रेष्ठ भावनांना तो शब्दरूप देत आहे असे तेथील प्रत्येकाला वाटले; पण उघड उघड दुजोरा देण्याचे धाडस मात्र कोणीच केले नाही. मोठ्या धैर्याने मधुकर बोलत राहिला,

'मधुस्मृतीचा पुर्नविचार झाला पाहिजे. ती समाजहितासाठी आहे; पण समाजातील सर्वांच्याच सर्वांगीण उन्नतीसाठी नाही. न्याय, स्वातंत्र्य आणि प्रेम याचा अधिकार सर्वांना मिळाला पाहिजे. विशेषत: कामगाराना...'

मधुकरला पुढे बोलणे अशक्य झाले. न्यायालयात जमलेल्या सर्वांनी एकच गिल्ला केला 'मारा, त्याला ठार करा !'

'त्याची जीभ उपटून काढा !'

न्यायाधिशाने टेबलावर हातोडा जोरजोराने चारपाचदा आपटून सर्वांना शांत केले आणि मधुकरची कीव करीत म्हटले,

'वेड लागलंय बिचाऱ्याला !'

कोठारीने, सैनिकानी आणि इतर सर्वांनी त्याला वेडघात जमा केले. त्याच्याकडे बोट करून खदखदा हसू लागलेल्या जमावाची मधुकरला दया आली. तो थोडा वेळ काही न बोलता गप्प उभा राहिला. न्यायाधीश सर्वांना शात राहण्यास आज्ञा करून समजावणीच्या स्वरात बोलू लागला.

'४१९९९, मधुस्मृतीनेच सर्वांचे तारण आणि सरक्षण केले आहे. तिच्यातील एक शब्द किंवा कानामात्रा देखील बदलला तर अंतर्विरोध निर्माण होईल. समाजसंस्थेची भक्कम इमारत कोसळून पडू

**आमच्या शरीरात प्रेम आहे, मन आहे, हे सर्व मधुस्मृती विसरते....'**

लागेल. मधुस्मृतीचा पुर्नविचार करण्याच्या नुसत्या कल्पनेनेच अंदाधुंदी माजेल. आता तू जे घृणास्पद शब्द उच्चारलेस ते स्वार्थ व सुखलोलुपतेचे बीज आहेत. संस्कृतीच्या सर्वज्ञानाची मूलकारणे आहेत... ४१९९९, तू समजदार आहेस, विचारी आहेस. विचार करण्याचे सोड भावनाच्या मृगजळामागे धावू नकोस. तुझे कर्तव्य निष्ठेने पार पाडीत जा. त्यातच तुझे कल्याण आहे...'

मधुकरने जमावाकडे दृष्टी टाकली. न्यायाधिशाच्या भाषणाला होकारार्थी मान हलवीत ते मधुकरच्या वेडेपणाला हसत होते. प्रत्येक जण अशा भाषणाला होकार आणि दुजोरा देण्याचा दडक ते पाळीत होते. क्षणभर मधुकरला वाटले, मी सुद्धा होकार देण्याचे नाटक केले तर... नको, पण ते खोटेपणाचे ठरेल. दुसऱ्याच क्षणी भूत संचरल्याच्या आवेशाने तो ओरडला,

'प्रेम, स्वातंत्र्य आणि न्याय यांचा विजय असो ! प्रेमाविना जीवनात रस नाही, प्रेमाचा, सहानुभूतीचा विजय असो !'

कानात बोटे घालून जमाव एकसुराने घोषणा देऊ लागला.

'मधुस्मृतीचा विजय असो !' मधुस्मृतीचा विजय असो !'

त्यांच्या घोषणानी बुडवून टाकणाऱ्या आवाजाने तो कळकळीने विनवू लागला,

'मधुस्मृतीच्या तुरुंगात कुजू नका, प्रेमाच्या व स्वातंत्र्याच्या जगात झेप घ्या, जीवनातला आनंद लुटा !'

चेतावणी दिलेला समाज अधिकाधिक जोराने नुसत्या घोषणा देतच राहिला. मधुकरला भेडसावणे अशक्य आहे हे उमगून कोठारी अकस्मात ओरडला,

'बंडखोराला ठार मारा !'

जमावानेही ओरडण्यास सुरुवात केली. 'पकडा' 'मारा' ठार करा !'

सैनिकानी साखळदंड आणले. शस्त्रे सावरीत ते मधुकरला घेरू लागले. त्याच्या अंगावर हात टाकणार तोच मधुकराने घोषणा दिल्या—

'प्रेमाचा विजय असो !'

'स्वातंत्र्याचा विजय असो !'

'समतेचा विजय असो !'

हे घाणेरडे शब्द अैकण्याचा गुन्हा टाळण्यासाठी सैनिकानी कानात बोटे कोंबली, तेव्हा त्याच्या हातातील साखळदंड आणि शस्त्रे खाली जमिनीवर पडली. सैनिक दोन पावले मागे हटले. कान बंद करूनही ते शब्द अैकू येणे शक्य होते म्हणून ते बरेच दूर पळाले.

मधुकर घोषणा देत मागे फिरला. मोहोळाच्या प्रवेशद्वाराकडे निघाला. सैनिक त्याला पकडण्यासाठी जवळ येण्याचे धैर्य करीनात. जमावही दूर दूर राहून कानात बोटे कोंबून उघडया डोळयानी मधुकर हातातून निसटत असलेले असहाय्यपणे पाहू लागला. न्यायाधिशाने सैनिकांना आज्ञा केली—

'पकडा त्याला. साखळदंडांनी जखडून ठेवा !' सैनिकाचे काही चालेना. घृणास्पद शब्द अैकल्याच्या अपराधासाठी प्राणास मुकावे लागणार या भीतीने ते दुरूनच चडफडू लागले. हात चोळीत बसलेल्या न्यायाधिशाने, मधुकरला दरडावून विचारले,

'चाललास कोठे ?'

'मन मानेल तिकडे; पण मोहोळाबाहेर !'

'मोहोळाबाहेर तू एक दिवसही जगू शकणार नाहीस !'

'आयुष्यभर येथे मरत आलो ते पुरे झाले. आता जीवनाचा-स्वातंत्र्याचा आणि प्रेमाचा आनंद लुटणार आहे मी.'

'४१९९९ हा अविचार सोड, मागे फिर! तुझ्या सर्व अपराधाची क्षमा केली आहे. मधुस्मृतीच्या जगातील सरक्षण तुला कोठेच मिळणार नाही. ही माझी विनंती अैक.'

मधुकर मात्र एकेक पाऊल पुढे ठेवीत निघाला. एकदा मागे वळून सहानुभूतिपूर्ण नजरेने त्याने सर्वांकडे पाहिले. नजरेनेच निरोप घेतला. सर्वांचे चेहरे निर्विकार होते. कानात बोटे खुपसलेली होती.

मधुकरचे पाऊल निश्चितपणे प्रवेशद्वाराबाहेर पडत आहे. मधुसरकारची सेवा करणारे दोन हात कायमचे गमावत आहेत हे लक्षात येताच न्यायाधिशाने विशिष्ट घंटा वाजवली. 'धडाडाड' गोळया उडाल्या. प्रवेशद्वार कोसळून पडले. परंतु त्याआधीच मधुकर तेथून नाहीसा झाला होता.

¤

मधुस्मृतीच्या जगाचे जू फेकून मधुकर हलक्या हृदयाने मुक्तपणे उडत निसर्गशोभा भोगू लागला. सौन्दर्यपूर्ण सजलेली सुमने प्रसन्नपणे हसत त्याचे स्वागत करीत होती. मंद सुगंधाच्या लाटा घेऊन मंद मरुत वाहात होता. किडयांचे, पक्ष्यांचे आवाज मधुर सृष्टीगीत बनून कानावर पडत होते. आयुष्यात प्रथमच निर्भयपणे मधुकर सृष्टिसौंदर्याचे असीम सागर पंचेंद्रियांनी पिऊन टाकण्याचा अट्टाहास करू लागला.

¤

मधुस्मृतीच्या राज्याचे भले भक्कम प्रवेशद्वार कोलमडून पडलेले पाहून कामगार आनंदाने नाचू लागले. शेकडोंनी मोहोळ-राज्य सोडण्यास प्रारंभ केला. कित्येक सैनिकही जागीच चुळबूळ करू लागले. ह्या अनपेक्षित प्रसंगाने राजपुत्र दिङ्‌मूढ झाले. राणीला तातडीचे निरोप गेले. अर्थातच राणीचा राग अनावर झाला. क्षणाचा विलंब न लावता तिने आज्ञा केली—

'नजरेस पडेल त्याला गोळया घाला !'

कित्येक सैनिकही कामगारांना सामील झाले. त्यांनी गनिमी युद्ध चालवले. स्वातंत्र्य, समता आणि प्रेम याची बंडखोरांना नशाच चढली होती. पाठलाग करणाऱ्या सैनिकांना मधुकराच्या घोषणाच्या अणुबॉम्बमुळे पराभूत व्हावे लागले.

'पण —'

कोठे जावे ? स्वातंत्र्याचा कसा उपयोग घ्यावा ?

शेकडो जण नुसतेच स्वच्छंदपणे भटकत राहिले. कित्येक पोट फुटेपर्यंत मधपराग खात राहिले. फारच थोडयांनी एकत्र येऊन स्वातंत्र्य, समता आणि परस्परप्रेम या मूल्यावर नवीन राज्य उभारण्याचे स्वप्न साकारण्याचा प्रयत्न केला.

बहुतेक बंडखोराना स्वातंत्र्य, समता आणि प्रेम यांचा खरा अर्थ समजला नाही. ह्या मूल्यावर जगणे उमगले नाही. अनियंत्रित जीवनाची निरर्थकता सर्वांनाच जाणवू लागली. बेछूट जगण्याचा कंटाळ आला. सुरक्षित असा दुसरा जीवनमार्ग त्यांना सापडला नाही. काहीना तो सुचला पण स्वीकारण्याचे धैर्य झाले नाही. काही अपवाद वगळत

तर सर्वच परत आले, मधुस्मृतीला शरण गेले !

सोनालीची आठवण होताच तो तिकडे उडाला. तिच्या मऊ-मऊ पाकळ्यांवर हळूच उतरत त्याने उत्साहाने म्हटले,

'सोना, मी आलो !'

'त्याला आत घेत तिने त्याच्या ओठावर ओठ टेकले. सुखसंवेदनाना पूर आला. हर्षातिरेकाने सद्‌गदित होऊन मधुकर म्हणाला,

'सोना, मी तुझा अत्यंत ऋणी आहे. तूच मला सुखाची चव चाखवलीस, आनंदशिखरावर चढण्यास प्रेरणा दिलीस !'

'मधुस्मृतीचे संरक्षण झुगारून प्रेम, सुख व स्वातंत्र्य याच्या अपरिचित जगात उडी घेण्यात काय कमी धैर्य लागते ?'

'पण ते तुझ्या भेटीशिवाय आणि प्रेरणेशिवाय शक्य झाले नसते.'

संध्याकाळ झाली. बुडणाऱ्या सूर्याची सोनेरी किरणे क्षणकाल सोनालीच्या पाकळ्यांवर पडली. लवकरच फिकट बनून दिसेनाशी झाली. अंधार पडू लागला. गारठा वाढू लागला. सोनालीने मोठ्या मायेने मधुकरला आपल्या पाकळ्यात लपेटून घेतले. सुखावलेला मधुकर शांत झोपी गेला. सुखस्वप्ने पाहू लागला.

पहाटे जाग आली तेव्हा सोनाली शांत स्वरात म्हणाली,

'मधु, मला भीती वाटते रे ...'

'कोणाची ? त्या मधमाशाची ! प्रेमाचा विजय असो अशी एक घोषणा दे आणि पहा, कशा पळ काढतात ते !'

मधुकरने मधुस्मृतीच्या न्यायालयात काल घडलेली सर्व हकीगत मोठ्या अभिमानाने सांगितली. सोनालीसुद्धा स्वतःचा विसर पडून ऐकत राहिली. वाढत्या प्रेमाभिमाने त्याच्याकडे पाहात ऐकत बसली. मधुकरने तिला धीर दिला.

'सोनाली, मधुस्मृतीच्या जगाला भिण्याचे काहीच [कारण] उरले नाही. आम्ही स्वतंत्र आहोत !'

होकारार्थी मान हालवून सोनालीने शांत स्वरात विचारले,

'वसंतऋतू संपत आला याची जाणीव आहे ना तुला ?'

'हो, पण वसंताचा आणि आपल्या प्रेमाचा संबंध काय ?'

'तुला समजत कसे नाही ? माझा अंत जवळ आला आहे.'

'...............'

'मधुकरचे मन खिन्न झाले; पण लवकरच स्वतःला सावरत त्याने प्रौढपणे विचारले,'

'सोना, मग काय करायच आपण ?'

'उरलेल्या चार घटका परस्पर प्रेमाच्या आकाशाला भेटून पुढे जाण्यात, प्रेमपूर्ण सेवेच्या क्षितिजांना ओलांडण्याचा प्रयत्न करण्यात घालवू !'

ते दोन जीव प्रेमसागराचा तळ शोधण्यात तल्लीन झालेले असताना एका प्रभातकाळी मंद मारुताने सोनालीची एकेक पाकळी उडवून खाली पाडली. तेथे सोनालीच्या हृदयावर डोके ठेवून मधुकर वर पाय करून पहुडला होता. त्याच्या मुखावर तृप्तीचे हास्य होते.

**स मा प्त**


## अभ्यासकास उपयुक्त
## शेतकऱ्यास प्रेरक

"श्री. विजय परुळकर यांनी शेतकरी आंदोलनाचे, शरद जोशी यांच्या नेतृत्वाचे व शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष संघर्षाचे चित्र अतिशय जिव्हाळ्याने व जवळिकीने शब्दबद्ध केले आहे. त्यांच्या निवेदनाच्या सहजशैलीमुळे 'योद्धा शेतकरी' हे पुस्तक वाचनीय झाले आहे. शेतकऱ्यांच्या चळवळीतील एका नव्या पर्वाचे हे शब्दचित्र शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण करण्यास प्रेरणा देईल व शेतकरी आंदोलनाच्या अभ्यासकास अतिशय उपयुक्त ठरेल. वार्ताहराच्या तडफेने, अभ्यासकाच्या तिडिकीने व शेतकऱ्याबद्दलच्या तळमळीने लिहिलेले हे पुस्तक शेतकरी चळवळीच्या वाङ्‌मयात भर टाकणारे आहे."

—प्रा. एम्. डी. देशपांडे
रविवार सकाळ (कोल्हापूर)
दि. २४ जानेवारी १९८२

# योद्धा शेतकरी

**ले. : विजय परुळकर**

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

किंमत : रुपये छत्तीस

नेत्यांची व आंदोलनाची छायाचित्रे
पंचरंगी मुखपृष्ठ

## श्यामचा संसार (कथा ३७)

# वाइटातून चांगले

फिरोझ रानडे

'असं व्हायला नको होतं हो!' राधा त्या ऐतिहासिक दिवसाच्या संध्याकाळी अगदी कळवळून म्हणाली.

'आता काय झाले कळवळायला?' शाम थोडया चिंतेत व थोडया खडूस स्वरात विचारता झाला.

'अंतुलेसाहेबांचा राजिनामा स्वीकारला की बाईने!' राधाचा कळवळा कायम!

चागले चार-पाच महिने झटून अभ्यास करावा. रात्र पाहू नये, दिवस पाहू नये, रविवार पाहू नये, सुट्टीचा दिवस पाहू नये अशी अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षा संपल्यावर कशी स्थिती होते? जणू काही एखाद्या फुग्यातली हवा गेल्यावर जशी स्थिती होते तशी! असे कोणीही उत्तर देईल.

अतुलेसाहेबाच्या राजिनाम्यानंतर महाराष्ट्राची स्थिती त्या अभ्यासू विद्यार्थ्यासारखी वा त्या हवा गेलेल्या फुग्यासारखी झाली होती असे म्हटल्यास वावगे वाटू नये. राधा व श्याम हे महाराष्ट्राचे अविभाज्य घटक असल्याकारणाने त्यांची स्थिती सगळ्या महाराष्ट्रासारखीच झाली होती. परीक्षेनंतर आता काय? असा जसा विद्यार्थ्यांसमोर प्रश्न पडतो तसा महाराष्ट्रासमोरही पडला होता.

एखाद्या माणसाचे जीवनच असे असते. येथे 'एखादा' म्हणजे अंतुले साहेब होत हे वेगळे सांगायला नकोच. नाही तर आतापर्यंत किती तरी मुमं आले काय, राहिले काय व गेले काय! नाही झाली त्याची चर्चा, नाही केली ते काय करतात म्हणून कोण उठाठेव; पण अंतुलेसाहेबांचे सगळेच वेगळे. निवडणूक होण्याच्या आधीच तेच मुमं होणार हे ठरून गेल्यासारखे होते. पण त्यांनी निवडणूक अशी लढवलीच नाही. आधी मुमं झाले व मग निवडून आले!—बरं निवडून आल्यावर तरी त्यांना कोणी शांतपणे आपले काम करू दिले का? नाव नको. इतके सगळेजण इतके सगळ दिवस एकाच माणसाच्या मागे लागल्याचे क्वचितच! आता त्या सगळ्यांच्या कष्टाला फळ आले होते. परीक्षा संपली होती, फुग्यातली हवा निघून गेली होती!

अंतुलेसाहेब राधाचेच काय पण महाराष्ट्रातल्या समस्त स्त्रीवर्गाचे अगदी तनमणी होते; पण त्यांचे तनमणीपण त्यांच्या मुमंपणावर अवलंबून नव्हते, ते होते त्यांच्या दूद कलाकारपणावर! दूदकलाकार म्हणून ते जास्त लोकप्रिय वा स्त्री-वर्ग प्रिय होते. एक दिवस जरी त्यांची झुलफेदार छबी दूदवर दिसली नाही तर असंख्य स्त्री-चहात्यांप्रमाणे राधाही फार कष्टी व उदास होऊन जात नसे.

कोणताही 'दिवस' असो, कोणतेही 'वर्ष' असो, कोणताही सण असो, कोणताही कार्यक्रम असो अंतुलेसाहेबांची हसरी, झुलफेदार छबी दूदवर दिसली नाही असे होत नसे. फक्त झुलपयावर लाखो लोकांची मन जिंकणारा दिलिपकुमारनंतर अंतुलेसाहेबच!

राधा अंतुलेसाहेबांच्या बाजूची होती म्हणन श्याम त्यांचा विरोधक होता. आता ह्यावर असं का? म्हणून वादंग माजवण्याची गरज नाही.

प्रसिद्ध सिनेनट डॅनी के ह्याचा एक फार छान व जीवनाला धरून असलेला विनोद आहे. डॅनी के आजारी असतो म्हणून कोणा मनो-वैज्ञानिकाकडे जातो. तेथल्या कोचावर पडून डॅनी के त्या डॉक्टरांच्या प्रश्नांना उत्तर देत असतो व आपल्या लहानपणीच्या जीवनाची माहिती देत असतो. आपल्या लहानपणी आपले आई-बाप कायम भांडत असल्याचे डॅनी के ने सांगताच डॉक्टर त्याला विचारतो की, 'का भांडत असत ती अशी एकसारखी?' डॅनी के उत्तर देतो, 'Because they were married!' त्यांचे लग्न झाले होते ना? म्हणून!

श्याम-राधाचे चांगले देवा-ब्राह्मणासमोर व नातेवाईक, लेकी-सुना व इष्ट मित्रमंडळी समवेत लग्न झाले होते.

साधे भाड्याला भांडे लागले की, केव्हढा आवाज होतो. मग येथे दोन जिवंत माणसे इतकी जवळ येत असता 'आवाज' होणे साहाजिकच नाही का? भांड्या-भाड्यात माणसा-माणसात फरक इतकाच-तेथे दोन्ही भांडी वाजतात.. येथे एकच माणूस वाजत असते. दुसरा फरक असा की, वाजणारे भांडे धरले की आवाज थाबतो. येथे माणसाला धरले तर त्याचा आवाज जास्तच वाढतो! आता राधा अंतुलेसाहेबाच्या बाजूची होती तर श्याम त्याच्या विरोधात होता. ह्याच्या कारणाविषयी वर वादंग माजू नये असे म्हटले, ह्याच्यामागची 'कारणमीमांसा' कळावी.

श्याम-राधातला विरोध फक्त अंतुलेसाहेबापुरता मर्यादित नव्हता. राधा हिंदूमहासभेची होती त्या वेळी श्याम कॉंग्रेसचा होता! आता राधा कॉंग्रेस (आय) ची होती तर श्याम कॉंग्रेस (एटू झेड्) चा! राधा स्त्रीस्वातत्र्याचा पुरस्कार करणारी तर श्याम स्त्री-स्वातत्र्याचा कट्टा वैरी! पण काही कारणाने राधा स्त्री-स्वातंत्र्याची कट्टी वैरी असली तर श्याम स्त्री-स्वातंत्र्याचा पक्का कैवारी बनला असता!

श्याम-राधा विरोध फक्त राजकारण व समाजकारण ह्यापुरता मर्यादित नव्हता. राधाला उंच टाचेचे बुट आवडत असत तर श्याम त्याचा तिरस्कार करत असे. श्यामच्या विरोधाचे कारण उंच टाचेचे बूट फार 'लागतात' हे तर होतेच; पण ते घातले की राधा श्यामपेक्षा उंच दिसून त्याचा पुरुषी अहंभाव दुखावला जात असे हे जास्त महत्वाचे कारण होते.

हेच विरोध त्यांचे सांस्कृतिक बाबतीत पण होते. राधाला हिन्दी सिनेमा अगदी मनापासून आवडत तर श्यामला ते अगदी नावडत! राधा मुख्य साहित्यसंमेलनाच्या बाजूची तर श्याम मुबई साहित्यसमेलनाच्या बाजूचा! राधा मत्र्यांना अगदी अगत्याने बोलवावे अशा विचाराची तर श्याम अगदी मंत्र्यानाच काय पण सत्र्यांनाही बोलावू नये ह्या विचाराचा!

एवंच काय की श्याम व राधा नवरा-बायको होते म्हणून दोन ध्रुवाप्रमाणे होते म्हणून राधा अंतुल्यांच्या बाजूची होती तर श्याम अंतुलेविरोधी होता! अंतुलेसाहेबांच्या राजिनाम्यामुळे राधाला खूप दु ख झाले होते तर श्यामला पुत्रजन्माइतका आनंद झाला होता!

तेव्हा राधाच्या 'अंतुलेसाहेबांचा राजिनामा स्वीकारला की बाईनी' ह्या कळवळ्याच्या वाक्यावर श्याम आनंदाने व खडूस-

पणे म्हणाला, 'अग, अंतुले गेले तर गेले. अतुले म्हणजे काही पडित नेहरू वा आता म्हणावयाचे म्हणजे इंदिरा गाधी नाहीत की, 'After Nehru, who?' वा 'After Indira which one?' असा प्रश्न निर्माण व्हायला

श्यामने नेहमीप्रमाणे आपल्या जिवाला लागलेला प्रश्न इतक्या हसण्यावारी नेला हे पाहून राधाच्या जिवाचा अगदी तीळ-पापड झाला. पापड विस्तवावर टाकतात जसा तडकून उठतो तशी राधा तडकून उठत म्हणाली,

'तोंड पहा दुसरे कोणी येणार आहे त्याचं...'

'ते काय आता दूदवर दररोज दिसेलच!' श्यामचा खडूसपणा कणानेही कमी झाला नव्हता!

'इतका तडफदार, इतका झुलफेदार, इतका आपला हा .. 'राधाला आणखी कसला 'दार' असतो ते आठवेना, इतका आपला हा ... महाराष्ट्राला परत मिळणे शक्य नाही!'

'झुलफेदारपणाचे काही सागता येत नाही; पण झुलप्यात एवढे ठेवले आहे काय?' श्यामने विचारले.

श्यामच्या टाळूवरचे केस अलीकडे विरळ होत चालले होते व 'भाली चद्र असे धरिला' प्रमाणे त्याच्या डोकीवरचा चद्र दिवसेंदिवस, एका एका कलेने वा एका-एका केसाने मोठा होत चालला होता. त्यामुळे त्याचा झुलफेदारपणावरच काय पण सगळ्याच चागलं जावळ असलेल्या लोकाबद्दलचा आदर कमी होत चालला होता.

'अग, टक्कल असणे हे खरे बुद्धिमत्तेचे लक्षण आहे. फार जावळ असणे वा झुलफेदार केस असणे हे नव्हे!'

'ते तुमच्या 'जार्ज द पहिला' वरून दिसतेच आहे.' राधाला खूप वेळानतर खडूसपणे बोलायला मिळाले म्हणून आनद झाला होता व त्या आनंदातच ती हे म्हणाली होती.

राधा व श्याममधला हा आणखी एक वादाचा मुद्दा! हिंदुस्थानातला कोका-कोला बंद केला म्हणून राधाचा जार्ज द पहिल्यावर फार राग होता, तर श्यामला तो फार आवडत असे. ह्याचा अर्थ त्याला जॉर्ज द पहिल्याचे राजकारण वा कार्यक्रम पसंत होते म्हणून, असे नव्हे. जॉर्ज द पहिल्यामुळे वर्षातून कचेरीला दोन-तीन वेळा बिन-बोभाट सुट्टी मिळते, हे त्या आवडतेपणाचे कारण होते.

'तुम्ही काही म्हणा पण 'ह्या सम ह्या' असा मुमं आता ह्यापुढे होणे नाही!' अर्थातच राधा फार मोठ्या ठामपणे म्हणाली.

'काय केले तुझ्या अंतुलेसाहेबांनी एवढे?' श्यामने आज वाद अगदी तडीस नेण्याचे ठरवले होते.

'शिवाजीची तलवार......'

'कुठली तलवार नी कुठले काय?'

'ते असू दे. आतापर्यंत महाराष्ट्राचे चांगले डझनभर मु. मं. होऊन गेले. त्यांना कधी आठवण तरी झाली होती का की, शिवाजी नावाचा कोणी थोर पुरुष होऊन गेला व तो तलवारीने लढत असे म्हणून? उलट शिवाजीच्या शत्रूला आपण चांगले दोनदा मु. मं. बनवले होते!'

राधा अेकदा चिडली म्हणजे कोणाला हटत नसे हे श्यामला माहीत होते; पण तिचा स्वातंत्र्योत्तर काळाचा महाराष्ट्राचा इतिहास इतका पक्का असेल ह्याची त्याला कल्पना नव्हती. 'इतिहास वाचून माणूस हेच शिकतो की इतिहास वाचून माणूस काही शिकत नाही,' ह्या तत्त्वावर श्यामचा विश्वास होता, म्हणून तो इतिहासच लक्षात ठेवत नसे.

'त्या तलवारीची काही भानगड झाली असेल; पण अंतुलेसाहेब तिच्याकरता विलायतला गेले, तिच्याकरता खटपट केली हे नाकारण्यात काय अर्थ आहे? तसेच रत्नागिरी जिल्ह्याचे दोन जिल्हे केले, नाशिकला काही मोठे कमिशनरसाहेबांचे ऑफिस उघडले. जागच्या जागी हजारो नव्हे लाखो रुपये देणगी देणारा हा पहिलाच! अंतुलेसाहेबानी काही तरी केलं की नाही?'

'काही तरी केलं? काही तरीच केलं म्हणून तर हा सगळा घोटाळा झाला!'

'लोकाना बोलायला काय होते? पण त्यानी काही तरी केले. आता त्या प्रतिष्ठानात त्यांचा स्वतःचा काय फायदा...' राधाचे वाक्य मध्यच तोडून श्याम म्हणाला,

'पण म्हणून काय बेकायदेशीर गोष्टी करावयाच्या?'

'अहो, काही काम करणाऱ्या माणसाच्या हातून एखाद वेळी चूक होणारच. मी सागते तुम्हाला आता अंतुलेंना काढले म्हणून लोकांना मजा वाटते आहे; पण काही दिवसांनी अंतुले होते तेच बरे होते म्हणावयाची वेळ येणार आहे!' राधाच्या रागाला आता अगदी पारावार राहिला नव्हता.

'ह्या बाईचा शाप खरा होणार बहुतेक!' श्याम मनाशी म्हणाला. आता राधाला फार चिडवून उपयोगाचे नाही हे त्याने जाणले. आता तिच्या कलाकलाने घ्यावे व तिला आनंदित करावे ह्या हेतूने श्याम म्हणाला,

'अग, महाराष्ट्राचे मु. मं. पद म्हणजे काही मोठेपणाची शेवटची पायरी नाही. कदाचित् ह्या वाइटातून काही चांगले निघेल. अंतुलेसाहेब कोणा महत्त्वाच्या देशाला वकील म्हणून जातील वा एखाद्या महत्त्वाच्या प्रांताचे सुभेदार होतील किंवा मध्यवर्ती सरकारात त्यांना महत्त्वाचे मंत्रीपद मिळेल!'

श्यामच्या ह्या भाषणाने राधाचा राग खूप कमी झाला. श्यामचे म्हणणे तिला थोडे थोडे पटले; पण त्याच्याशी संपूर्णपणे सहमत होणे शक्य नव्हते. ती म्हणाली, 'अंतुलेसाहेबांनी वकील वा सुभेदार मात्र होऊ नये. वकील वा सुभेदार म्हणजे चांगल्या कर्तबगार माणसाचा शेवट!'

आता राधाचा राग गेला आहे हे पाहून मघापासून मनात दाबून ठेवलेला विचार श्यामने बोलून दाखवला.

'ह्या वाइटातून आणखी एक चागले निघणार आहे बघ!'

आता आणखी काय चागले निघणार आहे? ह्या प्रश्नार्थक भावनेने राधाने श्यामकडे पाहिले. तिला तसेच पहात ठेवून श्यामने तिची उत्सुकता वाढवली. श्याम लगेच काही बोलला नाही. आता तो लेखक झाला असल्याकारणाने वाचकांची उत्सुकता वाढवून त्यांना कसे टांगत ठेवावे हे त्याला कळले होते. राधाला त्याने तसेच काही काळ टागत ठेवले.

तो काहीच बोलत नाही हे पाहून राधा जास्तच उत्सुकतेने विचारती झाली, 'सांगा ना, ह्या वाइटातून आणखी चांगले काय निघणार आहे ते?'

श्याम एक एक शब्द स्पष्टपणे उच्चारत म्हणाला, 'आता अंतुलेसाहेबाना मराठी साहित्यसमेलनाला मोकळेपणी जाता येईल!'

राधाच्या हाताशी त्या वेळी लाटणे नव्हते. नाहीपेक्षा ह्या वाइटातून निघालेल्या चागल्यातून आणखी काही वाईट निघाले असते! □



# एक मुक्त चिंतन

## वेदान्त सिद्धांत, योगसाधना, योगसिद्धी व साक्षात्कार

**प्रा. डॉ. नरसिंह अ. दाभोळकर** (M. D.)

ॐ सर्वे वै सुखिनः सन्तु । सर्वे सन्तु निरामयाः ।।
सर्वे भद्राणि पश्यन्तु । मा कश्चिद् दुखमाप्नुयात् ।।

ही विश्वमानवधर्माची प्रार्थना भारतीय संस्कृती आपणास शिकवते. भारतीय संस्कृतीची गतिमानता, चैतन्यदायकता व सर्वार्थसाधकता, महर्षी व्यासांपासून ते स्वामी विवेकानंदांपर्यंत व त्यानंतरही अनेकांनी वर्णन केलेली दिसते. या संस्कृतीतून निर्माण झालेल्या अनेक गतिमान, चैतन्यदायक व सर्वार्थसाधक व्यक्ती भारतीय इतिहासाच्या पानापानातून विखुरलेल्या दिसतात; पण हे सर्व असून देखील, 'भारतीय समाज' हा शब्द ऐकला की, आपल्या डोळचांपुढे एक विकलांग, स्पृश्यास्पृश्यतेच्या जातिव्यवस्थेने पोखरलेला, दारिद्रय-दुःखाने गांजलेला, हातचलाखीच्या प्रकारांनाही सिद्धी-चमत्कारच मानून त्यांच्या भजनी लागणारा, हजारो वर्षे शारीरिक व मानसिक गुलामगिरीत खितपत पडलेला, भोळा दैववादी, अंधश्रद्धाळू व पलायनवादी समाज, असे विपरीत दृश्यच उभे राहते. कोणत्याही समाजाची संस्कृती ही त्या समाजाची मूळ प्रकृती असते. संस्कृतीत नसलेले दोष जेव्हा समाजजीवनात दिसू लागतात तेव्हा ती सामाजिक विकृती ठरते व अशी विकृती समाजजीवनात निर्माण होण्याचे एकच कारण असू शकते व ते म्हणजे सांस्कृतिक विचारसंकल्पनाचा विपर्यास. विचार विपर्यासच आपण अज्ञान म्हणतो. आपल्या या अज्ञानास, आपल्या या विचारविपर्यास आपणच जबाबदार असतो व त्यामुळेच तो विचारविपर्यास दूर करण्याची जबाबदारी आपणावरच असते. विचारविपर्यास दूर करण्याचा एकच उपाय असतो व तो म्हणजे मूळ विचार शुद्ध स्वरूपात समजून घेण्याचा, म्हणजेच वैचारिक जनजागरणाचा. महर्षी वाल्मीकी, महर्षी व्यास यांसारख्या थोरामोठ्यांनी रामायण, महाभारत यांसारख्या महान ग्रंथांतून आरंभिलेल्या या जनजागरणाचे यज्ञात अर्पण करण्याकरता आणलेली एक छोटीशी समिधा, येवढेच या लेखाचे स्वरूप. रामाच्या सेतुबंधनाच्या कामातील एका खारीचा हा वाटा. रामाच्या दर्शनाला आलेल्या शबरीची ही उष्टी बोरे. खारीच्या त्या छोटचाशा सेवेने, शबरीच्या त्या उष्टचा बोरांनी, श्रीप्रभुरामचंद्र जसे प्रसन्न झाले त्याप्रमाणेच या छोटचाशा यज्ञसमिधेने यज्ञदेवता प्रसन्न व्हावी व श्रुती प्रमाणित विश्वमानवधर्माचे तेजस्वी, देदीप्यमान स्वरूप केवळ भारतातीलच नव्हे तर सर्व विश्वातील मानवसमाजास पुनः प्राप्त व्हावे, रूढिग्रस्तता, सामाजिक विषमता, वैचारिक असहिष्णुता इत्यादी विकृतींतून सगळा मानवसमाज मुक्त व्हावा व विश्वमानवाचे आपले स्वप्न साकार व्हावे हीच यज्ञदेवतेला प्रार्थना !

### प्रास्ताविक

जे जाणल्यावर जाणून घेण्यासारखे काही रहात नाही, जे अनुभवल्यावर अनुभवण्यासारखे काही रहात नाही ते ज्ञान, तो अनुभव शब्दांकित करण्याचा प्रयत्न म्हणजे वेदातील संहिता, ब्राह्मणे, आरण्यके व उपनिषदे हे विभाग होत. अव्यक्ताला व्यक्त करण्याचा प्रयत्न म्हणजे ही शब्दरचना. या शब्दरचनेचा कळस म्हणजे वेदान्त-सिद्धांत व त्या कळसाचा अंतिम बिंदू म्हणजे प्रणवाचा ॐकार. वेदाच्या या सिद्धांत वाक्यातून व प्रणवाच्या ॐ कारातून प्रगत होणारा अर्थाचा हिरण्यगर्भ म्हणजे वेद. वेदांतील शब्दरचना हे वेदाचे बाह्य अंग असते. वेदाची शब्दरचना जरी मानवनिर्मित असली तरी त्यातून ध्वनित होणारा अर्थ हे एक त्रिकालाबाधित सत्य असते व त्या सत्यालाच आपण श्रुती या नावाने ओळखतो.

वेद अपौरुषेय आहेत असे आपण जेव्हा म्हणतो तेव्हा ते वेदातील शब्दरचनेला उद्देशून केलेले विधान नसते तर त्या शब्दरचनेतून ध्वनित होणाऱ्या व प्रत्यक्षात अनुभूतीस येणाऱ्या वस्तुस्थितीला उद्देशून असते. वेदातील गतिमानता, चैतन्यदायकता व पुरुषार्थसाध-

कता समजून घेण्याचा प्रामाणिक प्रयत्न म्हणजेच हे मुक्त चिंतन.

### उपनिषदे, ब्रह्मसूत्र व वेदान्तसिद्धान्त

विश्वाबद्दलचे कुतूहल मानवी जाणिवेला नवीन नाही व या कुतूहलाचा शोध घेताना तिला सापडलेले उत्तर म्हणजेच वेदान्तसिद्धांत. या सिद्धांताचेच सूत्रबद्ध विवरण बादरायणाने वेदांतसूत्रात केलेले दिसते. गुरूच्या शेजारी बसून हा सिद्धांत समजून घेण्याचा निरनिराळ्या शिष्यांनी केलेला प्रामाणिक प्रयत्न म्हणजेच निरनिराळी उपनिषदे. निरनिराळ्या शब्दरचनेमुळे चार निरनिराळ्या वेदात जरी चार निरनिराळी सिद्धांत वाक्ये दिसत असली तरी त्यातून ध्वनित होणारा अर्थ एकच असतो.

ऋग्वेदातील 'प्रज्ञानं ब्रह्म'

अथर्ववेदातील 'अयम् आत्मा ब्रह्म'।

सामवेदातील 'तत् त्वमसि'।

यजुर्वेदातील 'अहं ब्रह्मास्मि'।

ही ती चार सिद्धांतवाक्ये होत व या निरनिराळ्या शब्दरचनेतून ध्वनित होणारा अर्थच प्रणवाच्या ॐ कारातून ध्वनित होत असतो.

### प्रज्ञानं ब्रह्म

जिच्यामुळे हे अमर्यादित काय आहे हे जाणून घेण्याची जिज्ञासा निर्माण होते, जिच्यामधून सर्व शास्त्रीय व अशास्त्रीय कल्पना जन्माला येतात, जिच्यामध्येच ते विचार वाढतात व जिच्यामध्येच त्या विचारांचा व जिज्ञासेचा लोप घडून येतो ती जाणून घेण्याची शक्ती म्हणजेच मूर्तिमंत अमर्यादितता. ब्रह्म या शब्दातून तो ध्वनित होते. अमर्यादित ज्ञानशक्तीबद्दल वापरण्याचे चिन्ह म्हणजे ब्रह्म हा शब्द. 'प्रज्ञानं ब्रह्म' या सिद्धांत वाक्याचे सूत्रबद्ध भाषेत याप्रमाणे वर्णन करता येते.

### ज्ञानाची व्याख्या

'ज्ञायते अनेन् इति ज्ञानम्'। जिच्या सहाय्याने जाणून घेतले जाते ती शक्ती म्हणजे ज्ञान अशी ज्ञान या शब्दाची व्याख्या केली जाते. आकाशातील ग्रहगोलाचे सूत्रबद्ध परिभ्रमण, अणूमधील इलेक्ट्रॉनची नियमबद्ध हालचाल, निर्जीव पदार्थाचे स्थितिस्थापकत्व, वनस्पतीच्या श्वसन अभिशोषणवादी क्रिया, सचेतन प्राण्याच्या देहरक्षणात्मक हालचाली, तसेच जागृत मानवाचे प्रज्ञा, मेधा, धृती, स्मृती, विवेक, प्रेरणा, संकल्प, विकल्प, कर्मनिर्णय, स्वाधीनता इत्यादी गुण या सगळ्यामधून याच शक्तीचे नानाविध आविष्कार प्रगट होत असतात व त्यामुळेच ती सर्वव्यापी असते. निरनिराळ्या पदार्थमात्राचे आकारमानाप्रमाणे तिच्या अभिव्यक्तीत जरी फरक पडला तरी जाणून घेण्याची शक्ती हेच तिचे मूळ स्वरूप असल्याचे सहज ओळखता येण्यासारखे असते.

### 'ब्रह्म'चे व्यक्त स्वरूप

सागर हा शब्द उच्चारला की अमर्यादित पसरलेल्या पाण्याची प्रतिमा आपल्या मनाच्या पडद्यावर उमटते त्याप्रमाणेच 'ब्रह्म' हा शब्द ऐकला की, आपल्या मन पटलावर ज्ञानाच्या प्रकाशात दिसणारी ज्ञानेंद्रियादी साधने व त्या साधनातून सूर्य, चंद्र, विद्युत व अग्नी इत्यादी ज्योतीच्या उजेडात दिसणारी पृथ्वी, समुद्र, अंतरिक्ष, आकाश अशी नानाविध रूपे उमटतात. 'ब्रह्म' हा शब्द ऐकताच मन पटलावर उमटणारी ही प्रकाशवाहू, आयतनवान, ज्योतिष्मान व अनंतवान रूपे हेच ब्रह्मचे व्यक्तरूप असते.

### अयं आत्मा ब्रह्म । तत् त्वमसि । अहं ब्रह्मास्मि

सागरातील प्रत्येक बिंदू ज्याप्रमाणे अंशमात्र सागरच असतो त्याप्रमाणेच ज्ञानसागरातील प्रत्येक ज्ञानबिंदू हा अंशमात्र ज्ञानसागरच असतो. ज्या पाण्याच्या स्वरूपात सागर प्रगट होतो त्या पाण्याचे सगळे गुणधर्म ज्याप्रमाणे सागरातील बिंदू-बिंदूमध्ये असतात त्याप्रमाणेच ज्या प्रकाशवान, आयतनवान, ज्योतिष्मान, अनंतवान स्वरूपात ज्ञानसागर प्रगट होतो ते प्रकाशवान, आयतनवान, अनंतवान व ज्योतिष्मानरूप ज्ञानसागरातील प्रत्येक बिंदू-बिंदू मधून व्यक्त होत असते. सागरबिंदूशिवाय सागराला स्वतःचे असे स्वतंत्र आस्तित्व नसते त्याप्रमाणेच ज्ञानबिंदूव्यतिरिक्त ज्ञानसागराला स्वतंत्र असे आस्तित्व नसते व हीच गोष्ट "अयं आत्मा ब्रह्म" हे सिद्धान्त वाक्य सागते ज्ञानबिंदू हेच तुझे स्वरूप आहे या वस्तुस्थितीचे वर्णनच "तत् त्वमसि" हे सिद्धान्तवाक्य करते. ज्ञानबिंदूव्यतिरिक्त असे स्वतंत्र अस्तित्व मला नसते. ज्ञानबिंदूतील प्रकाशवान, अनंतवान, ज्योतिष्मान, आयतनवान स्वरूप पाहणारा तो मीच आहे. ही अनुभूतीच "अहं ब्रह्मास्मि" या सिद्धान्तवाक्यात व्यक्त होते.

### व्यक्ताचे अव्यक्त स्वरूप–सत्‌चित् आनंदावस्था

देहेंद्रियादि साधनातून वायुरूप, द्रवरूप, घनरूप इत्यादी नानाविध आविष्कारात आविष्कारणारे विश्व मूलत. शक्तिस्वरूप असते. हा विचार आपणास आता नवीन नाही. शक्तिस्पंदातून निर्माण होणाऱ्या लहरींनी किंवा कणानी या पदार्थमात्रातील अणुरेणू घडत असतात असे भौतिकी विचार आपणास सागतात. अणुरेणूंच्या वैशिष्टयपूर्ण रचनेतून निर्माण होणाऱ्या या पदार्थमात्रात नामरूपादी गुणधर्म भरण्याचे कार्य आपले विचार करतात. विचार हे अव्यक्त अशा जाणून घेण्याच्या शक्तीचेच व्यक्त स्वरूप असते. जाणिवेच्या स्पंदातूनच विचार उत्पन्न होतात, जाणिवेतच ते वाढतात व जाणिवेतच त्यांचा लोप घडून येतो व त्याची जागा नवीन विचार घेतात. या विचारांतूनच विश्वाची नानाविध रूपे साकार होऊ लागतात. विचाराचे स्वरूप जसे बदलते तसे या दृश्यमान विश्वाचेही स्वरूप बदलते. विचारांचे स्वरूप बदलताच उदय-अस्त पावणाऱ्या सूर्यातील स्थिरता जाणवू लागते. निळ्याभोर छपरासारखे दिसणारे आकाश रंगहीन हवेची पोकळी दिसू लागते. स्वच्छ सूर्यप्रकाशात न दिसणारे नभतारागण चर्मचक्षूच्या मर्यादा सांगू लागते. एवढेच नव्हे तर भौतिकी विचारातून शक्तिरूप दिसणारे विश्वच आधिभौतिकी विचारातून चैतन्यस्वरूप दिसू लागते व जाणिवेतील या वैचारिक स्पंदाचा जेव्हा पूर्ण निरोध होतो, तेव्हा उरते फक्त एक निस्पंद, निर्गुण, निराकार, निर्विकल्प, निरंजन, नित्यमुक्त, निर्विकार, निष्क्रिय, शाश्वत, अव्यक्त अनंताची आनंदमय अनुभूती–सत्-चित्-आनंदावस्था.

### पूर्णमदः पूर्णमिदम्

'पूर्णत्वाला पूर्णत्वातून येणारी ही पूर्णत्वाची अनुभूती असते. त्यात अधिक-उणे काहीच नसते. असते ते फक्त पूर्णत्वच. ज्ञान-

ार ांरा ा त्येक बिंदू-बिंदू मधून अनुभूतीला येणारी आपल्या अमर्यादित शाश्वत, अव्यक्त, साक्षी, स्वरूपाची अनुभूती येवढेच या अनुभूतीचे स्वरूप असते.

### मोक्ष

स्वरूपाच्या या पूर्णानुभूतीत देहेन्द्रियाचे साधनस्वरूप स्पष्ट होते. देहभावाचा बंध गळून पडतो. विश्वाचे रंगभूमीवरील देहाचे कार्य स्पष्ट दिसू लागते व ते कार्य करताना तो देह जरी कुणी सिंहासनावर चढवला किंवा खिळयानी क्रूसवर ठोकला, त्या देहाचा कुणी सन्मान केला किंवा अवमान केला, त्या देहाला कुणी वंदिले किंवा निंदिले, तरी त्यामुळे आपल्या निर्विकारतेत काहीच बदल घडून येत नाही. कारण आपण असतो या सर्वांचे साक्षी. स्वरूपाची ही अनुभूती प्राप्त झाल्यावर कमल जसे चिखलात राहूनही चिखलापासून अलिप्त असते त्याप्रमाणेच आपणही देहात राहून देहापासून अलिप्त बनतो.

### योग साधना

वेदकालीन ऋषिमुनीसारख्या चिंतनशील व्यक्तींना ही अनुभूती स्वरूप-चिंतनातून स्वभावतःच प्राप्त झालेली दिसते. आपल्यासारख्या सर्वसामान्यांना मात्र या अनुभूतीचा योग येण्यासाठी इतर क्रियांची गरज असते. साक्षात्कार अनुभूतीचा योग प्राप्त करून घेण्याच्या या क्रियांनाच योग साधना म्हणतात. योग साधनेत वृत्ति निरोधाने हे साध्य, साध्य करून घेता येते.

### योगसाधनेतील वृत्तीनिरोध

जाणिवेतून विचार स्फुरतात व हे विचारच आपणाला दिसणाऱ्या आपल्या स्वरूपाबद्दलही जबाबदार असतात. स्वरुपाची नानाविध रूपे दाखवणाऱ्या या विचारस्पंदांचा जेव्हा निरोध घडून येतो तेव्हा आपोआपच पूर्णत्वाचा साक्षात्कार आपणास घडून येतो व विचारांची साधनमात्रता आपणाला स्पष्ट दिसू लागते. आरशाच्या वक्रतेचे भान असलेल्या आपली, ज्याप्रमाणे आरसेमहालातील निरनिराळ्या वक्रतेच्या आरशांतून दिसणाऱ्या आपल्या बऱ्यावाईट स्वरूपांकडे पाहून करमणूक होते, त्याप्रमाणेच विचाराची साधनक्षमता लक्षात येताच निरनिराळ्या विचारशलाकातून दिसणारी आपली निरनिराळी रूपे पाहून आपली करमणूकच होते. कारण आता आपण असतो या सर्व बऱ्या-वाईट स्वरूपांचे केवळ साक्षी.

## योगसाधनेतील वृत्तीविचार

विचारवृत्तीचा निरोध होताच पूर्णत्वाच्या अनुभूतीचा योग येतो व आपले साक्षीस्वरूप आपणास प्राप्त होते. विचारवृत्तीचे दोन प्रमुख प्रकार पडतात ज्या वृत्तीचा निरोध घडवून आणावयाचा त्या वृत्ती व दुसरा म्हणजे ज्या विचारवृत्तीच्या साहाय्याने हा निरोध घडवून आणावयाचा त्या वृत्ती.

विचारवृत्ती निर्माण करणाऱ्या संस्कारातील काही संस्कार मेंदूच्या जडणघडणीपासूनच त्यात निद्रिस्त स्वरूपात असतात. काहींची स्मृती नंतर जागृत होते. आपले व इतरांचे इंद्रियानुभव, आपले वाचन, श्रवण, मनन, चिंतन त्यातून निर्माण होणारी अनुमाने, विपर्यास, शंकाकुशंका इत्यादी अनेक कारणांनी हे वृत्तीविचार आपल्या मानवी मेंदूला व्यापत असतात व त्या विचाराच्या रंगरूपाप्रमाणे त्या विचारातून आपणाला आपले स्वरूप दिसत असते व या स्वरूपात ज्या देहाचा मेंदू हे विचार व्यापत असतात त्याचा प्रामुख्याने समावेश असतो. वृत्तीनिरोधाने या देहभावाचा लोप घडून येतो व आपण दिव्यत्व पावतो. वृत्तीनिरोधासाठी वापरावे लागणारे विचार देहभावाचे कमी अधिक रंगरूपाप्रमाणे निरनिराळ्या रंगरूपाचे असतात व त्यामुळेच विचारांच्या रंगरूपांचा विचार योगसाधनेत प्रथम करावा लागतो.

## विचारांची त्रिगुणावस्था व चातुर्वर्ण्य

जाणिवेतून विचार स्फुरतात व या विचाराचे रंगरूपाप्रमाणे आपणास आपले रंगरूप दिसू लागते व या विचाराचे गुणधर्माप्रमाणे आपल्या देहाची कार्ये घडत असतात. आपणास दिसणारे आपले स्वरूप व आपल्या देहाकडून घडून येणारी कर्मे याचा प्रामाणिकपणे वस्तुनिष्ठ अभ्यास करून, आपणास ज्या विचारांचा निरोध करावयाचा असतो त्या विचारांचा गुणधर्म व रंगरूप ओळखता येते व त्यास अनुरूप अशा विचाराचे साहाय्याने त्याचा निरोध करता येतो. सर्वसाधारणपणे या वर्गवारीत विचारांची सत्व, रज, तम या तीन गुणात व ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार वर्णात वर्गवारी होते व हे चार वर्ण गुणकर्माप्रमाणे ठरत असतात व आपल्या विचारामुळे आपल्या देहाकडून घडून येणाऱ्या कर्मगुणावरूनच त्याचे स्वरूप समजत असते. यालाच आपण विचाराची त्रिगुणावस्था व चातुर्वर्ण्य म्हणतो या वर्णविचारामध्ये शारीरिक अनुवंशिकतेचा किंवा कोणाला अधिकउणे लेखण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. ज्याने त्याने आपापल्या विचाराचा वर्ण ओळखून त्यास अनुरूप असा साधनामार्ग स्वीकारावयाचा असतो. आपणास आपल्या विचारांचे गुण व वर्ण ओळखण्यास मदत व्हावी येवढाच या वर्णव्यवस्थेचा उद्देश असतो. कोणत्या वर्णाने कोणती कर्मे करावीत हे सांगणारी ही आचार संहिता नसते तर कोणत्या वर्णाकडून कोणती कर्मे घडून येतात हे समजावून देणारी ही वर्णचिकित्सा असते.

## तमोगुण व शूद्रवर्ण

विचार जेव्हा अगदीच बाल्यावस्थेत असतात तेव्हा आपणाला दिसणारे आपले स्वरूप त्या विचारानी ज्या देहाचा मेंदू व्यापलेला असतो त्या देहाएवढेच दिसते शारीरिक सुखोपभोगावरच आपले हे विचार केंद्रित झालेले असतात. या विचारामुळे शारीरिक सुखोपभोगासाठी कुटुंब, जमात, राष्ट्र इत्यादींच्या हिताचेही बळी देण्यास आपण तयार होतो. कोणत्याही कृतीत सुखोपभोगापलीकडे काही अन्य हेतू असू शकतो हा विचारच आपणास परका वाटतो. खा, प्या, शरीरसुख उपभोगा हेच आपले उद्दिष्ट बनते. ज्या देहाला हे विचार व्यापतात त्या देहाच्या जन्म, बालपण, तारुण्य, वार्धक्य इत्यादी अवस्थातील चढउतार आपण आत्मीयतेने भोगू लागतो. देहाला अनुकूल गोष्टी घडून आल्यास सुखी होतो, प्रतिकूल गोष्टी घडून आल्यास दुःखी होतो. आपल्या अमर्यादित स्वरूपाबद्दल हे विचार आपणास अगदीच अंधारात ठेवतात व म्हणूनच विचाराच्या या गुणाला आपण तमोगुण म्हणतो व आपणाला आपल्या देहाचे सेवक बनवणाऱ्या या वर्णालाच शूद्रवर्ण म्हणतो. शारीरिक सुखापलीकडे आपली दृष्टी जाऊ न देणाऱ्या व देहाच्या सेवाचाकरीतच

आपणास सदैव राबवणाऱ्या या तमोगुणी शूद्रवर्णीय विचारांचा निषेध करण्यासाठी भक्तियोग हीच एक उपयुक्त योगसाधना असते. जगातील सगळ्या साक्षात्कारी धर्मसंस्थापकांनी हा साधनामार्गच निरनिराळ्या धर्मग्रंथात वर्णन केलेला दिसतो व या धर्मग्रंथाच्या सहाय्याने अनेक व्यक्ती साक्षात्कार अनुभवणाऱ्या साधुसंतांत जमा झाल्याचे आढळून येते.

## रजोगुण व वैश्य आणि क्षात्रवर्ण

विचाराच्या थोड्या अधिक विकसित अवस्थेत आपणाला दिसणाऱ्या आपल्या स्वरूपात देहाबरोबरच कुटुंब, जमात इत्यादी लहानमोठ्या सामाजिक गटाचाही समावेश दिसू लागतो व या विचारांनी व्यापलेला आपला देह शेती, व्यापार, उद्योगधंदे इत्यादींच्या सहाय्याने आपल्या कुटुंब, जमात इत्यादींच्या सुखसोयीत भर घालण्यासाठी धडपडू लागतो. कुटुंबाच्या वा जमातीच्या स्वार्थासाठी कोणत्याही शारीरिक हालअपेष्टा सहन करण्यास आपली तयारी असते. कुटुंबाचा किंवा जमातीचा स्वार्थ हाच आपल्या या विचाराचा केंद्रबिंदू असतो व त्यामुळेच कौटुंबिक स्वार्थासाठी साधनसंपत्तिसंचयाचे मागे आपण धावू लागतो व त्यामुळे प्रसंगी राष्ट्राच्या वा मानवतेच्या हिताला धोका पोहोचला तरी आपणास त्याची पर्वा वाटत नाही. विचाराच्या या अवस्थेलाच आपण वैश्यवर्ण म्हणतो. विचारांची याहीपेक्षा अधिक विकसित अवस्था म्हणजे एखाद्या भौगोलिक क्षेत्राबद्दल व त्यामधील सर्वच वस्तुमात्राबरोबर एकात्मता अनुभवणारे क्षात्रवर्णीय विचार. या विचारानी देह व्यापताच पितृभूमी, मातृभूमी इत्यादी शब्दानी आपण आपल्या भौगोलिक क्षेत्राला गौरवू लागतो व त्याच्या एकात्मकतेच्या रक्षणासाठी जरूर पडल्यास त्या विचारानी जो देहाचा अंगरखा पाघरलेला असतो तो अंगरखाही आपण आनंदाने फेकून देतो. राष्ट्रहितासाठी फासाचे दोरही पुष्पमालेच्या सहजतेने आपण आपल्या देहाच्या गळ्यात घालतो.

'हे काय बंधु असतो जरी सात आम्ही। त्वत् स्थंडिलीच दिधले असते बळी मी ॥'

हा या अवस्थेत आपला सार्थ हुंकार असतो. राष्ट्रहित हाच आपल्या या विचाराचा केंद्रबिंदू असतो व त्यामुळेच राष्ट्रीय स्वार्थासाठी अंतर्गत यादवीयुद्धे, आंतरराष्ट्रीय तटे, बखेडे वा जागतिक महायुद्धेही आपण आपल्यावर ओढवून घेतो व सर्व मानवतेलाच धोका निर्माण करतो किंवा दीनदुबळ्या देशबांधवाना मदत करण्याच्या चिंतेत सामाजिक नीतिमूल्यांचेही भान आपणास रहात नाही व आपल्या कृतीने सगळ्या समाजव्यवस्थेलाच धोका निर्माण होतो.

देहाबरोबरच लहानमोठ्या सामाजिक व भौगोलिक गटाचा आपल्या स्वरूपात विक्षेप निर्माण करणाऱ्या व त्या गटाच्या स्वार्थासाठी शारीरिक हालअपेष्टाही आपणास आनंदाने सहन करावयास लावणाऱ्या या युवावस्थेतील धडपड्या विचारवृत्तीना आपण रजोगुणी विचार म्हणतो. वैश्य व क्षात्रवर्ण हे रजोगुणप्रधान असतात. रजोगुणी विचाराचा निरोध करण्यासाठी भक्तियोगाप्रमाणेच कधीकधी निष्काम-कर्मयोगाचा मार्गही जरूर असतो.

## ब्राह्मणवर्ण व सत्त्वगुण

विचारांच्या याहीपेक्षा विकसित अवस्थेत आपणाला दृश्यमान होणाऱ्या आपल्या स्वरूपात देहाबरोबरच सर्व मानवसमाजाचाही समावेश आपणास दिसू लागतो. मानवसमाजापुढील समस्या ही आपणास आपल्यापुढील समस्या दिसू लागते व ती समस्या सोडवण्यासाठी आपण धडपडू लागतो. जनसंपर्कापासून दूर, शांत एकांतवासात एखाद्या प्रयोगशाळेत एखादी समस्या सोडवण्यासाठी ध्यानस्थ बसलेल्या विज्ञान–संशोधकाचे स्वरूप आपणास प्राप्त होते. ज्या ज्या विषयावर आपण आपले ध्यान केंद्रित करतो, त्या त्या विषयावरील नानाविध विचार आपल्या मेंदूत अहोरात्र केंद्रित होऊ लागतात. त्याचे पृथःकरण होऊ लागते व त्यातूनच त्या विषयाबद्दलची नवी नवी रहस्ये, नवीन नवीन विचाराच्या स्वरूपात आपणापुढे उलगडली जाऊ लागतात. ध्यानाच्या या अवस्थेत आपल्या जाणिवेमध्ये स्फुरणाऱ्या या विचारात सर्व विश्व हालवण्याचे सामर्थ्यही उत्पन्न होऊ शकते. मानवी देहाला पाण्याखाली, पाण्यावर किंवा हवेतूनही फिरवून आणण्याची उपकरणे हे विचार निर्माण करू शकतात. मानवी देहाला किंवा एखाद्या स्वयंचलित यंत्रयानाला पृथ्वीवरून दुसऱ्या ग्रहावर घेऊन जाणारी किंवा अणूच्या विस्फोटातून प्रचंड औष्णिकशक्ती निर्माण करण्याची उपकरणे बनवण्याची किमयाही हे विचार करू शकतात. आपल्या जाणून घेण्याच्या शक्तीच्या सर्व शक्तिमानतेचे व सर्वज्ञतेचे सगळे सत्त्वच जणू या विचारातून मूर्तस्वरूपात व्यक्त होत असते व म्हणूनच या विचाराना आपण सत्त्वगुणी विचार म्हणतो. ब्रह्मतेजाचा म्हणजच अमर्यादित ज्ञानशक्तीचा जणू हे विचार म्हणजे ज्वलंत स्फुल्लिंगच असतात. सर्व विश्वाला सुखी व समृद्ध करण्याची किंवा सर्व विश्वाला क्षणात भस्मसात करून टाकण्याची उपकरणे बनवण्याचे सामर्थ्यही या विचारामुळे, विश्वाच्या मानाने कणमात्रही नसलेल्या पृथ्वीवरील, पृथ्वीच्या मानाने कणमात्रही नसलेल्या मानवी देहात निर्माण झाल्यासारखे दिसू लागते. ब्रह्मतेजाचाच जणू मूर्तिमंत आविष्कार असणाऱ्या या विचारानाच आपण ब्राह्मणवर्ण म्हणून ओळखतो. संपूर्ण मानवी समाजापुढील समस्या सोडवण्यावर हे विचार सदैव केंद्रित असतात व त्यामुळे कधीकधी मानवी स्वार्थापुढे आपणास पर्यावरणाचे भान रहात नाही व त्यामुळे प्रसंगी आपल्या कृतीने संपूर्ण जीवसृष्टीतीलच समतोल ढळण्याचा धोका निर्माण होतो. सत्त्वगुणी विचारातून निर्माण होणारा हा धोका टळावा व त्याचा निरोध घडून यावा म्हणून भक्तियोगाप्रमाणेच कधीकधी ज्ञानयोगाची गरज असते.

## योगसाधनेतील अधिकारभेद

तमोगुणी विचार शारीरिक सुखोपभोगाच्या समस्या सोडवण्यावरच केंद्रित असतात. रजोगुणी विचार लहानमोठ्या सामाजिक वा भौगोलिक गटाच्या समस्या सोडवण्यावरच केंद्रित असतात तर सत्त्वगुणी विचार सर्व मानवसमाजापुढील समस्या सोडवण्यावरच केंद्रित असतात. विचाराच्या या कार्यावरून त्याचा गुण ओळखून, त्यातून आपणास दिसणाऱ्या आपल्या स्वरूपाचा वस्तुनिष्ठ अभ्यास करून, त्याच्या निरोधास उपयुक्त असा साधनामार्ग आपणास स्वीकारावयाचा असतो व यालाच योगात अधिकारभेद म्हणतात. झाडावरील फळ तोडण्यासाठी मानवाला असे पक्ष्यासारखे उडत जाता येण्यासारखे नसते किंवा पक्वान्नाचे जेवण जसे तान्ह्या बालकांना हानिकारक

ठरण्याची शक्यता अधिक असते त्याप्रमाणेच या अधिकारभेदाचे स्वरूप असते त्यात आपल्या कुवतीचा वस्तुनिष्ठ विचार करावयाचा असतो. यात श्रेष्ठकनिष्ठतेचा प्रश्नच उद्भवत नाही.

## ज्ञानयोग

जाणिवेतून विचार स्फुरतात हा आपला नित्याचाच अनुभव आहे व याला जाणिवेचा कोणताच अंश अपवाद नसतो. जाणिवेतून स्फुरणारे हे विचार जाणिवेच्या ज्या अंशाला व्यापतात त्या विचाराच्या स्वरूपाप्रमाणे आपणास आपले स्वरूप दिसू लागते. आपणास दिसणाऱ्या या स्वरूपात ज्या मानवी देहाचा मेंदू हे विचार व्यापतात त्या मानवी देहाचा प्रामुख्याने समावेश असतो. आपल्या जाणिवेच्या या स्वरूपालाच आपण मानवी जाणीव म्हणतो. प्रत्यक्षात मानवी जाणीव म्हणून जाणिवेचा काही अलग प्रकार नसतो. अमर्यादित जाणून घेण्याच्या शक्तीचाच तो एक अविच्छिन्न अंश असतो; पण ज्या विचारांनी तो अंश व्यापलेला असतो त्या विचारांच्या रंगरूपाप्रमाणे आपणाला आपले रूप कधी देहासारखे, कधी लहानमोठ्या सामाजिक वा भौगोलिक गटासारखे तर कधी सर्व मानवसमाजासारखे दिसू लागते व या स्वरूपात ज्या मानवी देहाचा मेंदू हे विचार व्यापतात त्या मानवी देहाचा प्रामुख्याने समावेश असतो. विचारांच्या या रंगरूपामुळेच कधी आपणाला आपले रूप जीवासारखे वा आत्म्यासारखे दिसत तर कधी ईश्वरासारखे वा परमात्म्यासारखे दिसते व या सर्व विचाराचा जेव्हा पूर्ण निरोध होतो तेव्हा उरते फक्त अनंताची अनुभूती. पक्व झालेले फळ जसे आपोआपच झाडावरून गळून पडते त्याप्रमाणे विचारनिरोध होताच देहभाव आपल्या जाणिवेतून आपोआपच गळून पडतो. आपणाला दिसणाऱ्या देहाचे, आपणाला दिसणाऱ्या विश्वरचनेतील साधनरूप आपल्या लक्षात येते व त्यामुळेच ते कार्य करताना देहाच्या वाट्याला येणाऱ्या अनुकूल व प्रतिकूल गोष्टींनी आपल्या निर्विकारतेत फरक पडत नाही. वेदकालीन ऋषीमुनी, निरनिराळे महान धर्मसंस्थापक इत्यादींसारख्या चिंतनशील व्यक्तींना हा साक्षीभाव स्वरूप-चिंतनातून आपोआपच प्राप्त झालेला दिसतो; पण आपणासारख्या सर्वसामान्यांना मात्र हा साक्षीभाव प्राप्त करून घेण्याचा शास्त्रशुद्ध साधनमार्ग म्हणजे योग. योगसाधनेने साक्षीभाव प्राप्त होतो का नाही ? हा चर्चेचा किंवा वादविवादाचा विषय होऊ शकत नाही. शास्त्रीय सत्याची सत्यासत्यता आपल्या मानण्या न मानण्यावर अवलंबून नसते. कोणत्याही काळी, कोणत्याही स्थळी प्रयोगाच्या सहाय्याने आपण त्याचा पडताळा घेऊ शकतो. शास्त्रीय प्रयोगातून मिळणारा शास्त्रीय सिद्धांताचा पडताळा हाच शास्त्रीय सिद्धांताच्या सत्यासत्यतेचा पुरावा असतो. कोणी अधिकारी व्यक्तीने सांगितला किंवा कोणा महान ग्रंथात लिहिला म्हणून शास्त्रीय सिद्धांताला महत्त्व येत नसते तर त्या व्यक्तीने सांगितल्याप्रमाण किंवा त्या ग्रंथात वर्णिल्याप्रमाणे प्रयोग करून आपण त्याचा पडताळा घेऊ शकतो, या आपल्या अनुभवामुळे ती व्यक्ती अधिकारी व्यक्ती ठरत असते किंवा तो ग्रंथ महान ग्रंथ ठरत असतो. अर्थात केवळ इंग्रजीचे भाषाज्ञान आहे म्हणून आपणास $E = MC^2$ या आइन्स्टाइनच्या सिद्धांतवाक्याचा अर्थ समजू शकत नाही किंवा त्याचा व्यवहारातही वापर करता येत नाही. प्रत्यक्षात तो अर्थ समजण्यास व त्याचा व्यवहारात वापर करण्यास आपणाला त्या सिद्धांतातील प्रत्येक अक्षरा-अक्षरामागील सगळी वैज्ञानिक संकल्पना अवगत असणे आवश्यक असते, त्याप्रमाणेच केवळ संस्कृत भाषेवर प्रभुत्व आहे म्हणून वेदान्तसिद्धांत समजूनही येऊ शकत नाही किंवा त्याचा व्यवहारात वापरही करता येत नाही. त्यासाठी त्या सिद्धांतातील प्रत्येक शब्दाशब्दामागील वैज्ञानिक संकल्पना पूर्णपणे माहीत असण्याची गरज असते. शिक्षकाच्या मदतीशिवाय कोणत्याही सिद्धांताची मूळ कल्पना आत्मसात करून त्याचा व्यवहारात वापर करण्याचे सामर्थ्य फारच थोड्या चिंतनशील व्यक्तीत असते. लक्षावधीत एखादीच व्यक्ती खऱ्या अर्थाने चिंतनशील असते व अशा लक्षावधी चिंतनशील व्यक्तींपैकी एखादीच व्यक्ती या मार्गाने सिद्धांत समजून त्याचा व्यवहारात वापर करू शकते. आपल्यासारख्या सर्वसामान्यांना मात्र शास्त्रीय सिद्धांत समजून त्याचा व्यवहारात वापर करता येण्यासाठी मार्गदर्शक शिक्षकाची गरज असते. शिक्षकाच्या सहाय्याशिवाय शास्त्रीय सिद्धांत समजून घेऊन त्याचा व्यवहारात वापर करण्याचा अधिकार खरोखरच फारच थोड्यांना असतो. आपणासारख्याने तसा प्रयत्न करणे हेही मूर्खपणाचे साहस ठरण्याचीच शक्यता असते. योगात अधिकारभेद आहे असे आपण म्हणतो तेव्हा त्याचा हा अर्थ असतो. खऱ्या चिंतनशील व्यक्तींनाच चिंतनाच्या सहाय्याने म्हणजेच ज्ञानयोगाच्या सहाय्याने वेदान्त-सिद्धान्त समजून घेऊन त्याचा व्यवहारात वापर करता येणे शक्य असते. ज्ञानयोगामध्ये स्वरूपचिंतनातून "नेति, नेति" मार्गाने चिंतनशील व्यक्ती अशी अनुभूती प्राप्त करून घेते, पण आपणासारख्या सर्वसामान्यांना मात्र तो मार्ग वेड्याच्या इस्पितळातच घेऊन जाण्याची अधिक शक्यता असते. चिंतनशील व्यक्तींना उपयुक्त असलेल्या ज्ञानयोगापेक्षा भक्तियोग व कर्मयोगच आपल्यासारख्या सर्वसामान्यांना जास्त श्रेयस्कर असतो आजोबांचा अंगरखा जसा लहान मुलाला शोभून दिसत नाही त्याप्रमाणे हे असते. यात श्रेष्ठकनिष्ठतेचा भेद नसतो.

## भक्तियोग

मानवी देहापलीकडे आपणास काही अस्तित्व असू शकते या विचाराचा गंधही नसलेल्या व देहाच्याच सेवेत सदा गुंग असलेल्या शूद्रवर्णाला वेदान्त-सिद्धांताचा विचार येवढा परका असतो की, प्रथमदर्शनी हा सिद्धांत समजून त्याचा व्यवहारात वापर करण्याचा अधिकार फक्त उरलेल्या त्रैवर्णिकांनाच आहे असे वाटणे अगदी स्वाभाविक असते. कमी-अधिक प्रमाणात का होईना देहापलीकडे आपणास काही कर्तव्य असते याची जाणीव या तिन्ही वर्णविचारात दिसून येते व त्यामुळेच वेदान्तविचार त्यांना अगदीच परका वाटण्याची शक्यता नसते; पण इंद्रियसुखापलीकडे ज्या विचारांची दृष्टी जाऊच शकत नाही त्या विचाराचा देखील निरोध घडवून आणून स्वरूपाची अनुभूती प्राप्त करून घेण्याचा साधनयोग म्हणजे भक्तियोग. निर्मिती व निर्माता हा विचार आपणास परका नसतो व याचाच वापर विचारनिरोधासाठी भक्तियोगात केलेला दिसतो. चर्मचक्षूंनी दिसणाऱ्या या चराचर विश्वरचनेमागे कोणा तरी सर्वज्ञ, सर्वशक्तिमान विश्वकर्म्याचा हात असला पाहिजे हा विचार अगदी बाल्यावस्थेतही आपण स परका वाटत नाही. विश्वकर्म्याने निर्माण केलेल्या या

विश्वात आपल्या देहेंद्रियांचाही समावेश होतो हे आपल्याला समजू शकते. या विश्वकर्म्याचे सहाय्य जर आपणाला मिळाले तर या विश्वात अशक्य व अप्राप्य असे आपल्याला काहीच रहाणार नाही, हा विचारही आपणाला सहज समजू शकतो व त्यामुळेच आपला स्वार्थ साधण्यासाठी इतर कोणाकडे याचना करण्यापेक्षा या विश्वकर्म्यालाच प्रसन्न करण्याचा भक्तियोगाचा विचार आपणाला सहज पटू शकतो. भक्तियोगात स्वार्थ सोडण्याचे आवाहन नसते तर उलट वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, राष्ट्रीय इत्यादी स्वार्थ साध्य होण्यासाठी विश्वकर्म्याच्या कृपेचे आमिष असते. शूद्रापासून ब्राह्मणांपर्यंत कोणत्याही वर्णविचाराला चालेल असा हा योगमार्ग असतो व म्हणूनच जगातील सगळ्याच साक्षात्कारी धर्मसंस्थापकांनी भक्तियोगाचा सढळ हाताने उपयोग केलेला दिसतो. विश्वकर्म्याने आपणाला दिलेल्या शारीरिक, सामाजिक, वैचारिक साधनसंपत्तीचा उपयोग नीट करून दाखवल्यास तो आपणास अधिक साधनसंपत्ती देईल या विचारातील स्वार्थच आपणाला विश्वकर्म्याला प्रसन्न करण्यासाठी, आपल्या साधनसंपत्तीचा उपयोग इतर वस्तुमात्रांच्या गरजा भागवण्यासाठी करण्यास उद्युक्त करतो व नकळतच आपले लक्ष स्वत:च्या साधनसंपत्तीचा उपयोग इतरांच्या गरजा भागवण्यासाठी कसा करता येईल यावर केंद्रित होऊ लागते. आपल्या शारीरिक, सामाजिक व वैचारिक साधनसंपत्तीची साधनमात्रता आपणास अधिकाधिक स्पष्ट दिसू लागते. देहभावाचा लोप होऊ लागतो व आपोआपच विचारनिरोधाच्या क्रियेला सुरुवात होते. इतरांच्या गरजा भागवण्याचे नवे नवे मार्ग आपणास दिसू लागतात व त्यामुळे आपल्या नावलौकिकात पडणारी भर आपली ईश्वरावरील श्रद्धा अधिक दृढ करण्यास मदत करते व अनंतानुभूतीचा आपला मार्ग आपोआपच मोकळा होतो. भक्तियोगाने केवळ त्रैवर्णिकांनाच खुला असलेला स्वरूपानुभूतीचा मार्ग आपणा सगळ्यानाच खुला करून दिला आहे व म्हणूनच ज्ञानेश्वरासारखे साक्षात्कारी संत भक्तियोगाचे वर्णन 'जैसी नाव स्त्रिये बाळा, तोयतरणी' असे करताना आढळतात. नदी पोहून ओलांडण्याचे सामर्थ्य नसलेल्या आबालवृद्ध स्त्रीपुरुषाना ज्याप्रमाणे नदी ओलाडण्यास नावेचे साधन उपयुक्त ठरते त्याचप्रमाणे चिंतनाच्या सहाय्याने स्वरूपानुभूती प्राप्त करून घेण्याचे सामर्थ्य नसलेल्या आपल्यासारख्यांना अनंतानुभूती मिळवून देण्यासाठी भक्तियोगाची नौकाच उपयुक्त असते. मात्र भक्तियोगाची नौका भवसागराच्या पैलतीरावर घेऊन जाण्यासाठी योग्य अशा नावाड्याची आवश्यकता असते. नाही तर भक्तियोगाचे नावाखाली आपल्या विचारांचे तारू भजनपूजनादी विधीतच घोटाळत राहण्याचा धोका निर्माण होतो. विचारांचे अगदीच बाल्यावस्थेत आपल्याला भक्तियोगाकडे नेण्यास उपयुक्त असलेले हे भजनपूजनादी विधी त्याचा अर्थ न कळता अनंतकाळपर्यंत तसेच चालू ठेवणे प्रत्यक्षात लाभदायी ठरणारे नसते. अर्थ समजल्यावर मात्र ते विधी तसेच चालू ठेवणे हे भक्तियोगाचे एक महत्त्वाचे अंग असते. नाही तर आपल्या कृतीने बाल्यावस्थेतील अनेकाचा बुद्धिभेद होण्याची शक्यता असते व त्याना भक्तियोगाचे द्वार आपल्या कृतीने बंद होण्याचा धोका निर्माण होतो. 'गुतून करती अज्ञ, ज्ञात्याने मोकळेपणे, करावे कर्म तैसेची इच्छुनी लोकसंग्रह' या गीतावचनाचा हा अर्थ असतो. 'नेणत्या कर्मनिष्ठांचा बुद्धिभेद करू नये' हाच आता भजनपूजनादी विधीत आपला उद्देश असतो. आई ज्या समरसतेने लहान मुलीच्या भातुकलीच्या खेळात सहभागी होते त्याच समरसतेने आपणाला या भजनपूजनादी विधीत सहभागी होणे आवश्यक असते व प्रसंगी खाद्यावर दिंडी-पताका घेऊन नाच करतकरतच आपल्या साधनसंपत्तीचा उपयोग इतरांच्या मदतीसाठी कसा करावा याचे मार्गदर्शन इतराना करावयाचे असते. भक्तियोगातीलच हा एक आचारविधी असतो. कोणत्याही साक्षात्कारी साधुसंताच्या कृतीचे डोळसपणे अवलोकन केल्यास आपल्या हे स्पष्ट लक्षात येण्यासारखे असते; पण तसे न करता केवळ त्यांच्या भजनपूजनादी क्रियाचेच आपण अंधानुकरण करत राहिलो तर त्यापासून आपला फायदा होणे शक्य नसते. अर्थात् हा दोष भक्तियोगाचा नसतो तर भक्तियोगाचे रहस्य आपल्याला न समजल्याचा असतो. कोणताही शास्त्रीय प्रयोग, रहस्य न समजता, चुकीच्या पद्धतीने केला तर असा धोका नेहमीच संभवत असतो व म्हणूनच भक्तियोगाचे रहस्य नीट समजण्यासाठी योग्य मार्गदर्शक गुरु आवश्यक असतो. नाही तर सिद्धि-चमत्कारांच्या आपल्या विपर्यस्त कल्पनांमुळे सद्गुरूच्या शोधातील आपण, हातचलाखीचे खेळ करणाऱ्या नकली गुरूच्या जाळ्यातच अडकले जाण्याची जास्त शक्यता असते. भक्तियोगातील आत्मसाक्षात्कारी गुरूची नक्कल करून पोटभरूपणाचा धंदा करणारे हे नकली गुरू स्वत. तर मोक्षमार्गास वंचित होतातच; पण स्वत:बरोबर आपल्यासारख्या अनेकांनाही मोक्षमार्गास वंचित करून दैववादी, अंधश्रद्धाळू व पलायनवादी बनवतात. सद्गुरूचा सहवास मात्र आपणास खरोखरच तेजस्वी, चैतन्यदायक, सर्वार्थसाधक बनवत असतो. सद्गुरु ओळखण्याचे हेच एक लक्षण असते व हे लक्षण लक्षात ठेवून स्वानुभवाने आपणास आपल्या गुरूची प्रचिती घ्यावयाची असते; पण अशी काहीच प्रचिती न घेता केवळ आंधळेपणे आपण कोणा तरी एकाला आपला गुरू केले व त्याने भलत्याच मार्गाला नेऊन आपणाला लुबाडले तर तो दोष भक्तियोगाचा नसतो.

## कर्मयोग

आधुनिक विज्ञान, उत्क्रांती इत्यादी विचारांचा गंधही नसलेल्या आपणास जरी भक्तियोगातील निर्मिती व निर्माता हा विचार सहज पटण्यासारखा असला तरी विज्ञान–विचाराची ओळख झाल्यावर आपल्याला हाच विचार परका वाटू लागतो. विश्वरचनेमागे ईश्वरी हाताऐवजी आपणास उत्क्रांतीचा हात दिसू लागतो व त्यामुळेच सांख्यमतवाद्यांप्रमाणे आपण निरीश्वरवादी बनतो. आपल्या उत्कर्षासाठी परमेश्वराऐवजी आपल्या कर्तृत्वावर आपला जास्त विश्वास असतो व त्यामुळेच भक्तियोगापेक्षा कर्मयोगच आपणास जास्त श्रेयस्कर असतो. कोणत्याही कार्यातील आपले यश वा अपयश केवळ आपल्याच अंगभूत कर्तृत्वावर अवलंबून नसते, तर त्यासाठी इतरांच्या सहाय्याची आवश्यकता असते हा विचार आपणास परका नसतो. कोणत्याही कार्यात इतराचे आपणास सहाय्य होणार का विरोध होणार, का इतर लोक आपल्या यशापयशाबद्दल उदासीन राहणार हे इतरांबरोबरील आपल्या पूर्वसंबंधातून ठरत असते, हेही आपणास समजू शकते. पूर्वग्रह बनवणाऱ्या या पूर्वसंबंधास केवळ आपणच जबाबदार असतो असे नाही तर आपले पूर्वज, नातेवाईक, जात, धर्म,

राष्ट्र हेही जबाबदार असू शकतात, हाही विचार आपणाला सहज कळण्यासारखा असतो. कोणत्याही व्यक्तीचे आपल्याबद्दलचे पूर्वग्रह आपल्या कर्तृत्वाने आपण थोडेफार तरी बदलू शकतो ही गोष्टही आपणाला नवीन नसते. इतराचे गरजेच्या वेळी आपण काय करतो यावरच इतरांचे आपल्याबद्दलचे मत बदलणे न बदलणे अवलंबून असते, हाही विचार आपणास परका नसतो व आपल्या यशापयशाच्या मार्गात ही वस्तुस्थिती आपल्या लक्षात येताच आपल्या शारीरिक, सामाजिक व वैचारिक साधनसंपत्तीचा उपयोग इतरांची गरज भागवण्यासाठी करण्यास आपण उद्युक्त होतो व त्यात तत्कालीन नफ्याचा काहीच विचार नसतो. आपल्या कुवतीप्रमाणे दुसऱ्याची गरज भागवण्यास उपयोगी पडणे हाच आपल्या कृतीचा तत्कालीन उद्देश असतो व एकदा का आपले लक्ष स्वत.च्या साधनसंपत्तीचा उपयोग इतरांच्या गरजा भागवण्यासाठी कसा करता येईल यावर केंद्रित होऊ लागले की, आपोआपच आपल्या साधनसंपत्तीचे नानाविध पैलू आपणास दिसू लागतात. आपल्या शारीरिक, सामाजिक व वैचारिक साधनसंपत्तीची साधनमात्रता आपणास अधिकाधिक स्पष्ट होऊ लागते. देहभावाचा हळूहळू लोप होऊ लागतो व अनंतानुभूताचे स्वर्गद्वार आपणासाठी आपोआपच उघडले जाते. मात्र कर्मयोगाचे हे स्वरूप समजून येण्यासाठी योग्य गुरूच्या मार्गदर्शनाची आवश्यकता असते व अशा गुरूंसच आपण निष्काम कर्मयोगी म्हणतो. स्वतःला कशाचीही गरज नसताना केवळ आपणाला मार्गदर्शन व्हावे म्हणून हे निष्कामकर्मयोगी सत्ता, संपत्ती, मानमराबत याचे खेळ माडतात. स्वत: निरनिराळी अधिकारपदे भूषवतात व प्रसंगी त्यांचा उपयोग इतराच्या मदतीसाठी कसा करावा हे स्वत: आचरून दाखवतात. 'करावे मिळवावेसे नसे कांही जरी मज । तिन्ही लोकी, तरी पार्था कर्मी मी वागतोच की' या गीतावचनाप्रमाणे त्यांची कृती असते व कर्मयोगात अशा गुरूचे मार्गदर्शन आवश्यक असते, नाही तर निष्कामकर्माचे नावाखाली आपण निष्क्रियतेच्या वाटेलाच पोहोचण्याचा धोका असतो. निष्कामकर्म ही कर्मयोगाच्या प्रारंभीची अवस्था नसते. कामाशिवाय कर्माची उत्पत्तीच होऊ शकत नाही; पण कर्मयोगातील कामनाच नकळत आपणास देहभावविरहित साक्षीभावाला घेऊन जाते व आपली सगळीच कर्मे निष्कामकर्मे बनतात. भक्तियोग व कर्मयोग यातील हे रहस्य लक्षात आले की, मग राजयोगाच्या सरळ मार्गाने आपण आपल्या अमर्यादित स्वरूपाच्या राजवैभवाकडे नकळतच पोहोचतो.

## राजयोग

राजयोग हा काही वेगळा योगमार्ग नाही. भक्तियोग व कर्मयोग याचे ते एक स्वाभाविक अंग आहे आपल्या शारीरिक, सामाजिक व वैचारिक साधनसंपत्तीचा दुसऱ्याच्या गरजा भागवण्याचे दृष्टीने विचार करण्यासाठी ध्यानाची गरज असते. ध्यानासाठी धारणा आवश्यक असते. धारणेमध्ये आपली साधनसंपत्ती व सभोवतालच्या गरजा या सर्वांशी संबंधित असे विचार एकत्रित धारण केले जातात व ध्यानामध्ये त्यावर लक्ष केंद्रित करून त्याचे विश्लेषण केले जाते. या विश्लेषणातून निर्माण होणाऱ्या विचारपरंपरातून आपणाला इतरांच्या गरजाचे संदर्भात आपल्या साधनसंपत्तीच्या नव्या नव्या पैलूंची ओळख होऊ लागते व असा एक क्षण येतो की, त्या साधनसंपत्तीची सगळी साधनमात्रताच आपल्या ध्यानात येते. चर्मचक्षूतून दिसणाऱ्या त्या विश्वातील त्या देहेंद्रियाचे कार्य आपणास स्पष्ट दिसू लागते. आपल्या स्वरूपातील देहभान गळून पडते. अनंताची अनुभूती आपणास प्राप्त होते व यालाच म्हणतात समाधि. देहभावाचा लोप पावलेल्या जाणिवेची ती एक स्वाभाविक अवस्था असते. सुरुवातीला ध्यान जरी ठराविक स्थळी, ठराविक काळी, ठराविक वेळी करावयाचे असते तरी ती केवळ ध्यानाची पूर्वतयारी असते. प्रत्यक्षात ध्यान ही क्रिया अहोरात्र चालू असणारी क्रिया असते. देहधारणेसाठी कराव्या लागणाऱ्या नित्य–नैमित्तिक क्रिया करत असतानाही कळत–नकळत ही ध्यानाची क्रिया चालूच असते. सासारिक गृहकृत्ये करताना मातेचे लक्ष ज्याप्रमाणे आपल्या नवजात अर्भकाकडे सदैव केंद्रित असते त्याप्रमाणेच आपल्या या ध्यानाचे असते. ध्यानाच्या या क्रियेत व्यत्यय येऊ नये म्हणून शारीरिक व मानसिक आरोग्य अत्यंत आवश्यक असते. शारीरिक आरोग्यासाठी निरनिराळी आसने, शुद्धिक्रिया, श्वसनक्रिया यांची मदत होते व त्यामुळेच या क्रियाना आपण यौगिक क्रिया म्हणतो. मानसिक आरोग्यासाठी प्राणायाम, प्रत्याहार इत्यादी गोष्टीची आवश्यकता असते. प्रत्याहारात खाण्यापिण्यावरील मर्यादितता अपेक्षित असते तर प्राणायामाने प्राणाचे नियमन केले जाते. ज्या शक्तीमुळे देहाची हालचाल घडून येते त्या चैतन्यशक्तीला आपण प्राण म्हणतो. व्यवहारात ज्या शक्तीमुळे आपल्या देहाची हेतुपूर्ण हालचाल घडून येते ती शक्ती म्हणजे आपले विचार. विचारांच्या बऱ्या–वाईट स्वरूपाप्रमाणे देहाच्या बऱ्यावाईट कृती घडून येत असतात. शरीराची हालचाल घडवून आणण्याऱ्या या विचारांचे नियमन म्हणजे प्राणायाम. कोणतीही कृती करण्याचा विचार जाणिवेत आल्यावर थोडा वेळ थावून त्या कृतीच्या परिणामाचा विचार केला की एक पूरक कुम्भक साध्य होतो. तर प्रत्यक्षात कृती घडून आल्यावर थोडा वेळ थांबून त्या कृतीचे मूल्यमापन करण्याने एक रेचक व रेचककुम्भक साध्य होतो. कृती करण्यापूर्वी व केल्यावर जे मूल्यमापन करावयाचे त्यासाठी ज्या व्यक्तिगत व सामाजिक आचार–विचारांचा दंडक वापरावयाचा असतो त्यांचेच नाव 'यम व नियम.' योगसाधनेतील या नानाविध क्रिया म्हणजेच यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधि ही योगाची अष्टांगे होत व त्यामुळेच भक्तियोग व कर्मयोग यांना सहाय्यक असणाऱ्या या योगागांस आपण अष्टांगयोग असे म्हणतो. आपल्या अमर्यादित स्वरूपाच्या राजवैभवाकडे आपणास घेऊन जाणाऱ्या या राजरस्त्याला आपण राजयोग असेही म्हणतो. भक्तियोग व कर्मयोग यातील ते एक प्रमुख साधना-अंग असते.

## योगसिद्धी

कोणताही प्रयोग यशस्वी रीतीने करून पाहण्यासाठी प्रयोगपद्धतीप्रमाणेच प्रयोगपद्धतीतील अडथळ्यांचीही पूर्ण माहिती असावी लागते व त्यामुळेच योगमार्गात योगसिद्धीचा विचार करावा लागतो. सिद्धीमुळे योगसाधनेत व्यत्यय येऊन साधक योगभ्रष्ट होण्याची शक्यता असते. सिद्धीचे विचार सिद्धी कशा प्राप्त करून घ्याव्यात यासाठी मार्गदर्शनात्मक नसतात तर सिद्धी प्राप्त झाल्यास त्यामुळे योगसाधनेत येणारा व्यत्यय कसा टाळावा हे समजावून देण्यासाठी

असतात. कोणत्याही विषयातील विशेष ज्ञान हे सिद्धि–चमत्कारातच मोडते. जन्मतःच एखाद्या विषयात निष्णात अशी व्यक्ती क्वचितच जन्माला येते. सर्वसाधारणपणे आपण ज्या विषयावर कळत–नकळत ध्यान करतो त्या विषयातील निष्णातपणा आपणाला प्राप्त होत असतो. निष्णात वैद्य, खेळाडू, संशोधक, वकील या उपाधी आपणाला त्या त्या विषयावरील आपल्या ध्यानातून प्राप्त होत असतात. काहींच्या बाबतीत असे ध्यान नकळतच घडून येते; पण आपल्या" सारख्यांना ते प्रयत्नसाध्य होऊ शकते व या ध्यानातूनच शास्त्रज्ञाचे शास्त्रज्ञान, तंत्रज्ञाचे तंत्रज्ञान जन्माला येत असते व त्यातूनच शास्त्रीय व यांत्रिकी किमया घडून येत असतात. आपण एका-ग्रहावरून दुसऱ्या ग्रहावर जाणारी किंवा जगातील कुठल्याही प्रदेशातील घटना दूरचित्रवाणीच्या पडद्यावर क्षेपक करणारी उपकरणे बनवत असतो. मानवापुढील कोणतीही समस्या सोडवण्याचे सामर्थ्य आपल्या ध्यानात असते व हीच गोष्ट योगसिद्धीचे विचार स्पष्ट करत असतात. ध्यानासाठी आपण जो विषय निवडतो त्यावर आपणास प्राप्त होणाऱ्या सिद्धीचे स्वरूप अवलंबून असते. 'आपणास प्राप्त होणारे हे विशेष ज्ञान प्रथम आपल्या जाणिवेतून स्फुरणाऱ्या विचाराच्या स्वरूपात प्रगट होते व विचारातून प्रगट होणारे हे विशेष ज्ञानच नंतर अणूच्या विस्फोटातून प्रचड औष्णिक शक्ती निर्माण करणारी, पाण्यात किंवा हवेतूनही चालणारी उपकरणे बनवण्याची किमया करून दाखवतात. विचारातून उत्पन्न झालेल्या या उपकरणातून निर्माण होणारे सामर्थ्य प्रत्यक्षात त्या उपकरणाचे नसते तर त्या उपकरणामागील विचाराचे असते. उपकरणातील तो विचार आपल्या जाणिवेत लोप पावल्यास ते उपकरण निरुपयोगी ठरते. उपकरणाला निर्माण करणारे व त्यात चैतन्य देणारे हे विचार त्या विषयावरील आपल्या ध्यानातून निर्माण होत असतात. ध्यानाचे हे सामर्थ्य आपल्या हातातील मानवी देहाच्या उपकरणाचे कार्य समजावून घेण्यासाठी आपणास वापरावयाचे असते. भक्तियोग व कर्मयोग याचे रहस्य नीट समजल्यामुळे जेव्हा आपण आपले ध्यान स्वतःच्या शारीरिक, सामाजिक व वैचारिक साधनसपत्तीचा उपयोग इतराच्या गरजाच्या दृष्टीने वापर करण्यावर केंद्रित करतो तेव्हा आपल्या विचारसंपत्तीच्या प्राथमिक स्वरूपाप्रमाणे इतराच्या गरजा भागवण्याचे उपयुक्त असे नवे नवे विचार आपल्यापुढे उभे राहू लागतात व आपल्या शारीरीक कृतीतून प्रगट होऊ लागतात. या कृतीमुळे ज्यांच्या शारीरिक, सामाजिक वा वैचारिक गरजा भागवल्या जातात ते लोक आपल्या देहाभोवती भाविकपणे गर्दी करू लागतात व देहाच्या या मानसन्मानाने आपल्या योगसाधनेत व्यत्यय येण्याचा सभव असतो. देहभाव कमी होण्याऐवजी देहाहकार वाढवण्यासच असे मानसन्मान कारणीभूत होण्याचा फार मोठा धोका यामुळे निर्माण होतो. सिद्धीच्या सहाय्याने मिळणारे मानसन्मान मिळवणं हा योगसाधनेचा उद्देश नसतो. देहभावापासून मुक्त होऊन साक्षीभावाला प्राप्त करून घेण्यासाठी आरंभलेली ती एक साधना असते व त्यामुळेच मानसन्मानाने आपले ध्यान जरी क्षणभर विचलित झाले तरी योगसाधनेत प्रचड व्यत्यय येण्याचा व सगळा प्रयोगच फुकट जाण्याचा धोका निर्माण होतो व म्हणूनच ज्ञानदेवासारखे साक्षात्कारी संत ' आणी प्राप्तेही पुरवे, इंद्रिये लावली जरी कौतुके, तरी आक्रमला जाण देखे, संसारभये ' असे या सिद्धिप्राप्तीचे वर्णन करतात व त्याबद्दल धोक्याचा लाल दिवा दाखवतात.

## साक्षात्कार

वेदांत-सिद्धात, योग साधना व योगसिद्धी यांचे सत्यस्वरूप एकदा का आपल्या जाणिवेच्या ध्यानात आले की, आपल्या अमर्यादित स्वरूपानुभूतीची आपल्या अंतरीची ओढच आपणास योगसाधनेकडे घेऊन जाते. नानाविध कर्मकांडाचे म्हणजेच पूर्वमीमांसेचे स्वरूप आपल्या लक्षात येते व अद्वैताचे आपणास दर्शन घडते. यालाच आपण साक्षात्कार म्हणतो. देहरक्षण, प्रजोत्पादन, उदरभरण, आप्तस्वकीय इत्यादी नानाविध विचारचक्रातच गुतून पडलेली आपली जाणीव योगविचारांच्या विशुद्ध चक्रावर बसून, जगन्नियंत्याच्या आज्ञाचक्रास पार करून अद्वैताच्या सहस्त्रारचक्रात स्थिर होते व आपली सहस्त्रावधी रूपे साक्षीभावाने पाहू लागते. यालाच कुंडलिनी–जागृती म्हणतात. योगसाधनेने कुंडलिनी जागृत होते की नाही ? सिद्धी प्राप्त होतात की नाही ? देहभ्रम दूर होतो की नाही ? अनंतानुभूतीचा साक्षात्कार घडतो की नाही ? हे आपणच स्वानुभवाने ठरवायचे असते. मित्र, शिक्षक, आप्तस्वकीय, धार्मिक ग्रंथ सहाय्यकारी ठरतात येवढेच. दोरीमुळे निर्माण झालेला सापाचा भ्रम ती वस्तू दोरी आहे असा जप करून दूर करता येत नाही तर दोरीचा दोरीप्रमाणे वापर करून स्वानुभवानेच दूर करता येतो. देहामुळे निर्माण झालेला देहरूपाचा भ्रमही केवळ सिद्धांतवाक्याचा जप करून दूर करता येत नाही तर देहाचा देहाप्रमाणे वापर करूनच तो दूर होऊ शकतो व देहाचा देहाप्रमाणे वापर करावयाचा, म्हणजे काय करावयाचे, याचेच रहस्य भक्तियोग व कर्मयोग स्पष्ट करत असतो.

अमर्यादितता हा आपल्या स्वरूपाचा स्थायीभाव असतो. त्याची विस्मृती आपणास कदापीही होणे शक्य नसते व त्यामुळेच आपल्या स्वरूपावर पडणारे कोणतेही बंधन आपणास परके वाटत असते व ते झुगारून देणे ही आपली सहजप्रवृत्ती असते. बालापासून वृद्धापर्यंत, रंकापासून राजापर्यंत, सुशिक्षितापासून अशिक्षितापर्यंत कोणीच याला अपवाद नसतो. उत्क्रांतीची सगळी धडपड याच दृष्टीने चालू असते. आपल्या व्यक्तिमत्त्वावर पडणारी ही बंधने दूर करण्यासाठीच आपण कधी सत्ता, संपत्ती, मानमरातब यासाठी आपला देह राबवू लागतो किंवा हे सर्व सोडून बैरागी होऊ पहातो; पण याप्रमाणे नानाविध प्रयत्न करूनही बहुतेक वेळा आपला हा प्रयत्न मृगजळाच्या शोधासारखाच व्यर्थ ठरतो. कृतार्थतेचे जीवन आपणापासून सदैव दूरदूरच आपणास दिसते; पण ते जीवन मृगजळ आहे असे म्हणूनही आपण त्याचा ध्यास सोडू शकत नाही. कारण अनताची ओढ ही आपल्या स्थायी भावाची ओढ असते व ती अनुभूती उपभोगताना दिसणारे आपल्यासारखे अनेक हाडामासाचे देह आपणास प्रत्यही सुखावत असतात. आपल्या दृष्टीला कृतार्थतेचे जीवन जगताना दिसणाऱ्या या व्यक्तीपैकी काही आपल्यासारख्याच संसारी असतात, तर काही विरक्त संन्यासी असतात व त्यांच्यापैकी कोणाचेही अंधानुकरण करून ती कृतार्थता मिळवण्याचा आपण प्रयत्न केला तर आपल्या पदरी मात्र येते वैफल्य व निराशा ! जे कृतार्थतेचे जीवन आपल्यासारखाच एक मानव उपभोगताना आपणास दिसतो, तेच कृतार्थतेचे जीवन

आपणाला प्रयत्नसाध्यही का होऊ नये यावर ध्यान केंद्रित केले असता, वेदकालीन ऋषि-मुनीना झालेला साक्षात्कार म्हणजेच वेदान्त-सिद्धात व त्या सिद्धाताची प्रचिती आपल्यासारख्या सर्वसामान्य माणसालाही घेता यावी म्हणून त्यानी शोधून काढलेला शास्त्रशुद्ध साधनमार्ग म्हणजेच योगसाधना. या सिद्धांताची व साधनामार्गाची ओळख असलेला कोणताही मानव कोणत्याही स्थळी, कोणत्याही परिस्थितीत या सिद्धाताची प्रचिती घेऊ शकेल व हा सिद्धात लक्षात आलेला सगळा मानवसमाजच कृतार्थतेचे सुखी, समृद्ध व सुसंस्कृत जीवन जगू लागेल हा त्यांचा विश्वासच " कृण्वन्तो विश्वम् आर्यम् ।" या त्यांच्या शब्दातून प्रगट होतो.

वाल्मिकी-व्यासांसारख्या महर्षींनी सुरू केलेल्या या जनजागरणाचे ज्ञानयज्ञात समिधा अर्पण करताना मागावयाचे पसायदानाचे मागणे वेगळ ते काय असणार? संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत वर्णन केलेले ते मागणेच पुन्हा मागावयाचे व चराचराच्या हृदयात निवास करणाऱ्या त्या विश्वात्मक देवतेला विनवणी करावयाची की, हे विश्वात्मक देवते, तू या चिमुकल्या हातानी, भक्तिभावनेने अर्पण केलेल्या या छोट्याशा समिधेने प्रसन्न हो व तुझ्या पसायदानाने —

" दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो । जो जे वांछील तो ते लाहो प्राणिजात ॥

ते खळाची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रति वाढो ।
भूता परस्परे पाहो मैत्र जिवांचे ॥

आणि सकळ भूमंडळी । स्वर्गसुखाची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी वर्षु दे आता ॥ "

— हरि ॐ —

□

---

# अनिल....

खरं तर शरीर थकलेले; पण अनिलां-सारख्या माणसांनी जाऊ नये असेच वाटते. ' फुलवात ' ते ' दशपदी ' या आपल्या काव्यकुसुमानी अनिलानी मराठी वाचकांना वेडे केले होते. त्यातच भर पडली ती ' कुसुमानिल 'ची प्रेमपत्रं उघड—उघडपणे प्रकाशित करणे ही तशी क्रांतिकारक घटना. प्रेमप्रकरणं उघडी करणे हे आपल्या नित्य-परिचयाचं, सवयीचं.

अनिल गेले आणि वाटलं मराठी कवितेतलं चैतन्यच हरवले, बहर नष्ट झाला, तारुण्याची तरुण संवेदना कोमेजली ! अनिल म्हणजे जीवनाची सदानुरक्ती असणारे, जीवनाशी पराकोटीचे समरस झालेले म्हणूनच की काय पत्नीवियोगासारखे मोठे दुःख सहन करून हा कवी शेवटपर्यंत अनुभव शब्दबद्ध करीत गेला. आयुष्याच्या मध्यावर फूल कोमजले तरी हा कवी म्हणत राहिला-

' वेळ झाली भर माध्यान्ह,
माथ्यावर तळपे उन्ह,
नको जाऊ कोमेजून
माझ्या प्रीतीच्या फुला. '

जगण्यातला रसरशीतपणा, ताजेपणा, टवटवीतपणा, हिरवेपणा अनुभवण्यातली मनस्वितता अनिलांच्या ठिकाणी होती. या मनस्विततेत रममाण असताना ते आपले वय विसरत, ऋतुचक्र विसरत, किंबहुना स्वतःला विसरून जात असत. मुलात मूल होण्याची आणि फुलांत फूल होऊन जाण्याची निष्पाप आणि निरागस वृत्ती जपण्याइतके त्यांचे मन जीवनाला उत्सुक होते.

आज अनिल गेले; पण त्यांच्या सहवासातली एक गमतीदार आणि वैशिष्टयपूर्ण घटना आठवतेय, नव्हे नेहमीच आठवत राहील. पहिली भेट ही तशी संस्मरणीय; एखाद्या कवीच्याबाबत तर विशेषत्वाने. ही तर अनिलांची भेट. मी कॉलेजच्या पहिल्या वर्षाला होते तेव्हा ! आमच्या एका सरांच्या घरी आम्ही जमलो होतो. नुकतीच ' चिरयौवन ' आस्वादिली होती. अनुभवत होतो. कवीची भेट म्हटलं की त्याच्या कविता ऐकण्यास उत्सुक असणे हे ठरलेले. अनिल आपल्या कविता म्हणू लागले. आपल्या विशिष्ट ढंगदार लयीत, तालात, सुरांत ते ' चिरयौवन ' म्हणू लागले आणि त्या वेळीच जाणवले, वेळही तरुण झालीय, वय विसरलीय. भारावून गेलीय. तेव्हाही अनिल तसे वृद्धात जमा झालेत; पण अनिलांच्या त्या कवितेने शिकवले मनातला तरुणपणा, जिवंतपणा वयावर नसतो.

त्यानंतर भेट झाली मी कॉलेजच्या चौथ्या वर्षाला असताना. तेव्हाही मी त्यांच्या-जवळ हीच कविता म्हणून दाखवायचा हट्ट धरला. का कुणास ठाऊक अनिलांच्या तोंडून ही कविता ऐकणं हा एक सुखद आणि रोमांचकारी अनुभव होता. कित्येक क्षण त्या आठवणीने त्या कवितेतील अर्थघनतेने सर्जनशील बनायचे.

असा योगायोग होता की काय कुणास ठाऊक ? मागे भुसावळला युवक संमेलन झाले. अनिल अध्यक्ष होते एका कार्यक्रमाचे. युवकांचा महोत्सव असून वातावरण युवाप्रवृत्तीचे जाणवत नव्हते; पण अनिल बोलायला उभे राहिले आणि त्यांनी 'कुसुमानिल' सांगायला सुरुवात केली. सर्वजणच वय विसरलो आणि युवक महोत्सव तरुण झाला. नंतर आम्ही एकत्र बसलो. मला म्हणाले— ' चिरयौवन म्हणतो ऐक. ' मला विलक्षण आनंद झाला. एकदा नाही दोनदा म्हणायला सांगितली. वेळ कसा गेला कळलेही नाही.

शेवटची भेट झाली ती रायपूरला. एका गुलाबी पोशाखातल्या युवतीशी ते बोलत होते. एकटेच एका बाजूला बसले होते. माझे लक्ष त्यांच्याचकडे होते. अनिल म्हटले की मला चिरयौवन आठवायची. हे समीकरणच झाले होते. कार्यक्रम झाला. संध्याकाळी भेटलो. गप्पा !

' प्रतिम ना तू ? '

' हो. खूप थकलाय. म्हणा मी तरी कशी अशी म्हणतेय थकलाय म्हणून, वय सांगतेय. '

गालातल्या गालात मिस्किलसारखे हसले.

' थकलोय कुठे ? ह्या सुरकुत्या, पाठीचा बाक, हातातली काठी पाहून म्हणतेयस ? अग, हा बाहेरचा बहर कोमेजलाय...बाकी मी... अजूनही ही जीवनाबद्दल सदा नुरक्ती?

' कविता म्हणा ! '

' कोणती म्हणू ? '

' माहितेय तुम्हाला! मी तुम्हाला कोणती कविता म्हणायला सांगणारेय ते ! '

'चिरयौवन ना?'

आणि ते म्हणू लागले. तीच लय, तोच उत्साह, तीच हळुवारता, तीच जीवनाबद्दलची गोडी. सारे काही भरभरून वाहात होते. वाटते ही तरुणपणाची, मनातल्या तारुण्याची उभारी अनिलांच्यात शेवटपर्यंत होती. जी प्रेरणादायी वाटते, जगायला शिकवते.

आज अनिल गेले. केळीचे सुकले बाग.
अनिल आज कुसुमाल भेटायला गेलेत.

कुसुमानिल आज आनंदात असतील, आजही ते त्यांना आपल्या कुसुमला म्हणत असतील 'अजुनि रुसून आहे...'

पण आपण मात्र एक बहरणारे चिरयौवन हरवलंय हेच खरे!

—प्रतिमा केसकर

मुक्काम गुहागर

# साहित्यिकांचा मेळावा

एका प्रकाशकाच्या मृत्यूनंतर त्याच्याबद्दल मराठीत खास अंक निघालेला कोणी ऐकले आहे काय? आणि त्याच्या पहिल्या स्मृतिदिनानिमित्त त्याच्या जन्मगावी नामांकित साहित्यिक एकत्रित येतात आणि ते गाव दोन दिवस एका वेगळ्या धुंदीत वावरते असेही दृश्य कधी पाहावयास मिळाले आहे काय?

होय!–या दोन्ही गोष्टी घडल्या त्या एका भाग्यवान प्रकाशकाच्या बाबतीत! तो प्रकाशक म्हणजे ग. पां. ऊर्फ दादा परचुरे!

गेल्या वर्षी मे महिन्यात दादा परचुरे यांचे मुंबईस दुःखद निधन झाले. पुण्याच्या 'साहित्यसूची' मासिकाचे मो. द. नांदूरकर यांनी खास 'परचुरे विशेषांक' काढून त्यांना श्रद्धांजली वाहिली

यंदा दादा परचुऱ्यांच्या जन्मगावी म्हणजे गुहागर येथे त्यांचा पहिला स्मृतिदिन साजरा करण्याची योजना त्यांचे चिरंजीव वि. ग. ऊर्फ अप्पा परचुरे यांनी आखली आणि ती इतक्या चांगल्या रीतीने कार्यान्वित झाली की, या निमित्ताने गुहागरात जमलेल्या साहित्यिकांच्या तोंडून सतत कौतुकाचा आणि आनंदाचा धन्योद्गार निघत राहिला!

मुंबईहून आणि पुण्याहून दोन स्पेशल गाड्या दि. ८ मे रोजी पहाटेच्या सुमारास गुहागरकडे निघाल्या. महाराष्ट्राचे माजी मजूरमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी फेलारपूर येथे अल्पोपाहाराची सोय केली होती. दुपारी एक ते दोनच्या सुमारास चिपळूण येथे परशुरामक्षेत्री साऱ्यांच्या भोजनाची उत्तम प्रकारे सोय करण्यात आली होती.

सायंकाळी गुहागरला पोचण्यापूर्वी मार्गे ताम्हाणे येथे डॉ. नातू यांच्याकडे साऱ्या साहित्यिकांसाठी वासंतिक अल्पोपाहाराची योजना करण्यात आली होती. रात्री गुहागरला परचुरे यांच्या घराशेजारच्या गजानन नाट्यमंदिरात स्मृतिदिनाचा भरगच्च कार्यक्रम ठेवण्यात आला होता. नाट्यगृहाचे खुले आवार गुहागर आणि आजूबाजूच्या परिसरातील स्त्रीपुरुषांनी तुडुंब भरले होते. व्यासपीठावर सुप्रसिद्ध नाटककार वसंतराव कानेटकर, डॉ. स. गं. मालशे, ज्ञानेश्वर नाडकर्णी, बाळ सामंत, जयवंत दळवी, रवींद्र पिंगे, रमेश मंत्री, ग. वा. बेहेरे, भीमराव कुलकर्णी, पंडितराव कुलकर्णी, मो. द. नांदूरकर, सुशीलकुमार शिंदे, श्री. ज. जोशी, वसंत सबनीस, राजा राजवाडे, मधुमंगेश कर्णिक इत्यादी साहित्यिक व सुहृद दाटीवाटीने बसले होते. कार्यक्रमाचा पूर्वार्ध दादा परचुरे यांच्या आठवणींचा आणि उत्तरार्ध नाट्यवाचनाचा आणि कथाकथनाचा होता. सभेचे संचालन करण्याची कामगिरी बाळ सामंत यांच्याकडे होती.

पूर्वार्धातील आठवणींमध्ये दादा परचुरे यांची सावरकर–अत्रे भक्ती, त्यांनी अत्रे–फडके वादावर पडदा पाडण्यासाठी केलेली धडपड आणि एकदा आपला म्हटले की, त्याच्याबद्दलचा त्यांचा असीम जिव्हाळा याबद्दलच्या हृद्य आठवणी साहित्यिकांनी समरसून सांगितल्या.

स्वा. सावरकरांना मुंबईचे सचिवालय पाहाण्याची इच्छा होती. आपले लोकनियुक्त प्रतिनिधी राज्यकारभार कशा रीतीने करतात हे त्यांना पाहावयाचे होते. त्यासाठी परचुरे यांनी अपार धडपड केली. ते त्या काळचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांना जाऊन भेटले. यशवंतरावांनी नेहमीच्या पद्धतीने केवळ साखरपेरणी केली. 'का नाही? अवश्य! सावरकरांना दाखवायचे नाही तर कोणाला? मला त्यांचे स्वागत करावयास आनंदच वाटेल!' इत्यादी इत्यादी.

परंतु शेवटी सावरकरांना निमंत्रण आलेच नाही! या गोष्टीची खंत परचुऱ्यांना फार होती किंवा एकदा १३ जूनला आचार्य अत्र्यांच्या स्मृतिदिनी पुण्याला बालगंधर्व रंगमंदिरासमोर अत्रे यांच्या पुतळ्याजवळ साधी फुले ठेवण्याचे भानही महानगरपालिकेला आणि पुण्याच्या साहित्यिकांना झाले नाही, हे पाहून परचुरे यांना झालेले दुःख आणि त्यातूनच पुण्याला 'अत्रे सभागृहा'च्या रूपाने त्यांचे स्मारक करण्याची त्यांची जिद्द इत्यादि आठवणी हृद्य होत्या!

कार्यक्रमाच्या उत्तरार्धात डॉ मालशे यांनी स्वा. सावरकरांच्या साहित्य-संमेलनातील भाषणाची एक उत्कृष्ट नक्कल ऐकविली. नंतर वसंत कानेटकर यांनी त्यांच्या 'गरुडझेप' या आगामी नाटकाच्या पहिल्या अंकाचे परिणामकारक वाचन केले. या नाटकाचा प्रकाशन समारंभ 'परचुरे प्रकाशना'तर्फे लंडनला होणार आहे. वसंत सबनिसांनी 'एकपात्री भोजन'ही फर्मास कथा सांगून श्रोत्यांना तुफान हसविले. मध्यरात्र केव्हाच टळून गेल्यामुळे कार्यक्रमाच्या काही भागाला कात्री लावण्यात आली.

दुसऱ्या दिवशी पालशेत येथे हिऱ्यांना पैलू पाडण्याच्या पालशेतकरांच्या प्रकल्पास भेट आणि हेदवी येथील दशभुज गजाननाचे दर्शन हा कार्यक्रम होता. पालशेतकरांनी हिऱ्यांना पैलू पाडण्याचे कसब काही तरुणांना शिकवून कोकणातील दूरच्या खेड्यात एक नवे कर्तृत्व उभे केले आहे, तर हेदवीच्या काका जोगळेकरांनी गरिबीमुळे गाव सोडून मुंबईत नाना तऱ्हेचे उद्योग करून, साठीनंतर परत आपल्या गावी येऊन गणपतीचा जीर्णोद्धार केला आणि हेदवीचा परिसर आंब्यापोफळीच्या बागांनी गजबजून सोडला! वयाच्या सत्तरीनंतरही काकांचा उत्साह अवर्णनीय होता. संध्याकाळी शालेय विद्यार्थ्यांसाठी गुहागर येथे डॉ. मालशे, राजा राजवाडे व

भीमराव कुलकर्णी यांच्या कथाकथनाच्या कार्यक्रमानंतर रात्री जितेंद्र अभिषेकी यांच्या नाट्यसंगीताचा कार्यक्रम होता.

मध्यरात्रीनंतर साहित्यिकाना घेऊन दुसऱ्या दिवशी गाड्या पुन्हा मुंबई–पुण्याकडे निघाल्या. गुहागरकरांचा निरोप घेताना साहित्यिक उरी भरून आलेले होते.

कोकणचा नयनरम्य परिसर, गुहागरचा स्वच्छ व सुंदर असा चार मैल पसरलेला समुद्रकाठ, आनंदीबाई पेशवे ह्यानी बांधलेल्या वाड्याची डागडुजी करून शासनाने बांधलेले विश्रामगृह आणि तेथे साहित्यिकांचा दोन दिवसाचा अखंड काव्यशास्त्र-विनोद, गुहागरकराचे, डॉ. नातूंचे, पालशेतकराचे आणि जोगळेकराचे जिव्हाळ्याचे आदरातिथ्य, आंबे, फणस, काजू आणि कोकमचे पन्हे यांची लयलूट आणि अप्पा परचुरे यानी सर्व कार्यक्रमाची केलेली योजनाबद्ध आखणी यामुळे गुहागरचे दोन दिवस मोठ्या धुंदीत गेले !

दादा परचुरे यांना एकदा साऱ्या साहित्यिकाना घेऊन गुहागरला जायचे होते, ती त्यांची मनीषा अपुरी राहिली होती.

त्यांच्या चिरंजिवांनी वडिलांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने ती अशा रीतीने पुरी केली.

या दिवसात अशी योजकता आणि असा जिव्हाळा विरळाच !

—एक साहित्यिक

फिनिक्स निवड

# मी पेडिआ घेतो—हादरतो

मी एखादी वस्तू घेतली तर ती इतराना दाखवायची किंवा इतराना त्याबद्दल सांगायची मला फारशी उत्सुकता नसते; परंतु अगदी लहानपणापासून मला एनसायक्लोपेडिआ ब्रिटॅनिका घेण्याची स्वप्ने पडत असत. कधी स्वप्नात ब्रिटॅनिका हप्त्याने घेतला, तर कधी वडिलांनी दिला, तर चक्क हुंड्यात मिळाला अशी मला अक्षरशः स्वप्ने पडलेली होती ! कधीकधी तर रात्री एखादे चांगले पुस्तकाचे दुकानसुद्धा फोडले होते !

आमच्या डहाणू गावात त्या वेळेला एक आख्यायिका प्रचलित होती. सर्वांच्याच मुखाद्वारे ती ऐकली होती म्हणून तर ती अगदी सत्य वाटायची ! डहाणूच्या जवळपासच्या जंगलात एक विमान कोसळले होते. त्या वेळेला त्या जागेजवळ डहाणूचा एक मध्यमवर्गीय व्यापारी होता. या विमानात म्हणे भरपूर सोने होते. जवळपास कुणीच नसल्याने ( असलाच तर एखाद–दुसरा वारली. त्याला पटवायला किती वेळ ? ) या गृहस्थाने कुणीही येण्याच्या आधी हा सर्व खजिना लुटला व डहाणूच्या सुंदर किनाऱ्याच्या जवळपास एक छोटा बंगला बांधून ‘ किडुकमिडुक ’ मोडून जीवन गाळू लागला.

डहाणूच्या वरून मग विमान गेले व कुठे समुद्रकिनारी एकटा असलो तर मीसुद्धा विमान पडण्याची वाट बघू लागलो ! आपलं पण नशीब असेल, आपण पण ब्रिटॅनिका केव्हा तरी घेऊ अशी अभिलाषा उराशी नेहमी असे !

त्या वेळेला आमच्या के एल पोंडा हायस्कूलमधील ग्रंथालयातील पुस्तके घरी वाचावयास देत नसत. सर्वच्या सर्व कपाटाना कुलपं असत. मास्तराना मस्का लावला तर तिथे बसून काय वाचायला मिळेल तेच ! इथेच मला बहुतेक ब्रिटॅनिकाविषयी माहिती मिळाली असावी ! अर्थात शाळेत काही ब्रिटॅनिका नव्हता; पण कुठे तरी जाहिरातीत, इतर पुस्तकात किंवा संभाषणात त्याच्याबद्दल इतके ‘ रिस्पेक्टफुली ’ बोलले जाई किंवा लिहिले जाई की, मनात जे ब्रिटॅनिकाचं चित्र झालं ते अगदी ‘ ऑल पॉवरफुल ! ’

शाळेत एका खोलीमध्ये पुस्तकांच्या कपाटांनीच पार्टिशन केले होते. या खोलीला दोन दरवाजे. एक दरवाजा नेहमीच उघडा असे. कारण ती बहुतेक टीचर लोकांची सीटिंग–रूम होती. अगदी साधं टेबल व साध्या खुर्च्या. पुस्तकांची कपाटे आपली नेहमी मास्तराकडे पाठ करून उभी असत ! ग्रंथालय असं अगदीच जवळ असलं तरी ग्रंथालयाच्या आत प्रवेश मात्र बाहेरून, दुसऱ्या खोलीतून करावा लागे. कारण कपाटे एका भिंतीपासून थेट दुसऱ्या भिंतीपर्यंत सलग मांडलेली असत.

कित्तूरमास्तर व बापटमास्तर हे आमचे त्या वेळचे मास्तर. इंग्रजी शिकवणारे. (१९४५–४६ ची गोष्ट असेल कदाचित) अख्ख्या शाळेत हे दोघे मास्तर नेकटाय, सूट व बूट घालून वावरत असत ! त्यामुळे आम्हा मुलात त्यांच्याविषयी नितांत आदर असे. कित्तूरमास्तर कोटाशिवाय टाय घालून झपाझप चालत; पण त्यांच्या टाचांचा आवाज फारसा येत नसे. बापटमास्तर कोटाशिवाय कधी हिंडणारच नाहीत ! आणि त्यांच्या बुटाचा आवाजसुद्धा शाळेच्या लांब पॅसेजमधून थोडासा घुमत असे. त्यांचं अक्षरही त्यांच्या कपड्यांसारखं आटोपशीर उभं असे !

आम्ही या दोघांना ‘ फादरफिगर ’ करून टाकले होते त्यांच्या इंग्रजी ज्ञानाने अगदी awe-inspire झालो होतो.

आमच्या घरी काही नेकटाईज होत्या. डहाणूच्या त्या तिमजली घरातून ( हे घर म्हणजे अलिबाबाचे ‘ओपन सेस्मि’ open sesame ! ) काय काय निघेल व काय नाही त्याचा अजिबात नेम नसे. आता नेकटाय तर माझे वडील कधीच घालत नसत ! मी शाळकरी, भाऊ शाळकरी. कशा आल्या नेक-टाईज ? आमच्या बहिणीचा भावी पती मात्र अगदी ‘ युरोपन ’ टाइप ! या मास्तराच्या वर. ॲरिस्टोक्रॅटिक. त्याच्यासाठीच असतील कदाचित ह्या नेकटाईज ! या मास्तराना खूष केले तर ते आपल्याला पुस्तके वाचायला देतील या आशयाने मी त्यावर परफ्युम टाकून या टाईज पोस्टातून निनावी पाठवून दिल्या ! पुढे जीव मुठीत घेऊन त्यांना केव्हा तरी नाव सांगू असा बेत होता; पण तेवढी हिंमत काही झाली नाही.

शेवटी बराच वेळ मास्तरांच्या खोलीत जाऊन ग्रंथालयाच्या मज्जारज्जूचे निरीक्षण केले व एकदम ब्रिलिअंट आयडिया आली. ही तर आपल्याकडे पाठ असलेली सुटी सुटी कपाटेच. एखादे जोर करून हालवले की मुक्तप्रवेश ! टीचर्स–रूम कधी रिकामी असते त्याच्या वेळा हेरून ठेवल्या. कपाटावरची

कुलपं काय अगदीच मामुली ! पुस्तकाच्या कपाटांना का मौल्यवान कुलपे लावायची असतात?

शेवटचे कपाट असे सरकवून कित्येक इंग्रजीची पुस्तके मी वाचून काढली. हे सहज बोलताना मी कुणाला सांगितले तर ते गृहस्थ बोलून उठले, "म्हणूनच तुम्ही चोरीचे शिक्के केले !"

"नाही ! नाही ! मी पुस्तके वाचून परत जागेवर ठेवून दिली होती. चोरीच्या शिक्क्यांमुळेच तर तुम्हाला हवं ते पुस्तक 'फिनिक्स'मध्ये मिळत आहे !"

या कपाटांचे पार्टिशन असलेल्या ग्रंथालयातच माझ्या ब्रिटॅनिकाचे बीज रुजले.

घेण्याचा योग २३ वर्षे ग्रंथालय चालवल्यानंतर आला ! हप्त्याची सोय असल्यामुळे मुबईचे 'स्टॅंडर्ड लिटरेचर' असोशिएटस् यांनी योग घडवून आणला. सहा हजाराला. आनंदाने एका सभासदाला दाखवला.

"It is becoming more and more your Library ! काय त्या डिक्शनऱ्या न् काय ते संदर्भग्रंथ ! तुम्ही नक्कीच आम्हा सामान्य वाचकाच्या पुस्तकावर कपात करून हा सेट घेतला असेल! "

अर्थात् रहावेना म्हणून घरीसुद्धा मी ही बातमी सांगितली तर दुसरा शॉक !

"तुम्हाला वडारवाडीतच रहायचंय वाटतं. इथून सुटायचं नाही ? सोन्याच्या बांगड्या वगैरे केल्या असल्या तर केव्हा तरी उपयोग झाला असता. पेपर आता ७५ पैशाचा झाला म्हणून नाही नाही तो मजकूर वाचीत बसता. आता हा पेडिआ तुमचाच चावून चावून चोथा करील की नाही बघा!"

आमच्या गुजराथीत द्रोणाला दडीया का असेच काही तरी म्हणतात. माझी पेडिआ घेतल्याची महत्त्वाची बातमी अशीच पसरली व एकच हूल उठली, "आ जशू भाईने शूं थयू छे ?" दडीया जेवामा शू पैसो नाख्यो छे ?"

संपादक म्हणाले, "आता तुमचा स्तंभ हळूहळू डिश-आउट करू या. नाहीतर जेन्युइन वाटायचा नाही. आता काय पूर्वीसारखं राहिलं नाही. तुमच्या मदतीला ३० ग्रंथसाहेब आहेत. तुमच लिखाण केव्हाही होऊ शकेल म्हणून मी तुमच्या बाबतीत आता स्टॉप–गो अवलंबिले आहे !"

पुण्यातील पुस्तकविक्रेत्याकडे थोडी बिले थकली होती. त्यातले काही म्हणाले, "Impractical अव्यवहार्य–प्रेस्टीज म्हणून घेतला ?" पाच दिवसात माझ्या टेबलावर सर्व पुस्तकांची बिले येऊन पडली. अर्थात् ती बोलली, "पेडिआ घ्यायला भरपूर पैसा आहे, मग आमची बिलं द्या पाठवून!" एरव्ही निदान यातली थोडी मंडळी तरी बिलासाठी घाई करत नसत.

मी एका पुस्तकाचा बाईंडिंग करण्याचा मोबदला रु ५.२५ देतो तो काही पेडिआ घेतल्यावर कमी केला नव्हता. प्लस पगार होता तोच चालू ! आमच्याकडे पूर्वी शंकर सातपुते नावाचा एक छान मलगा कामाला होता. डेला स्ट्रीटच्या ॲसिस्टंटला (म्हणजे लफड्यातला ॲसिस्टंट !) तो प्यारी मालन म्हणायचा !

"सरांनी काय ते ब्रिटानिया बिस्किटाचं रजिस्टर घेतलंय ! तीस खंडात. आपल्याला पे-राईज नाही काही नाही !"

आमच्या घरमालकांनी दोन तीन वर्षांपूर्वी कोर्टात असा आरोप ठेवला होता की, त्यांच्याकडे टी. व्ही., गाडी आहे म्हणून त्यांच्याबाबतीत मी jealous आहे. त्यावेळेला मी एका एफिडिव्हिटमध्ये असे लिहिले होते की, त्यांच्याकडे जर ब्रिटानिका असता तर निश्चितच माझ्या मनात Jealousy निर्माण झाली असती ! पण आमच्या वकिलाने हे एफिडिव्हिट फाइल करणे फायदेशीर होणार नाही असा सल्ला दिल्यामुळे ते तसेच पडून आहे !

हा ब्रिटॅनिका म्हणजे अगदीच शुष्क ! फॉक्सला Vulpes वगैरे लॅटिनमध्ये नाव देणारा. "निद्रानाशाच्या रोगावर याचा चांगलाच उपयोग होतो !" इति एक सभासद.

"आता आर्टिकल्स लिहिण्यात मजाच मजा, नाही का ? ब्रिटॅनिकामधलं द्यायचं भाषांतर करून, की लेख तैयार !"

"आता काय वर्गणी वाढणार की काय?" सेट बघून आणखीन एका वाचकाने पृच्छा केली.

"सांभाळ हं, असल्या फंदात पडलायस्. स्पॉंडिलॉसिस होईल ठोकळे उचलून उचलून !" असेही एकाकडून ऐकायला मिळाले.

माझ्या ब्रिटॅनिकाचं कुठेही कौतुक केलं गेलं नाही. मग विचार आला ना. सी. फडके असते तर ! इतर पुष्कळ लेखक फिनिक्समध्ये आले; पण त्यातल्या कुणालाही फिनिक्स फारसे ॲप्रिशिएट झाले नाही.

ब्रिटॅनिकामधून झेरॉक्स कॉपी काढून पुस्तकात चिकटवून अधिक माहिती वाचकाला द्यावी असा बेत होता. थोड्या कॉपीज काढल्या तर झेरॉक्सवाल्यांनी त्यावर फ्रेमचं प्रेशर देऊन ब्रिटॅनिका थोडा खराब केला. "मिस्टर, हे आमच्या फ्रेमवर्कमध्येच आहे ! वस्तु वापरली तर ती खराब होणारच. बॅंकेत पाहिलं आहे का लेजरची पाने कारकून (नॅशनलाईज झाल्यापासून ?) कशी त्वेषाने फिरवतो. तशी तर तुमच्या ब्रिटॅनिकाची पानं फिरवली नाही ना ?

मी आवंढा गिळला व ब्रिटानिकाचे काय काय उपयोग होतील त्याचा अजून तरी रवंथच करीत राहिलो आहे !

मला सर्वात मोठा हादरा दिला तो कपनीच्या प्रतिनिधीने. त्यांनी रिक्षेतून जेव्हा बंडलं आत आणली तेव्हा मी कसलाही आनंद तोंडावर दाखवला नाही; पण आतून मला कससंच वाटलं ! त्याने बंडलं फोडली व दोन दोन ग्रंथ माझ्या हातात द्यायला लागला. सर्व ग्रंथावर व्यवस्थित नबर व Lalo Montpar, Piranha Scurfy असे काही तरी स्पाइनवर लिहिले होते. – एवढे अनाकलनीय शब्द वाचून मी दचकलो व प्रतिनिधीला विचारले, "हे काय ?" त्याने थोडे का कू करीतच उत्तर दिले, "I do not know. Must be some Latin words !" नतर माझ्या लक्षात आलं की प्रत्येक व्हॉल्यूममधला तो पहिला आणि शेवटचा शब्द आहे ! एन्ट्री शोधण्यासाठी !

२३ वर्षे संध्याकाळी स्कूटर न वापरून ग्रंथालयात पायी येऊन घेतलेल्या पेडिआचे असे चीज झाले !

एका प्रखर व दाहक अनुभूतीने तुम्हाला ढवळून निघायचं असेल तर पेडिआ घ्या ! रात्री ब्रिटॅनिका मलाच रवंथ करतो अशी नाइटमेअर्स मला येतात !

— जे. एन्. पोंडा

# वेगळी माणसं

काही माणसं जन्माला येतात तीच मुळी वेगळेपणा घेऊन. हे वेगळेपणाचं वरदान किंवा शाप असा काही मागं लागतो की, चार-चौघांसारखं सामान्य आयुष्य जगू म्हटलं तरी जमत नाही. साध्या सरळ जीवनमार्गात अशी काही वादळं येतात की सगळं माणूसपण ढवळून जातं, कधी उध्वस्त होतं तर कधी बंदिस्त होतं. अशी आगळी माणसं जगण्याचं दान जसं पडेल तसं घेत जातात, एक अद्भुत जीवन जगतात. अशा मुलखावेगळ्या वीस जणांचे आत्मचरित्रपर लेख 'मुलखावेगळी माणसं' या नावानं नुकतेच प्रसिद्ध झाले आहेत.

'मुलखावेगळी माणसं' वाचून अस्वस्थ व्हायला होतं. या अस्वस्थतेचं कारण पाहिलं तर एक लक्षात येतं की, वनमालाबाईंच्या काय किंवा बाबुराव पटेलांच्या काय, त्यांच्या केवळ झपाटून टाकणाऱ्या अनुभवांमुळं ही अस्वस्थता येतेच; पण मी त्या जागी असते तर मी कोणत्या पद्धतीनं त्याला तोंड दिलं असतं? या विचारानं भयंकर गोंधळ होतो. 'व्यर्थ मी जन्मले' ही वनमालाबाईंची खंत पुस्तक वाचून संपले तरी मनाला टोचत रहाते. वनमालाबाई चित्रपटक्षेत्रात शिरल्या केवळ योगायोगानं! पण या चित्रपटामुळं त्यांना वडलांचा फार विरोध झाला. वडील त्यांच्याशी बारा वर्षं बोलले नाहीत! या नंतर कै. अत्र्यांची ओळख झाली तीही योगायोगानंच; पण या ओळखीनं त्यांचं सारं आयुष्यच बदलून गेलं. अत्र्यांच्या मैत्रीबद्दल वनमालाबाईंनी अगदी मोकळेपणानं लिहिलं आहे. अत्र्यांचा मुत्सद्दी, बेभरवशी स्वभाव आणि त्यामुळं वनमालाबाईंची असह्य फरफट आणि नंतरचा एकाकीपणा. आत्मचरित्रातला हा प्रांजळपणा विशेष आहे.

यानंतरचे बाबुराव पटेल, रंजन जावळे, गुरुनाथ धुरी, सुशीलकुमार शिंदे याचे आत्मवृत्तपर लेख असेच अस्वस्थ करणारे आहेत. बाबुराव पटेलांच्या मनोगतातला मोकळेपणा झपाटून टाकतो. ते लिहितात, 'मी काय नव्हतो? मी होतो रेल्वेहमाल, फौंटनपेनाचा फेरीवाला, लठ्ठ गुजराथ्यांना मसाज करणारा मसाजवाला, घड्याळजी, शॉर्टहँड-टायपिस्ट, टुरिस्ट गाईड, कारकून, चित्रपट-कथालेखक, नट, निर्माता, दिग्दर्शक, ज्योतिषी, राजकारणी, संसद-सभासद इ. बाबुराव पटेलांची हमालापासून — संसद-सभासदापर्यंतची वाटचाल वाचणं, हा एक थक्क करणारा अनुभव आहे. पटेलांच्या आत्मवृत्तात त्यांची ओळख तर होतेच; पण त्यांची सहनशील बायको शिरीन आणि तीन उनाड मुलं यांचीही ओळख होते. आपल्या मुलांच्या वागणुकीकडे ते कमालीच्या तटस्थपणे पाहतात. या मनोगतातला पटेल आणि त्यांच्या मलाच्या वादाचा प्रसंग असाच अस्वस्थ करणारा आहे. मनात सतत सलणारं एखादं शल्य दाखवून द्यावं येवढाच या लिखाणातला हेतू आहे. कुठेही खोटा अभिनिवेश नाही की गैरवाजवी बचाव नाही. पटेलानी नंतरच्या काळात दुसरं लग्न केलं; दोन्ही बायकांचं छान पटायचं. सगळ्या आयुष्याचा घाटच वेगळा.

शकुंतलाबाई परांजप्यांचा 'काही आंबट काही गोड' वाचणं हा एक चांगला अनुभव आहे. संपूर्ण लेखात शकुंतलाबाईंची मिश्किल शैली उतरली आहे. रँ. परांजप्यांची मुलगी म्हणून फर्ग्युसन कॉलेजमधले विद्यार्थी सायकलवरून फिरवून आणायचे त्याची गोष्ट, 'नवऱ्याला बंदुकीने मारून टाकीन' असं म्हटल्यावर आजीने तुळशीपुढे नाक घासायला लावलं तो प्रसंग. याबद्दल त्या म्हणतात, 'आमच्या घरात देवच नव्हते. आगच्या गड्याने एका फुटक्या वालडीत तुळस लावली होती. तेवढीच काय ती तेहतीस कोटी देवाची आमच्या घरची प्रतिनिधी. अप्पांची मुलगी म्हणून शकुंतलाबाईंचे खूप कौतुक झाले आणि त्यांनी त्याचा पुरेपूर फायदा घेतला. शाळेत असताना इरावती कर्वे त्यांच्याकडे रहायला आल्या त्या वेळी तिचा मत्सर कसा वाटायचा हे सगळं शकुंतलाबाईंनी सुरेख लिहिलं आहे.

या पुस्तकातले सगळेच लेख सरस उतरले आहेत. तीन ज्येष्ठ गायक—भीमसेन जोशी, मल्लिकार्जुन मन्सूर आणि मोघुबाई कुर्डीकर यांच्या लेखांचा विशेष उल्लेख करायला हवा. ही माणसं गाण्यात मुरली आणि त्यातच वाढली. सवाई गंधर्व म्हणजे भीमसेन जोशींचे गुरु. सवाई गंधर्वांची शिकवण्याची पद्धत, त्यांची शिकवणी मिळावी म्हणून त्यांना करायला लागलेले कष्ट वाचताना माणूस कसा घडतो ते लक्षात येतं.

जी जी माणसं आपलं वेगळं जीवन उत्कटतेनं जगली त्या सर्वांचे लेख यात आहेत. 'सहजचि सुचले गोत' मध्ये ग. दि. माडगूळकर आपण कवी कसे झालो ते सांगतात तर 'जनक तो ऐसा' मध्ये गुरुनाथ धुरींसारखे कवी आपल्या अफलातून वडलांची आणि असहाय्य आईची कहाणी सांगतात. 'माझी कथा आणि व्यथा' ही दया पवारांची कहाणी अशीच अस्सल आहे. सुशिलकुमार शिंदे म्हणतात,'कोठे होतो कोठे आलो' लेखाचं नाव सार्थ करणारा सुशिलकुमार शिंद्याचा जीवनप्रवास वाचताना मन भरून येतं. केवढी जिद्द, केवढा आत्मविश्वास आणि केवढी धडपड! हे सगळं शब्दबद्ध करणं खरोखरच अवघड.

याशिवाय दादा मिरासी, शोभना समर्थ, जयसिंग जगताप, प्रभाकर मोने, डॉ. कल्याणी अशा अनेकांची आत्मवृत्ते या पुस्तकात आहेत पुस्तकाच्या शेवटी 'कोणाच्या नशिबी' मध्ये जयवंत दळवीच्या शालेय जीवनात त्यांना आलेला अनुभव कल्पित वाटावा इतका अद्भुत; पण मन अगदी सुन्न आणि बधिर करणारा आहे.

गेल्या सहा वर्षांतील 'अपर्णा' दिवाळी अंकातील लेखांचे 'मुलखावेगळी माणसं' हे संकलन आहे दिवाळी अंकांमधून येणाऱ्या लेखांचं. इतकं दर्जेदार संकलन क्वचितच पहायला मिळतं. पुस्तकातले संकलित २० (व्रीस) लेख वाचल्यावर एक गोष्ट जाणवते की, ज्यांच्या मनात काही तरी सलत होतं, खुपत होतं त्यांनाच बाळ सामंतांनी लिहितं केलं आहे. धाडसी माणसांकडून असे जळजळीत अनुभव लिहून घेतानाही लेखाची भाषा 'सनसनाटी' न होऊ देण्याकडे संपादकाने लक्ष पुरवले आहे. त्यामुळे ही आत्मवृत्तं म्हणजे फावल्या वेळची करमणूक नाही की, अनुभवांची धंदेवाईक विक्री नाही. वेगळं जीवन जगणाऱ्या मंडळींनी आपल्या अंतरंगात खोल डोकावण्याची संधी या पुस्तकाद्वारे सामान्यांना दिली आहे. ही आत्मवृत्तं कोणत्याही व्यक्तीला अंतर्मुख करतील अशी आहेत. चौकटीत जगणाऱ्या मंडळीची यातून करमणूकही होईलच; पण या लेखांचे ते उद्दिष्ट नाही हे सहज लक्षात येते.

पुस्तकातल्या वीसजणांशिवाय असं वेगळं जीवन जगणारे पुष्कळ नामवंत आहेत. त्यांचंही अंतरंग पुस्तकरूपानं वाचायला मिळेल अशी आशा करायला हरकत नाही. □

मुलखावेगळी माणसं
श्रीविद्या प्रकाशन
पृष्ठे : २९७, किंमत : ३५ रु.

चित्रपट

# ' आली अंगावर '

एखादी कल्पना जनमानसात क्लिक झाली की, तीच कल्पना फिरवून फिरवून परत परत वापरायची, या सवयीमुळे कित्येक दिग्दर्शकांचा एक ठराविक साचाच ठरून गेला आहे. त्यामुळेच मनमोहन देसाईंच्या सिनेमातलं दोन जुळ्या भावांचं बिघडणं, चिन्नपा देवरांचं प्राणीप्रेम, दादा कोंडकेंच्या सिनेमातला ' वेष असे बावळा, परी अंतरी नाना कळा ' असा बावळट नायक हे सारं प्रेक्षकांच्या आता सवयीचं झालेलं, पण इतर वेळेस इतर सिनेमांकडे 'काय तेच तेच सारखं बघायचं ?' असं म्हणून नाकं मुरडणारे प्रेक्षक यांच्या (अगदी त्याच त्याच) सिनेमांवरही अक्षरश: तुटून पडतात. यामुळेच त्यांच्या सिनेमांच्या रौप्य किंवा सुवर्णमहोत्सवांनाही तोटा नसतो. ' झोळीनं आठ रौप्यमहोत्सवी चित्रपट देणाऱ्या दादा कोंडके यांचा नवा चित्रपट ' अशी बा आदब बा मुलाहिजासारखी जाहिरातीची लांबलचक बिरुदावली मिरवत आलेला ' आली अंगावर ' हा दादा कोंडके यांचा नववा चित्रपट. 'आली अंगावर' अशी द्व्यर्थी अर्थाची झूल घालून आलेलं सिनेमाचं नाव खास ' कोंडके ' स्टायलीतलं ! त्याला जोड मिळाली ती या सिनेमाच्या जागोजागी झळकलेल्या पोस्टर्सची. शिंगं रोखून धावत येणारी गाय काय, उषा चव्हाणचं सूचक व्यंगचित्र काय—यामुळे या नावाच्या मागच्या अश्लीलतेबरोबरच उत्कंठाही वाढीस लागते आणि ' आली अंगावर—पण कोण ?, असा प्रश्नही नकळतच मनात उभा राहतो. पण प्रत्यक्षात मात्र सिनेमाचं नाव दिशाभूल करणारं आहे. कारण ' आली अंगावर ' हे नाव वाचल्यानंतर किंवा पोस्टर्स पाहिल्यानंतर सिनेमाविषयी सामान्य माणसाच्या डोक्यात जी कल्पना येते, त्या कल्पनेचा आणि सिनेमात दादांना अपेक्षित असलेल्या कल्पनेचा अर्थाअर्थी काहीही संबंध नसल्याचं लक्षात येतं. याचमुळे हा नवा चित्रपट दादांच्या आतापर्यंतच्या चित्रपटांच्या चौकटीत फीट्ट बसणारा असला तरीही कमी पडतो, निराशा करतो.

दादांच्या कथेचीही एक चौकट ठरून गेली आहे. त्यात बावळट नायक, फटाकडी नायिका आणि ' आये ' वगैरे पात्रं असायलाच हवीत. 'आली अंगावर'ची कथाही त्याला अपवाद नाही. या सिनेमाचा नायक आहे जन्या धोबी. आपली आये, स्वत:बरोबरच राब राब राबायला एक गाढव आणि आपलं काम यातच मग्न असणारा जन्या, जनीच्या घोळात सापडतो आणि तिथूनच खरी त्याच्या नशिबाला कलाटणी मिळते. एकंदरीतच गावात माजलेली अंदाधुंदी पाहून जन्याला वाटत असतं—एकदा या गावचा राजा झालो की सगळं गाव कसं चट सुधारून टाकीन आणि एक दिवस खरोखरच जन्याचा एका रात्रीत रंकाचा ' राव ' होतो. चक्क राज्याचं राज्यपद त्याच्याकडे चालून येतं. पहिल्यांदा जन्याला इतकं काही असह्य होतं की, तो प्रधानाला गळ घालतो—'वर्षभर तुमची कापडं धुवीन, पण मला यातून सोडवा.' पण नंतर हळूहळू तो राजवाड्यात रुळतो आणि मग मात्र तो एकदम असा काही स्मार्ट होतो की, राजवाड्यातल्या अंदाधुंदीला ताबडतोब आळा बसतो आणि वाड्यातल्या सगळ्या लोकांना तो वठणीवर आणतो. एवढं सगळं झाल्यानंतर मात्र त्याला त्याच्या धोबी कामाचीच आस लागलेली असते. त्यामुळे सिनेमाच्या शेवटी राजवाड्यातली कापडं धुवायचं कंत्राट 'पदरात पाडून' जनीला गटवून जन्या आपल्या आयेबरोबर निघून जातो आणि जाता जाता 'आय' वालं असणं (म्हणजे आईची आज्ञा पालन करणं) किती महत्त्वाचं असतं हे सांगून 'आय'चा आशीर्वाद मागतो आणि त्याची 'आय'ही 'हात'भर आशीर्वाद देते.

यापूर्वीही या कथाविषयावर किती तरी हिंदी-मराठी चित्रपट येऊन गेले आहेत, त्यामुळे कथेत नाविन्य जाणवत नाही. तसंच जाता जाता कानपिचक्या देणं, चालू राजकारणावर, पद्धतीवर टीका करणं वगैरे गोष्टी कथेच्या अनुषंगानं त्यांच्या सिनेमात चपखलपणे बसतात; पण त्याच्या आधीच्या सिनेमात ही टीका-टिप्पणी ज्या खुसखुशीतपणानं आणि नेमकेपणानं अवतरली होती, त्याचप्रमाणं नंतरच्या सिनेमात मात्र त्या मानानं कमी होत गेल्याचं जाणवतं. या सिनेमातही 'आय' वाले, बाईचं राज्य, भ्रष्टाचार, मंत्र्यांवर टीका वगैरे उल्लेख आहेतच; पण जास्त भर दिल्याचा जाणवतो तो द्व्यर्थी संवादांवरच आणि त्यालाच पूरक अशा सूचक आणि अश्लील हालचालींवर ! याचा सिनेमात तर अतिरेक झालाच आहे; पण आता इतक्या सिनेमांनंतर त्यात तोच तोचपणाही आला आहे—त्यामुळे मधून मधून हा सिनेमा चक्क कंटाळवाणा होतो !

दादांच्या सिनेमातल्या कलाकाराचा संचही आता ठरून गेला आहे. दादा कोंडकेंनी साकार केलेला जन्या धोबी हा 'एकटा जीव' मधला 'सदाशिव', 'राम राम' मधला 'गंगाराम', 'पांडू हवालदार' मधला 'पांडू' वगैरेंच्याच लायनीतला; पण तरीही त्याला 'नाम्या' किंवा 'सदाशिव' याची सर नाही ! जन्या धोबी रंगवताना दादांच्या अभिनयात नेहमीची सहजता असली तरी वेगळेपण नाही. नायिका उषा चव्हाणला आधीच्या अर्ध्या भागात तमासगिरीण आणि नंतरच्या अर्ध्या भागात राजनर्तिका म्हणून यथेच्छ नाचवून घेतली आहे. सिनेमाचा मुख्य भाग दादा आणि उषा चव्हाण यांच्या भोवतीच फिरत असल्याने शरद तळवळकर, दीनानाथ टाकळकर, वसंत शिंदे यांना वाव कमीच ! तसंच दादांची 'आये' रत्नमालाही यात तशी साइडलाच पडली आहे !

राम लक्ष्मण यानी संगीत दिलेलं असून 'खाजवा की बुगडी शोधायला डोकं' किंवा 'अग राणी भरल्यात दोन्ही माठ' गळतय पाणी' ही गाणी त्यातील अभिप्रेत अर्थामुळं गाजतील !

सिनेमाच्या दुसऱ्या भागात संपूर्णपणे राजवाड्याचे शॉटस् असल्याने सेटिंग्ज आदी भव्य आहे. तसंच सिनेमातले रंगही डोळ्यांना सुखावह होणारेच आहेत !

दादांच्या सिनेमातले द्व्यर्थी संवाद सेन्सॉरच्या कधीच पचनी न पडणारे, त्यामुळे नित्याप्रमाणे या सिनेमाच्या वेळेसही दादा विरुद्ध सेन्सॉर हे प्रकरण रंगलंच ! सेन्सॉरने सांगितलेल्या जवळजवळ ४० कटसपैकी निम्म्याहून अधिक कटस् दादांनी पदरात पाडून घेतले. अशी पार्श्वभूमी असताना, नाही म्हटलं तरी प्रेक्षकांची उत्सुकता ताणली गेली. त्यामुळं प्रेक्षकांची गर्दी होणार यात शंका नाही ! *

MANOOS ( Marathi Weekly ) 1.50 Paise Regd. No. PNC-W 28
( Licensed to post without prepayment of postage-No. 11 )

# चित्रपटाबाहेर...

मराठी रंगभूमीवरील अभिनेत्री आणि दूरदर्शनवरील वृत्तनिवेदिका भक्ति बर्वे ' जाने भी दो यारों ' या चित्रपटाद्वारा सिनेसृष्टीतही प्रवेश करत आहे. हा चित्रपट नॅशनल फिल्म डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनतर्फे तयार होणार असून यात तिच्याबरोबर नसीरुद्दीन शाह आणि ओम पुरी, रवी वास्वानी, सतीश शाह वगैरे फिल्म इन्स्टिट्यूटचे विद्यार्थी काम करणार आहेत. या सिनेमाचे कथानक विनोदी असून संगीत भास्कर चंदावरकर यांचे आहे. एन. एफ. डी. सी. तर्फे निर्माण होणारा हा तिसरा चित्रपट ! याशिवाय ' अत्याचार ' (मराठी) आणि ' आदी शकराचार्य ' (संस्कृत) हे दोन चित्रपटही आहेतच.

¤

नुकताच ' एक ही भूल 'चा रौप्यमहोत्सव झाला. या वेळेस दिलेल्या पार्टीच्या वेळेस जितेंद्रने केलेल्या वर्तनामुळे फिल्म इंडस्ट्रीतले सगळे त्याच्यावर फारच नाराज झाले आहेत. ' रास्ते प्यारके ', ' प्यासा सावन ', ' अपना बना लो ' असे जितेंद्रचे एकापाठोपाठ एक धडा[illegible] सिनेमे कोसळल्याच्या पार्श्वभूमीवर ' एक ही भूल 'च्या रौप्यमहोत्सवाबद्दल सगळ्यांना फारच कौतुक होतं. ह्या पार्टीसाठी [illegible] शेरीफ सुनील दत्त याला अध्यक्ष [illegible] बोलावलं व त्याप्रमाणे जितेंद्र सोडून [illegible]सकट झाडून सगळे वेळेवर हजर झाले; पण जितेंद्रचाच पत्ता नव्हता. शेवटी तब्बेतीचं कारण पुढं करून सुनील दत्त निघून गेला, तर वाट पाहून पाहून थकलेल्या रेखानं जायची भाषा काढली तेव्हा तिला थोपवून धरता धरता निर्माता दिग्दर्शकाच्या नाकी नऊ आले ! शेवटी किती तरी वेळानं जितेंद्र उगवला आणि थोड्या वेळातच तो बारकडे वळला. पण तिथली दारू ' देशी ' आहे म्हणून तो तिथून निघून गेला तो सरळ हॉटेलच्या बारमध्ये आणि त्याच्या पाठोपाठ त्याचा भाऊ आणि मेव्हणाही !

¤

भारतात दाखवल्या जाणाऱ्या पाश्चिमात्य चित्रपटांवर कडक सेन्सॉरशिप लागू करण्याचा निर्णय श्रीलंका सेन्सॉर बोर्डाने घेतला आहे. पाश्चिमात्य चित्रपटांतील वातावरण हे आपल्याइकडच्या वातावरणाशी जुळणारं नाही. कारण तिकडची आणि आपली सामाजिक परिस्थिती यात फार मोठा फरक आहे. संस्कृति, परंपरा, नीती-अनीती यांच्या कल्पना फार वेगळ्या आहेत. तसंच अलीकडे सिनेसृष्टीत पसरलेल्या नव्या लाटेमुळे चित्रपटात कथेला प्राधान्य मिळत नसून सर्व भर सेक्सवर दिला जातो. हा परिणाम सिनेमाचाच आहे आणि त्या सिनेमांमधूनही नग्नता आणि सेक्सी दृश्ये यांचं प्रमाण वाढत आहे. त्यामुळं सेन्सॉर बोर्डनं हा निर्णय घेतला आहे.

¤

' संजय दत्त जर्मनीहून परतल्यापासून सुनील दत्त-संजयदत्त आणि टीना मुनीम यांच्यातील संबंध सलोख्याचे झाले खरे; पण टीना मुनीम मात्र वेगळ्याच मानसिक अवस्थेत सापडली आहे. केवळ प्रेमापायी संजयदत्तचं संपूर्ण आयुष्य बरबाद होणं ही गोष्ट सुनील दत्तला साफ नामंजूर आहे आणि त्यामुळं त्यानं संजय दत्त-टीना मुनीम यांच्या प्रेमाला मान्यता दिली आहे; पण त्याबरोबरच त्याने टीनाला लग्नानंतर फिल्म इंडस्ट्री सोडण्याची अट घातली आहे. कपूर घराण्याप्रमाणेच दत्त घराण्यातही सुनांना सिनेमात काम करायला परवानगी नाही. कारण नर्गिसनंही लग्नानंतर सिनेमात काम करणं सोडून दिलं होतं. त्यामुळं सध्या टीनाची मानसिक स्थिती अतिशय दोलायमान झाली आहे. नुकतीच कुठं तिची करिअर मधल्या गोंधळानंतर पूर्वपदावर आली आहे. अशा परिस्थितीत नक्की काय निर्णय घ्यावा अशा संभ्रमात ती पडली आहे.

¤

मुकेश खन्ना हे नाव पडद्यावर अजून तितकसं सेटल झालेलं नाही. त्यामुळं 'स्टार' म्हणून तर त्याची अजिबातच गणती होत नाही. मध्यंतरी त्यानं गाडीऐवजी सगळीकडे पायी जायला सुरुवात केली होती. कारण एक तर गाडीमधून फिरण्यानं व्यायाम कमी होतो – असं त्याचं मत आणि दुसरं म्हणजे गाडीत असल्यानंतर कुणी ओळखतही नाही. त्यामुळं लोकांना ओळख पटावी म्हणून तो पायी जाऊ लागला. पण तरीही कुणी त्याची दखल घेतली नाही. मुंबईच्या धावपळीच्या जीवनात मुंबईकरांना दुसरीकडे लक्ष द्यायला फारसा वेळ नसतो, हे आता त्याला पटलं आहे.

¤

छायाचित्रकार आणि नाट्यनिर्माते या रूपांतून मोहन वाघ यांचा सगळ्यानाच परिचय आहे. फोटोग्राफीच्या त्यांच्या व्यवसायातले निरनिराळे किस्से जसे ऐकण्याजोगे आहेत तसेच नाट्यव्यवसायातलेही !

मराठी चित्रपटमहोत्सवापाठोपाठ मोहन वाघ मराठी नाटकही परदेशी घेऊन चालले आहेत; पण या दौऱ्याचं महत्वाचं वैशिष्ट्य म्हणजे वसंत कानेटकरलिखित ' गगनभेदी ' या नव्या नाटकाचा प्रारंभ ते लंडनमध्ये करणार आहेत. ' स्वामी ' या रणजित देसाई लिखित नाटकाचा प्रयोगही त्यांनी शनिवारवाड्याचं दीडशे वर्षे बंद असलेलं दार उघडून खुद्द वाड्यात केला होता ! शेक्सपियरच्या हॅमलेट, ऑथेल्लो, मॅक्बेथ आणि किंग लियर, या चार शोकातिकांचा संगम असलेले ' गगनभेदी ' हे नाटक शेक्सपियरच्या भूमित करणच अधिक संयुक्तिक ठरेल. या उद्देशाने या नाटकाचा शुभारंभ लंडनमध्ये करण्यात येईल. याशिवाय ' तरुण तुर्क म्हातारे अर्क ' (मधुकर तोरडमल), ' स्वामी ' (रणजीत देसाई), व ' वाघनखं ' (वसंत कानेटकर) या नाटकांमधील निवडक नाट्यप्रवेशांचे ' नाट्यदर्शन ' तर वसंत कानेटकर यांचे ' नाट्यवाचन ' असा कार्यक्रम आहे.

–शुभदा रानडे